मूल्य ३० रु. / पृष्ठ १०४ । नोव्हेंबर २०१९ । वर्ष १२ वे / अंक ११


# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!



## अनुक्रमणिका


**4**



सुरुवातीचे- महाआघाडीतल्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन
- जयंत पाटील

**5**



प्रबंध संपादकीय-
प्रश्न माध्यमांच्या विश्वासार्हतेचा
- दिलीप वळसे पाटील

**6**



संपादकीय-
जनतेने माज उतरविला
- डॉ. सुधीर भोंगळे

**12**



राष्ट्रवादीच्या नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार, भाषणे

१) जनतेच्या प्रश्नांशी समरस व्हा
शरद पवार- १२

२) पवारसाहेबच एक नंबर
श्रीनिवास पाटील- १८



३) पवारसाहेबांमुळेच मिळाली राष्ट्रवादीला नवीन उभारी
अजित पवार- २०

४) भल्या-भल्यांना राष्ट्रवादीची धडकी...
जयंत पाटील- ३२



५) ईडीचे आपण आभारच मानूया
प्रफुल पटेल- ३८

६) पवारसाहेबांनी बदलली देशाच्या राजकारणाची दिशा
डी.पी. त्रिपाठी- ४०

**42**



पकड सुटत चाललेले सरकार
- आकाश (दिल्ली वार्तापत्र)

**50**



राष्ट्रवादीच्या पराभूत आमदारांची बैठक, भाषणे

१) स्वतःच नेतृत्व अधिक मजबूत करा
शरद पवार- ५०

२) राष्ट्रवादी प्रबोधिनी तयार करा
श्रीनिवास पाटील- ५५

३) पराभवाने खचू नका, पक्षाला उभारी द्या
अजित पवार- ५६



४) पवारसाहेबांना डोळ्यासमोर ठेवून पुन्हा कामाला लागा
छगन भुजबळ- ६०

**62**

जनतेला भाजपला धोक्याचा इशारा
- प्रतिनिधी

**68**



अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा धावता आढावा
- डॉ. सुधीर भोंगळे

**88**

शेतकऱ्यांनो मैदान सोडू नका
- शरद पवार

**92**



चव्हाटा (हलके-फुलके राजकीय किस्से)
- घंटाकर्ण (नवी दिल्ली)

**98**



या संशयास्पद हालचालींना कुणाचे पाठबळ?
- लोकनाथ

**102**

शेवटचे पान- अवलिया तुमच्या बांधावर...
- हेमन्त टकले



संचालक
हेमन्त टकले

प्रबंध संपादक
दिलीप वळसे पाटील

संपादक
डॉ. सुधीर भोंगळे

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय पत्रव्यवहार
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ०३८
०२२-३०२३५५३०/५५/५६

कला निर्देशन
धनंजय सस्तकर

सजावट व मांडणी
दिलीप रोडे

छायाचित्रे
प्रशांत चव्हाण

वर्गणीचे दर-
वार्षिक रु. ५००/-

वर्गणीचा धनादेश
'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'
या नावाने काढावा.

www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध

मुद्रक, प्रकाशक
हेमन्त प्रभाकर टकले यांनी
'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'
च्या वतीने
मीडिया आर ॲण्ड डी.,
१३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३,
सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप,
कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७
येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट,
मुंबई-४०००२० येथून
अंक प्रकाशित केले.

संपादक-
डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे

# महाआघाडीतल्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन


नुकत्याच महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मागील विधानसभा निवडणुकीपेक्षा 14 जागा यावेळी अधिक मिळाल्या आहेत. आपल्या काही जागा आणि विशेषतः शहरातल्या जागा फार थोड्या मतांनी गेल्या आहेत. या निवडणुकीत आपल्या पक्षाला जे चांगले यश मिळाले त्यात तळागाळात खाली काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा मोठा भरीव वाटा आहे. म्हणून सुरुवातीलाच निवडणुकीत अंग झाडून काम केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो व आभारही मानतो. या निवडणुकीत आपली काँग्रेस, शेकाप, स्वाभिमानी पक्ष, रिपब्लिकन पक्ष (कवाडे व गवई गट) आणि अन्य समविचारी पक्षांशी महाआघाडी होती. या महाआघाडीत सहभागी असलेल्या सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांनीही आघाडीचे उमेदवार विजयी व्हावेत यासाठी कसोशीने प्रयत्न केले. आपले मतभेद बाजूला ठेवले व विश्वासाने खांद्याला खांदा लावून एकजुटीने काम केले म्हणून महाआघाडी भाजप-सेनेचा भरधाव सुटलेला घोडा रोखू शकली आहे. जनतेने तर युती सरकारच्या विरोधातच जनादेश देऊन त्यांना कडक असा इशाराही दिलेला आहे. यातून ते निश्चित काही बोध घेतील आणि जमिनीवर पाय ठेवून चालू लागतील अशी आशा आपण करुया. महाआघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांनी महायुतीला महाजनादेश मिळू नये यासाठी जे अथक प्रयत्न केले त्यामुळेच विशेषतः भाजपचे विमान जमिनीवर आले आहे. अबकी बार 220 पार ही त्यांची घोषणाही महाआघाडीच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रयत्नाने हाणून पाडली त्याबद्दल महाआघाडीतील सर्व कार्यकर्त्यांचेही मी मनापासून अभिनंदन करतो.

अभिनंदनात मनामनांचा खुला संवाद असतो. कर्तृत्त्वाला नेमकी मनापासून दाद द्यायची मानस तयारी अभिनंदनात सामावलेली असते. माणसांच्या संबंधासंबंधातून यशाची लख्ख वीज चमकून जी दिव्यता लाभते, ती अभिनंदनात असते. अभिनंदनाने मनाची उदारता वाढते. आपापसातला स्नेह घट्ट होतो. जगण्यातल्या नवनवीन गोष्टी सहज जवळ करता येतात. संवादातला भाव उपदेशात येतो. ही भाग्याची गोष्ट लाभायचे सामर्थ्य अभिनंदनात आहे. संपूर्ण महाराष्ट्र आणि देशातल्या जनतेने महाआघाडीच्या यशाबद्दल आपल्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. शरद पवार यांचे अभिनंदन व गौरव करुन त्यांना मनाचा मुजरा केला आहे. वयाच्या 80 व्या वर्षीही ज्या तडफेने व उमेदीने ते दिवसरात्र प्रचार करीत होते, दिवसाला 5-6 सभा घेत होते आणि मुख्य म्हणजे साताऱ्च्या सभेत प्रचंड कोसळत्या पावसात ओलेचिंब होऊन त्यांनी जे घणाघाती भाषण केले त्यामुळेच साताऱ्च्या राजांना पराभवाची चव चाखावी लागली. साताऱ्चे हे भाषण जनतेच्या कायम स्मरणात राहिल आणि ऐतिहासिक भाषण म्हणूनच त्याची सुवर्णाक्षरांनी नोंद होईल याविषयी माझ्या मनात शंका नाही. जनतेने पवार साहेबांचे आणि साहेबांनी कार्यकर्त्यांचे जे अभिनंदन केले त्याला तोड नाही. त्या-त्या कर्तृत्त्वातली क्षितिजे जेव्हा एकमेकांचे अभिनंदन करतात, तेव्हा सूर्य पृथ्वीच्या पायात खेळतो. जे जे मनास भावते नि ज्यातून आपली मानसिकता वाढते ते ते सारे अभिनंदनीय असते. मनाला जरा उघडे केले की याचा अनुभव येतो. म्हणून माझी पक्षातील ज्येष्ठ नेते, पदाधिकारी यांना सूचना व विनंती आहे की तुम्ही सुद्धा आपल्या पक्षाच्या व महाआघाडीतल्या कार्यकर्त्यांचे तोंडभरुन मोठ्या मनाने अभिनंदन करा. दुसऱ्यांच्या अभिनंदनाने आपल्या मनाची कवाडे धडाधड मोकळी होतात. या जगण्यावर आपण मनापासून प्रेम करतो. म्हणून कुणीही असो, त्याने चांगले काम केले की, त्याचे मनापासून अभिनंदन करा, अभिनंदनामुळे तुम्ही आकाशाएवढे होता. मनमोकळ्या अभिनंदनाने जर माणसे आपण आपलिशी केली तर सगळे तंटे व प्रश्न आपोआप सुटतील. एकमेकांना मदत करण्याची वृत्ती वाढीला लागेल.

## सुरुवातीचे



सध्याचा काळ अत्यंत कठीण आहे. आपले राज्य अनंत अडचणीतून जात आहे. सरकारने शेतकरी पूर्णपणे वाऱ्यावर सोडून दिलेला आहे. अतिवृष्टी, चक्रीवादळे आणि लांबलेला पाऊस यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. भात, कापूस, सोयीबीन, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, वरई, सर्व प्रकारचा भाजीपाला व पालेभाज्या, फळबागा यांचे कधीही न भरुन निघणारे नुकसान झाल्यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडलेला आहे. तो चिंताग्रस्त आहे. या शेतकऱ्यांना हेक्टरी 25 हजार रु. मदत कोणत्याही अटी-शर्ती न घालता सरकारने दिली पाहिजे अशी आग्रही मागणी आपण केली आहे. ती शेतकऱ्यांच्या पदरात पडण्यासाठी आपण सारे मिळून प्रयत्नांची शिकस्त करु. या मदतीतून शेतकरी पूर्ण ताकदीने उभा राहणार नाही याची माझ्यासह आपल्या सर्वांना कल्पना आहे. पण आणखीन वेगवेगळ्या पद्धतीने व मार्गांनी कशी मदत करता येईल याचा विचार कार्यकर्त्यांनी केला पाहिजे. संकटसमयी जो मदत करतो त्याची आठवण लोक नेहमी ठेवतात. पवार साहेब जनतेवर कोणतेही संकट येवो स्वतः प्रथम तिथे धावून जातात. यातून आपल्या कार्यकर्त्यांनी योग्य तो बोध घेतला पाहिजे. आपले मन व्यापक केले पाहिजे. मन कुरतडणारे नसते. विकारी माणसे मनाला खातात. पण मनावरचा अहंकार मावळला की स्वच्छ आत्मप्रकाशाची वाट फुटते. विकार नाहिसे झाले की, निर्भयत्व येते. हे इतके प्रखर असते की ते इतरांच्या विकृतींवर टाच आणते. ते आपण पवार साहेबांना 'ईडी' ने काढलेल्या नोटीशीच्यावेळी पाहिले आहे. शेवटी 'ईडी' ला माघार घ्यावी लागली हे चित्र जगाने पाहिले. असे विशुद्ध निर्भयत्व युगायुगात क्वचित येते. त्याला संतत्व म्हणतात. संतांनी देवावर विशुद्ध प्रेम केले तसे नेत्यांनी कार्यकर्त्यांवर प्रेम केले पाहिजे. नेता आणि कार्यकर्ता यांच्यातले नाते जर इतके विशुद्ध असेल तर यशापयशाचे चढउतार सोपे होतात. यावेळच्या विधानसभा निवडणुकीत आपण हे अनुभवले आहे. ते कायम चिरस्मरणात ठेवून पुढची वाटचाल मोकळ्या व शुद्ध अंतःकरणाने करीत राहा. म्हणजे मग आपले सार्थ मनभान आपल्यालाच कळेल.



राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

# प्रश्न माध्यमांच्या विश्वासार्हतेचा

खासगी वृत्तवाहिन्या आणि मतदानोत्तर चाचण्या करणाऱ्या संस्था यांचे महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक २०१९ चे अंदाज पूर्णपणे खोटे पडले व चुकीचे निघाले. लोकसभेप्रमाणेच विधानसभा निवडणुकीतही भाजप-शिवसेनेची विजयी घौडदौड कायम राहील आणि महायुतीला २०० हून अधिक जागा मिळतील असे अंदाज या सर्वांनी व्यक्त केले होते. 'इंडिया टुडे' आणि 'टीव्ही ९' वगळता अन्य वृत्तवाहिन्यांनी महायुतीला २०० हून अधिक म्हणजे २४३ पर्यंत जागा मिळतील असा अंदाज व्यक्त केला होता. 'एबीपी' ने भाजपला १४० आणि सेनेला ७० अशा २१० जागा दाखविल्या होत्या. सीएनएन न्यूज १८ ने भाजप १३० आणि सेना ११३ अशा २४३ जागा महायुतीला दिल्या होत्या. इंडिया टुडेने १८१ तर टीव्ही ९ ने १९७ आणि झी-पोल डायरीने १७६ ते १९२ जागा महायुतीला मिळतील असा अंदाज व्यक्त केला होता. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसची महाआघाडी दोन्ही मिळून ४१ ते ९० च्या दरम्यान राहतील. त्यापेक्षा जास्त जागा त्यांना मिळणार नाही असे भविष्य वर्तविले होते. 'एबीपी' ने तर काँग्रेसला ३१ आणि राष्ट्रवादीला ३२ असे एकूण ६३ जागांचे भाकीत केले होते. अन्य सर्व पक्ष मिळून ३ ते ३४ जागा मिळवितील असा अंदाज या माध्यमांकडून देण्यात आला होता. प्रत्यक्षात काय घडले ते आपल्या सर्वांच्या पुढे आहे. महायुतीला जनतेने नाकारले आहे. विशेषतः भाजपकडून त्यांचे नेते सतत मोठ्या आवाजात 'इस बार २२० पार' असे सांगत होते. प्रत्यक्षात भाजपला १०५, शिवसेनेला ५६ अशा १६१ जागांवरच समाधान मानावे लागले. म्हणजे १२७ मतदार संघातील जनतेने महायुतीच्या २०१४ ते २०१९ या कालखंडातील कामगिरी असमाधानकारक असल्याबद्दलची नाराजी आपल्या मतदानातून व्यक्त केली आहे. एवढेच नव्हे तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रीमंडळातील चार कॅबिनेट मंत्री आणि सहा राज्यमंत्र्यांना राज्यातील जनतेने घरचा रस्ता दाखविला आहे. आता या पडलेल्या मंत्र्यांना पुन्हा मागच्या दाराने आमदार करण्याचा महायुतीने प्रयत्न केला तरीही एक गोष्ट त्यांना प्रकर्षाने लक्षात ठेवावी लागेल 'जो बूँद से गयी, वो हौद से नहीं आती ।'

प्रसार माध्यमांनी जे निवडणूक पूर्व अंदाज व्यक्त केले ते किती पूर्वग्रहदूषित, हेतूपुरस्सरपणे खोडकर व खेळी करणारे आणि विकावू बाजारी वृत्तीचे होते हे आता जनतेच्या लक्षात आलेले आहे. अर्थात मागील काही वर्षांपासून या प्रसार व प्रचार माध्यमांनी सर्व काही पैसे घेऊन विकण्याचेच ठरविले असल्यामुळे त्यांची विश्वासार्हता पूर्णपणे लयाला गेलेली आहे. आज 'पेड न्यूज'चे मोठे पेव फुटले आहे. माध्यमांचे प्रतिनिधी राजकीय पक्षांच्या नेत्यांबरोबर आणि उमेदवारांसमवेत तोडपाणीची भाषा करुन मोठमोठी पॅकेजेस त्यांच्यापुढे ठेवताहेत. त्यामुळे जनाधार नसलेल्या, सत्याचा अंशही नसलेल्या पण केवळ पैशाची झालर लावलेल्या खोट्या बातम्या अतिरंजीत वर्णने करुन लोकांच्या तोंडावर फेकल्या जाताहेत. ज्यांच्याकडे नंबर दोनचा पैसा आहे त्यांना तर लुटण्याचाच धंदा या माध्यमांनी राजरोसपणे सुरु केला आहे आणि जनताही 'हपापाचा माल गपापा' या न्यायाने त्याकडे उघड्या डोळ्याने पाहते आहे. जाहिरातींसाठी पैसे माध्यमांनी घेतले तर त्याबद्दल कुणाचीच तक्रार नाही. कारण जाहिराती हाच उत्पन्नाचा माध्यमांचा मुख्य मार्ग असतो हे जनतेलाही चांगले माहिती आहे. त्याबद्दल त्यांचे काहीही म्हणणे नाही. परंतु माध्यमे जेव्हा बातम्या विकून त्यांचा धंदा करु लागतात आणि सत्य-असत्याचे भान त्यांना जेव्हा राहात नाही तेव्हा जनतेच्या विचारांचा प्रक्षोभ होतो. वास्तविक **'बातमी'** या शब्दातच तिचा अर्थ दडलेला आहे. **जिच्यात 'बात' (खोटी गोष्ट) असत नाही आणि जिथे कुठेही 'मी' डोकावत नाही, त्याला 'बातमी' म्हणतात.** पत्रकारिता शिकताना जो अभ्यासक्रम शिकविला जातो त्यात बातमी ही पवित्र आहे, सत्य आहे असेच सांगतात. प्रत्यक्ष माध्यमे त्याच्या उलट वर्तणूक करतात. 'असत्यमेव जयते' हे जे ब्रीद आता प्रसार माध्यमांनी स्वतःच्या स्वार्थासाठी स्वीकारलेले आहे त्यामुळे माध्यमांची ताकद संपुष्टात येऊन विश्वासार्हता कवडीमोल झाली आहे. नव्हे नव्हे ती पूर्णपणे लयाला गेलेली आहे हेच या निवडणूक पूर्व निकालांनी पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

जनतेचे खरे मन अजून कोणालाच कळलेले नाही असे म्हटले तर ते वावगे वाटू नये. आत्तापर्यंत मनाला अनेक उपमा दिल्या गेल्या. पण तरीही मन म्हणजे नेमके काय? हा प्रश्न शिल्लकच राहिला. असं म्हटलं जातं की मन ही एक प्रक्रिया आहे. मनाला तसं अस्तित्वच नसतं. पण मनात सातत्याने येणाऱ्या विचारांमुळे त्याला अस्तित्व आहे असं वाटायला लागतं. मन तसं कळणं अवघड आहे. पैशाच्या मागे लागणाऱ्यांना तर ते कधीच कळणार नाही. सत्याचा अंगीकार केला असता तर मनाचा काही प्रमाणात अंदाज लागला असता. पण असत्यच स्वीकारल्यामुळे माध्यमांचे अंदाज उताणे पडले. यामुळे प्रसार माध्यमांची विश्वासार्हता पूर्णपणे संपुष्टात आली एवढे खरे!

**प्रबंध संपादकीय**



# जनतेने माज उतरविला

## संपादकीय



महाराष्ट्र आणि हरियाना राज्यात नुकत्याच विधानसभेच्या निवडणुका झाल्या. या निवडणुकीच्या निकालांनी विशेषतः भाजपचा उन्माद व माज पुरेपूर उतरविला आहे. भाजपचे महाराष्ट्रातील २२० पारच्या महाजनादेशाचे स्वप्न पूर्णपणे भंग पाऊन त्यांना १६१ जागांवरच थांबावे लागले आहे. या निवडणुकीत भाजपला १०५ तर शिवसेनेला ५६ जागा मिळाल्या आहेत.मागील (२०१४) निवडणुकीपेक्षा यावेळी भाजपच्या १७ आणि शिवसेनेच्या ७ जागा कमी झाल्या आहेत. महाराष्ट्रातील जनतेने काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस व समविचारी पक्षांच्या महाआघाडीला अत्यंत प्रेमाने आशीर्वाद दिल्यामुळे त्यांच्या जागांमध्ये वाढ होऊन ते शंभरीचा टप्पा ओलांडू शकले आहेत. भाजप-सेना युतीला किमान २२० ते कमाल २४० जागा मिळतील अशा वल्गना युतीचे नेते वारंवार मोठ्या उद्घोषाने व मोठ्या उच्चारवाने करीत होते. सगळी विकली गेलेली प्रचार व प्रसार माध्यमे आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया हे ही त्यांना साथ देत होते.परंतु युती सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे पोळली गेलेली जनता व विशेषतः ग्रामीण भागातला शेतकरी, मजूर, कामगार व बेरोजगार युवक-युवती हा वर्ग मस्तवाल झालेल्या सत्ताधाऱ्यांना धडा शिकविण्यासाठी आसुसलेला होता. या वर्गाने राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. शरद पवार यांच्या हाकेला साद व साथ दिली. त्यामुळे युतीचा बेभान होऊन चौखूर उधळलेला घोडा जागांच्या मूळ उद्दिष्टापर्यंतही पोहोचू शकला नाही.

हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी 'मेगाभरती'चे तत्त्व अवलंबिण्यात आले होते. त्यासाठी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसमधील मोठमोठ्या नेत्यांना अनेक प्रकारची अमिषे दाखविण्यात आली. जे अमिषांना बळी पडले नाहीत. त्यांना सीबीआय, ईडी, प्राप्तीकर, जीएसटी व अन्य चौकशांचा बडगा उगारून जेलच्या हवेची भिती दाखविण्यात आली. संस्थांमध्ये भ्रष्टाचार व गैरव्यवहार केलेले नेते तुरुंगाची हवा आपल्या अंगाला लागू नये म्हणून आपला सगळा गाशा व तंबू गुंडाळून युतीच्या भ्रष्ट कळपात घुसले. सगळ्या भ्रष्ट, नेत्यांना डीटर्जंट पावडरने धुऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'क्लीन' करून स्वच्छ व पावित्र्याचे 'सर्टिफिकेट' दिले. पण जनतेला सत्य माहित असल्यामुळे त्यांनी हे 'सर्टिफिकेट' टराटरा फाडून टाकले हे पक्ष सोडून पळालेल्या दिलीप सोपल, जयदत्त क्षीरसागर, वैभव पिचड, श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, पांडुरंग वरोरा, रश्मी बागल, हर्षवर्धन पाटील, मदन भोसले, भाऊसाहेब कांबळे, निर्मला गावीत, दिलीप माने, विलास तरे, शरद सोनवणे, बाळासाहेब सानप व अन्य नेत्यांच्या पराभवावरून आपल्या लक्षात येईल.

सत्ताधाऱ्यांनी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांवर प्रवेशासाठी आणलेला दबाव ही मानेवर परजून ठेवलेली सुरी होती. वाघ आणि सिंह यांच्या कचाट्यात एक कोकरू सापडले होते. प्रसंग बाका होता. सत्ताधाऱ्यांना टक्कर देणे सोपे काम नव्हते. अहंगंडाने पछाडलेले आणि स्वतःला वेगळे उच्चभ्रू समजणारे गणेश नाईक, भास्कर जाधव, राणा जगजितसिंह पाटील, सचिन अहिर, शिवेंद्रराजे भोसले यांच्यासारखे नेतेही भीती व घाबरगुंडीमुळे गर्भगळीत झाले आणि पक्ष सोडून पळून गेले. निष्ठा, श्रद्धा, स्वार्थासाठी क्षणार्धात विकल्या आणि 'विकावू बाजारु नेते' अशी स्वतःच स्वतःची प्रतिमा तयार करून घेतली. येशू ख्रिस्त नेहमी लोकांना सांगत असे, 'भीतीमुळे माणूस नीतिभ्रष्ट होतो. तो आपला आत्मा व स्वत्व गमावून बसतो. त्याच्या माणूसपणाचे अवमूल्यन होत असते.' एवढेच सांगून येशू थांबत नाही. ते पुढे म्हणतात, "I tell you, my friends, do not fear have no more that they can do... Fear not, you are of more value than many sparrows..." [Luke 12 : 4,7].

ज्यांनी कच खाल्ली ते भीतीने जातीयवादी व धर्मांध शक्तींच्या तंबूत घुसले. तह करून, शरणागती पत्करून, लाचार होऊन भेकडांचे जीवन जगण्याऐवजी लढाई करण्याचा दृढनिश्चय करून ते खंबीरपणे व धैर्याने उभे राहिले असते तर समाजात त्यांची किंमत व इभ्रत अधिक उंचावली असती. कारण शेवटी स्वातंत्र्य हा आपला श्वास आहे. स्वाभिमान हा त्याचा प्राण आहे आणि लढणे हा त्याचा बाणा आहे. युद्ध जिंकण्यासाठी शस्त्रे व साधनसामग्री पुरेशी नसते. त्यासाठी मने पेटून उठावी लागतात. भाजप नेत्यांनी हाती असलेल्या सत्तेचा व धनासह सर्व शक्तींचा सर्व मार्गांनी प्रचंड वापर करूनही त्यांना एक हाती सत्ता मिळविता आली नाही. इतकेच नव्हे तर बहुमताच्या उद्दिष्टापर्यंतही पोहोचता आले नाही. देहाच्या पलीकडे चिद्तत्व आहे. ते

तत्व माणसाला जगण्याचा अर्थ देत असते. शस्त्राने ते नष्ट करता येत नाही, अग्नीने ते जाळून टाकता येत नाही. त्याच्यातच माणसाचे अविनाशीपण सामावलेले असते. त्या आत्मतत्त्वाला जपणे हेच खरे माणूसपण असते. आत्मतत्त्वाची ओळख हा सत्याचा साक्षात्कार असतो. अशा प्रकारचे सत्य माणसाला खरी मुक्ती देत असते. ख्रिस्ताने पुन्हा पुन्हा आपल्या शिष्यांना सांगितले, "You shall know the truth and the truth will make you free." सत्याचा शोध घेण्यासाठी बाह्य स्वातंत्र्याची तर गरज असतेच पण अंतःकरणातल्या स्वातंत्र्याची ज्योतही तेवढीच तेवत राहणे आवश्यक असते. ज्यांच्या अंतःकरणातल्या आत्मतेजाच्या ज्योती विझल्या आणि पराभवाचे काजवे ज्यांच्या नेत्रांपुढे लुकलुकले तेच नेते पक्ष सोडून गेले पण कार्यकर्ते जागीच राहिले.स्वाभिमानी कार्यकर्त्यांनी 'शरद पवार' या दैवतावर आपली निष्ठा व श्रद्धा कायम ठेवून तुटपुंज्या का असेना पण स्वतःच्या ताकदीवर पूर्ण सामर्थ्यानिशी लढण्याचा प्रयत्न केला. सत्वपरीक्षेच्या आणि संघर्षाच्या प्रसंगी सामान्य माणसे व साधे तळागाळातले कार्यकर्ते लढतात. मात्र स्वार्थी, सत्तांध, भ्रष्ट व धनदांडगे नेते तत्त्वशून्य तडजोडी करून लाचारीचे जीवन जगणे पसंत करतात, याचे दर्शन संपूर्ण देशाला झाले आहे. अर्थात असा अनेक देशातील राजकीय नेत्यांचा इतिहास आहे. काही जण खुषमस्करे, तर काही जण खबरे बनतात आणि उदरनिर्वाह करतात. काही तर चक्क लोटांगण घालून सरपटायला लागतात. अशा प्रकारच्या घरभेद्यांची संख्या अल्पशी असली तरी सर्वत्र असते. त्यामुळे असल्या लोकांच्या जाण्याचे पक्षाला व पवार साहेबांनाही कधी दुःख झाले नाही. उलट ते गेल्याबद्दल खालच्या कार्यकर्त्यांनी पेढे व मिठाई वाटून आनंद व्यक्त केला हे चित्रही आपण 'चित्रा'च्या वेळी पाहिले आहे.

प्रेम आणि निष्ठा हा भावनांचा खेळ नसतो. कधी ऊन, कमी पाऊस असे निसर्गाचे स्वरूप असले तरी नेता आणि कार्यकर्ता यांच्यातले नाते संबंध अदृश्य अशा पोलादी भिंतीसारखे असते. ते तसे असते म्हणूनच पक्ष जिवंत असतो. दोन व्यक्तींनी परस्परांना केलेले ते उभ्या जीवनाचे दान असते. ही भिंत अभेद्य असते. शरद पवार यांनी वयाच्या ८० व्या वर्षी स्वतः धुवाँधार कोसळत्या पावसात सातारला जे तडाखेबंद भाषण केले ते पाहून जनतेच्या डोळ्यातूनही अश्रूंचा पाऊस कोसळला आणि ८० वर्षांच्या त्या तरुण जिद्दीला लाखो-कोट्यवधी लोकांनी व जनतेने मनोमन सलाम केला. इतकेच नव्हे तर आपले पवित्र मत काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस महाआघाडीला देऊन युती सरकारचा भरधाव सुटलेला घोडा मोठ्या हिमतीने रोखण्याचा निर्धार केला. शरद पवार यांच्यावर जनतेने हे जे प्रेम, विश्वास व श्रद्धा दाखविली त्याचे मोल व वर्णन करायला शब्द अपुरे पडतात.

माणसाच्या आत्म्यात प्रचंड ऊर्जा दडलेली असते. ती ऊर्जा त्याच्या बलदंड हातातून पात्यामध्ये संक्रमित होते.त्यामुळे पाते कठीण कातळ, पाषाण दुभंगीत असते. प्रेमाची उर्जाही अशीच प्रचंड असते. पवारांवरील प्रेमामुळेच जनतेने आपल्या हातातल्या मतदानाच्या शिक्क्यातून राजे-महाराजे, त्यांची संस्थाने आणि दुकानदारी क्षणार्धात उद्ध्वस्त करून होत्याचे नव्हते केले. आपल्या आत्म्यात दडलेल्या शक्तीचे दर्शन करीत मतदारांनी उदयनचा अस्त केला आणि श्रीनिवासचा उदय केला. श्रीनिवास म्हणजे श्रीकृष्ण. पापाचा घडा जेव्हा भरतो तेव्हा पाप्यांचे निर्दालन करण्यासाठी श्रीकृष्ण भूमीवर अवतरतो असे महाभारतापासून आपण पाहात आलो आहोत. इतिहासाची पुनरावृत्ती होते असे म्हणतात. ती सातारला घडली. कवी चंद्रशेखर गोखले यांच्या शब्दात सांगू का...

**सरपणासाठी तोडलेल्या ओंडक्याला**
**एकदा पालवी फुटली ।**
**त्यालाच कळेना ही,**
**जगायची जिद्द कुठली ? ।।**
**मरण दाराशी आल्यावर मी म्हटलं**
**तुला शंभर वर्ष आयुष्य आहे,**
**मरणही चाटं पडलं अन् म्हणाले,**
**काय हा मनुष्य आहे!।।**

माणसांना संकटांचे गिरीकंदर पार करण्याची आणि नक्षत्रांच्या कळ्या वेचण्याची ताकद अंतःकरणातील अदम्य प्रेमातून मिळत असते. ही प्रेमाची देवघेव पवार कुटुंबीय ८० वर्षांपासून (शारदाबाईंची २० वर्षे आणि शरदरावांची ६० वर्षे) अव्याहतरितीने व अखंडपणे करीत आहे. याला निस्वार्थतेची, निरपेक्षतेची, स्वार्थत्यागाची आणि अंतःकरणातील शुद्ध सात्विक सेवेची साथ आहे, जोड आहे. म्हणूनच घड्याळाची टिकटिक चालू आहे आणि राजकारणातले 'पवारपर्व' अढळपणाने एखाद्या दीपस्तंभासारखे राष्ट्रजीवनात परिवर्तन करण्याची इच्छा असणाऱ्या प्रत्येकाला मार्गदर्शन करीत, निष्ठेने उभे आहे आणि पुढेही उभे राहणार आहे. हीच पवारांची 'श्रीमंती' आहे. त्यामुळेच देवेंद्रला प्रचंड वल्गना करूनही राजकारणातून 'पवारपर्व' संपविता आले नाही. उलट खालच्या पातळीला जाऊन भाजपने प्रचार केल्यामुळे 'पवारपर्व' पुन्हा ठळकपणे अधोरेखीत होऊन देशाच्या राजकीय पटलावर जुनाच असलेला 'शरद पवार नावाचा तारा' नव्याने उदयोन्मुख झाल्यासारखा चमकू लागला आहे. माणसे ही पटावरील प्यादी असतात. त्यांना खेळवणारा 'खेळिया' निराळाच असतो. वरवर असंबद्ध वाटणाऱ्या घटनांमधून तो अदृश्य सूत्रधार इतिहासाला वळण देत असतो हे पवार साहेबांच्या रुपातून आपण पाहतो आहोत.

माणूस इतिहासाचा शिल्पकार असतो, तसा इतिहासही माणसाला घडवित असतो. ताडामाडाच्या उंचीच्या

उत्तुंग व्यक्तींची मुळे इतिहासाच्या भूमीत खोलवर पसरलेली असतात. तशीच स्वातंत्र्याची पाळेमुळे माणसाच्या मनाच्या मातीत खोलवर पसरलेली असतात. खोड जरी कापून टाकले, तरी मुळातून नवीन कोंब फुटत असतात याचे दर्शन काँग्रेस-राष्ट्रवादीतून जुने नेते गेल्यामुळे नव्याने आलेल्या तरुण, युवकांच्या प्रवेश व आगमनाने घडले आहे. या तरुणांच्या श्रमाला पक्षाने प्रेम, आपुलकी व सन्मानाची जोड दिली आणि पवारसाहेबांनी अचूक मार्गदर्शन केले त्यामुळे तरुणांचा व पक्षाचाही भाग्योदय झाला.

आत्म्याला आत्म्याशी जोडण्याची किमया फक्त शब्द करू शकतात. सार्वजनिक जीवनात कार्यरत असणाऱ्या माणसाच्या अनुभवाचे मूलभूत भागधेय म्हणून शब्द मानवी इतिहासात अस्तित्वात असतात. शब्द आपल्याला अनिर्वचनीय गूढाकडे घेऊन जातात आणि अपेक्षित कृती करायला भाग पाडतात. अर्थात हे शब्द कोण उच्चारतो, कुणाच्या मुखातून ते आकार घेतात हे फार महत्त्वाचे असते. व्यक्ती सामर्थ्यानेच शब्द ब्रह्माच्या जवळ ओढला जातो आणि देहरूप होऊन आपल्यामध्ये राहतो हे पवार साहेबांच्या सातारच्या पावसातील एका भाषणाने दाखवून दिले आहे. विधानसभा निवडणुकीला संपूर्ण वेगळी दिशा देणारे आणि जनसामान्यांची अंतःकरणे करुणेने भिजवूनही पेटवून उठविणारे हेच ते भाषण आहे. नव्हे नव्हे, ''मेणाहूनी मऊ आम्ही विष्णूदास । कठिण वज्रास भेदू ऐसे ।'' असे सांगणारे पवारांच्या भात्यातले हे कठोर वज्राघाती शब्द अनेकांचा त्रिफळा उडविण्यास कारणीभूत ठरले आहेत हे वेगळे सांगायची गरज नाही.

२०१४ ते २०१९ या पाच वर्षांत मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजप-सेना युती सरकारचा कारभार जनतेने पाहिला आहे. 'खोटं बोल आणि रेटून बोल' या पद्धतीच्या कारभाराला जनता पार विटली होती. २०१९ च्या लोकसभा निवडणुकात पुलवामा, बालाकोट, पाकिस्तानवर हल्ला, हिंदू-मुस्लिम तेढ वाढविणे, अयोध्येतील राममंदिर उभारणी असल्या भावनिक प्रश्नांच्या आधारे निवडणुका लढवून जनतेला मूर्ख बनविण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या जीवनाशी दैनंदिन संबंध असणारे उदा. महागाई, बेरोजगारी, आर्थिक मंदी, कर्जमाफी, शेतकऱ्यांच्या मालाला भाव नसणे, स्वामिनाथन कृषी मूल्य आयोगाची अंमलबजावणी, धनगर व मुस्लिम आरक्षण वगैरे. सर्व विषय सोडून दिले. सत्तेवर येण्यापूर्वी व आल्यानंतर दिलेल्या आश्वासनांचे नाव देखील निवडणुकीत काढले नाही. विकासाचा विषय पूर्णपणे सोडून दिला. भावनेला पेटवून मतांचा जोगवा मागितला. या परिस्थितीवर मार्मिक भाष्य 'माफीनामा' या कवितेत कवी हनुमंत चांदगुडे यांनी केले आहे. ते लिहितात...

**लोकशाहीच्या झाडाला**
**आश्वासनांची फांदी आहे**
**माणुसकीला चढलाय गंज**
**भामट्यांची चांदी आहे...**
**खुर्चीसाठी माकड उड्या**
**वांढपणा वाढतो आहे**
**बेकारांच्या वांझ गोठ्यात**
**लबाड धार काढतो आहे...**
**सत्तेच्या गव्हाणीत आता**
**मोकाट चरते ज्यांची गाय**
**आश्वासनांचा पाडून पाऊस**
**तेच खातात लोणीसाय...**
**गोरगरीब जनतेला या**
**हतबलता छळते आहे**
**हयात उलटून गेल्यावर**
**मृत्यू माफी मिळते आहे...**

लोकसभा निवडणुकीतील खोट्या भावनिक प्रचाराला जनता भुलली. पण निव्वळ भावनेवर पोट भरत नाही. त्यासाठी अन्नाचे दोन घास पोटात जावेच लागतात. या सत्याची जाणीव व खात्री जनतेला मनोमन पटलेली असल्यामुळे विधानसभा निवडणुकीतल्या काश्मीर ३७० कलम, राम मंदिर उभारणी असल्या भावनिक प्रश्नांना जनतेने थारा दिला नाही. अगदी पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा, देवेंद्र फडणवीस यांच्यापासून भाजपचे सगळे नेते ३७० कलम, काश्मीर या विषयांवर घसा फोडून फोडून बोलत होते. पण जनतेला या विषयाबद्दल तसूभरही आपुलकी व प्रेम नव्हते. आधी आमच्या प्रश्नांबाबत बोला अशी महाराष्ट्रातल्या जनतेची अपेक्षा होती. खोट्या कृतक राष्ट्रवादाचा प्रचार करून लोकांची दिशाभूल करता येते असे जे हिंदुत्ववादी शक्तींना वाटले ते महाराष्ट्राच्या सुजाण जनतेने हाणून पाडले.

देशात मोदी आणि महाराष्ट्रात फडणवीस सरकार सत्तेवर आल्यापासून ७० वर्षांत काँग्रेसने काय केले? ५० वर्षांत शरद पवारांनी महाराष्ट्रात काय केले? यांसारखे अर्थहीन व असंबद्ध प्रश्न विचारून पंडित नेहरूंपासून गांधी कुटुंबियांपर्यंत सर्वांवर टीका-टिप्पणी करणे ही एक फॅशनच झाली आहे. युती सरकारचा बदनामी करण्याचा हा अजेंडाच आहे. दुर्दैवाने तसे करताना नेहरूंनी हा देश घडविण्यासाठी केलेले अथक प्रयत्न आणि संसदीय लोकशाही, धर्मनिरपेक्षता, विज्ञान व तंत्रज्ञानाचा प्रसार, भारताच्या औद्योगिकरणाची मुहूर्तमेढ व भारताचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी केलेले पायाभूत प्रयत्न या सर्व बाबींचा अनेकांना विसर पडल्याचे दिसते. विशेषतः कलम ३७० च्या बाबतीत तर ते विशेषत्वाने दिसून येते. काश्मीर भारतातून फुटून बाहेर चालले होते आणि ३७० कलम रद्द करून आम्ही ते वाचविले हा भाजपने चालविलेला प्रचार अत्यंत खोटारडा आणि दिशाभूल करणारा आहे. काश्मीरच्या भारतातील सामीलीकरणाचा प्रश्न महाराजा हरिसिंग यांच्या पत्रान्वयेच

निकालात निघाला आहे. त्यानंतर इतर संस्थानांप्रमाणेच या संस्थानाच्याही विलीनीकरणाचा (इंटिग्रेशन) प्रश्न कलम ३७० खालील राष्टपतींनी काढलेल्या आदेशान्वये निकालात निघाला होताच, पण आता भारताची राज्यघटना पूर्णत्वाने काश्मीरला लागू झाल्याने या प्रश्नांवरही अखेरचा पडदा पडला आहे.

भारताचे माजी गृहसचिव व काश्मीर प्रश्नाचे अभ्यासक डॉ. माधव गोडबोले यांनी 'कलम ३७० -आग्रह आणि दुराग्रह' या शीर्षकाखाली सप्टेंबर २०१९ मध्ये एक १५० पानांचे पुस्तक लिहिले आहे. त्यात ते म्हणतात...

**''...राज्याचा दर्जा असलेल्या जम्मू व काश्मीरचे विभाजन करून त्याचे दोन केंद्रशासित प्रदेश करणे हे माझ्या दृष्टीने जखमेवर मीठ चोळण्यासारखे होते, यात शंका नाही. आजवर केंद्रशासित प्रदेशांचा दर्जा वाढवून त्यांना राज्याचा दर्जा दिला गेला आहे, पण राज्याचे रूपांतर केंद्रशासित प्रदेशात होण्याचे हे पहिलेच उदाहरण आहे..... केंद्रशासित प्रदेश या संकल्पनेलाच माझा ठाम विरोध आहे. स्वातंत्र्यानंतर काही काळ देशातील काही भागांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन त्यांना केंद्रशासित प्रदेश असे संबोधण्यात आले, पण ती कल्पना आता चालू ठेवावी, हेच मला योग्य वाटत नाही..... एकूणच या (केंद्रशासित प्रदेश) संकल्पनेचा फेरविचार करून देशातील सर्व केंद्रशासित प्रदेश हे जवळच्या राज्यात समाविष्ट केले पाहिजेत, असे माझे मत आहे आणि या विचाराला धरून लडाख हा केंद्रशासित प्रदेश करणे योग्य होणार नाही. कलम ३७० खालील या राज्याच्या विभागणीला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे आणि माझ्या दृष्टीने याबाबतीत घेतलेला निर्णय कायद्याच्या कसोटीला धरून होणार नाही. तेव्हा केंद्र शासनाने याबाबतीत फेरविचार करून या प्रदेशाला**

## फडणवीसांच्या लोकप्रियतेला ओहोटी

सतत खोटं बोलून जनतेला फसविणाऱ्या आणि अहंकाराने उन्मत्त झालेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लोकप्रियतेला ओहोटी लागल्याचे चित्र या विधानसभा निवडणुकीने स्पष्ट केले आहे. फडणवीस यांच्या स्वतःच्या पश्चिम नागपूर मतदारसंघात त्यांचे विजयाचे मताधिक्य मागच्या वेळेपेक्षा घटले आहे. मुख्यमंत्री होण्यापूर्वी म्हणजे २०१४ च्या निवडणुकीत जेवढे मताधिक्य मिळविले होते तेवढेही मुख्यमंत्री पदावर असतानाही त्यांना टिकविता आले नाही ही केवढी मोठी शोकांतिका आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या जागांमध्ये लक्षणीय घट झाली. स्पष्ट बहुमत भाजप मिळवू शकला नाही. एकट्याने सत्तेवर येण्याचा मनसुबा उधळला गेला. काँग्रेस-राष्ट्रवादीतून ओढून घेतलेले नेते कुचकामी व निष्प्रभ ठरले. आयाराम-गयारामांना मतदारांनी चांगलाच धडा शिकविला. जवळपास १९ आयारामांना जनतेने पराभूत केले. मेगाभरती अयशस्वी झाली. बाहेरून उसने घेतलेले नेते पक्षाला विजय मिळवून देऊ शकत नाहीत हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. मेगाभरतीसाठी मोठी दलाली करणारे गिरीश महाजन यांनाही खानदेशच्या जनतेने मोठी चपराक दिली. संपूर्ण खानदेशातील जागांची सुपारी घेऊन मुख्यमंत्र्यांच्या गोटात शिरलेल्या गिरीश महाजनांना जनतेने तोंडावर आपटून 'महाजनो येन गतस्य पंथा' ही संस्कृत म्हण खोटी करून दाखविली. वास्तविक या म्हणीचा अर्थ असा आहे की, महाजन ज्या रस्त्याने गेले त्याच रस्त्याने त्यांचे अनुकरण करीत आम्हींही त्यांच्या पाठोपाठ जाऊ, परंतु जनतेने गिरीश महाजन यांची राजकारणातील औकात लक्षात घेऊन आता त्यांच्या मागे न जाणे शहाणपणाचे आहे हे समजून घेतले आणि महाजनांनी सुपारी घेतलेल्या उमेदवारांना अस्मान दाखविले. देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदाची मागील ५ वर्षांची कारकीर्द अत्यंत अपयशी असून जनतेने त्यांना नापास केले आहे. केवळ मोदी आणि शहांची चमचेगिरी करून तुम्ही मुख्यमंत्रीपदी टिकू शकाल, पण जनतेच्या मनातले व लोकप्रिय मुख्यमंत्री कधीच होऊ शकणार नाही हाच इशारा जनतेने दिला आहे.



**परत राज्याचा दर्जा प्रदान करावा व जनभावनांचा आदर करावा, असे मी सुचवीन (पृ.२९-३०).**

**''... हे मान्य करावेच लागेल की, मनमोहन सिंग यांच्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने जितक्या सकारात्मक पद्धतीने काश्मीर प्रश्नाची सोडवणूक करण्याचे प्रयत्न केले, तेवढे त्यापूर्वीच्या वा नंतरच्या केंद्र शासनांकडून झाले नाहीत'' (पा.१०१) असे स्पष्टपणे नमूद करून पुस्तकाचा समारोप करताना शेवटच्या परिच्छेदात डॉ. माधव गोडबोले लिहितात,**

**''धर्माधिष्ठित द्विराष्ट्रवादाला भारताचा पहिल्यापासूनच सैद्धांतिक विरोध होता आणि त्याचे प्रतिबिंब भारताच्या धर्मनिरपेक्ष राज्यघटनेत पूर्णतः दिसून येते. सर्वोच्च न्यायालयाने धर्मनिरपेक्षता हा भारताच्या घटनेच्या मूलभूत ढाच्याचा भाग असल्याचे जाहीर केले आहे, पण आता या महत्त्वाच्या तत्त्वाला [धर्मांध व जातीयवादी शक्तींकडून] विरोध होताना दिसतो. ही अत्यंत अस्वस्थ करणारी बाब आहे. काश्मीरचा प्रश्न म्हणजे काश्मीर खोऱ्याचा प्रश्न आहे व तो हिंदू-मुसलमान प्रश्न असे समजणे हा धर्मनिरपेक्षता तत्त्वाचा पराभव म्हणावा लागेल. काश्मीर खोऱ्यातील अस्वस्थता आपण दूर करू शकलो नाही, तर भारताच्या धर्मनिरपेक्षतेलाच एक मोठा धक्का बसेल, यात मला शंका नाही. त्यामुळेच धर्मनिरपेक्षतेवर विश्वास ठेवणाऱ्या देशातील सर्व धुरिणांनी, अग्रणींनी, विचारवंतांनी, सामाजिक संस्थांनी व राजकीय पक्षांनी यात सक्रिय भाग घेऊन हा प्रश्न मार्गी लावणे आवश्यक आहे.''** [पा. १३०-१३१]

काश्मीरचा प्रश्न भारताच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे हे कोणी नाकारीत नाही. पण महाराष्टाच्या विधानसभा निवडणुकांशी त्यांचा काडीमात्र संबंध नाही हे भाजपवाल्यांच्या लक्षातच आले नाही. ते काश्मीर व कलम ३७० चेच तुणतुणे सतत वाजवित राहिले. त्याच प्रश्नावर मते मागत राहिले. शेवटी जनतेला सांगावे लागले की, आमच्या दृष्टीने रोजची रोजी रोटी, मीठ-भाकरी, नोकरी लागणे व ती टिकणे, धंदे, व्यवसाय व उद्योग सुरळीत चालणे, प्यायला व शेतीला पाणी मिळणे, पूर्णवेळ व पुरेशा दाबाने वीज मिळणे, कर्जमाफी मिळून सातबारा पूर्ण कोरा होणे, नवीन कर्ज मिळणे, शेतमालाला रास्त भाव मिळणे, शेतमाल विक्री, साठवणूक व प्रक्रियेसाठी मूलभूत सोयीसुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर) निर्माण करणे, वाहतुकीसाठी रस्ते चांगले करणे, शिक्षण व आरोग्याच्या सुविधा गावोगावी पुरविणे हा आमचा प्राधान्यक्रम आहे. या कामांसाठी मत मागा. काश्मीर आणि राम मंदिराच्या नावावर मते मागू नका ही मतदारांची सर्वसाधारण भूमिका होती आणि आहे देखील.

लोकांच्या पुढचे जे जीवन-मरणाचे प्रश्न होते ते शरद पवार यांनी आणि विरोधी पक्षांनी ठोसपणे मांडले. विशेषतः ग्रामीण भागातील लोकांच्या मनात जो प्रचंड असंतोष होता तो शरद पवार यांनी बरोबर पकडून आपल्या झंझावती दौऱ्यातून सभा, पत्रकार परिषद, रोड शो, प्रसार माध्यमांनी घेतलेल्या मुलाखती, निवेदने याद्वारे तो अचूकपणे जनतेसमोर मांडला. मात्र हा असंतोष लोकांच्या मतामध्ये परिवर्तीत करण्यासाठी ज्या प्रकारची संघशक्ती आवश्यक होती ती समर्थपणे उभी करण्यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व महाआघाडीतले घटक काही कारणांमुळे कमी पडले. काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाने निवडणुकांकडे जवळपास पाठ फिरविली. त्यामुळे भाजपचा खोटा प्रचार खोडून काढून सत्य सर्व जनतेपर्यंत पोहोचविण्यात विरोधक काही प्रमाणात कमी पडले. भाजप व शिवसेनेतील बंडाळी व बेबनावाचाही योग्य असा वापर विरोधकांना करता आला नाही. मुक्ताईनगर, मावळ या मतदारसंघांचा कदाचित त्याला अपवाद असेल.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (शिखर बँक) घोटाळा प्रकरणात शरद पवार यांचे नाव घालून त्यांना 'ईडी' ची नोटीस काढण्याचे प्रकरण सरकारच्या चांगलेच अंगलट आले. पवारांवर सरकारने हेतूपुरस्सर व दुष्टबुद्धीने केलेली कारवाई जनतेला नाही आवडली, नाही पसंत पडली, तिथूनच लोकक्षोभाला सुरुवात झाली. जनता खवळून उठली. बंद, मोर्चा, रास्ता रोको, निदर्शने, मूक मोर्चा, निषेध, निवेदने अशा विविध मार्गांनी जनतेने गावोगावी आंदोलने करून केंद्र व महाराष्ट्र सरकारचा निषेध केला. वातावरण बदलायला येथूनच प्रारंभ झाला. कार्यकर्त्यांची सटकली, त्यांनी मरगळ झटकली. ते पेटून उठले. पक्षात नवचैतन्य आले. तरुण व नवयुवक कार्यकर्त्यांचे बाहू फुरफुरले. शरद पवार, अमोल कोल्हे, अजित पवार, जयंत पाटील, सुप्रिया सुळे, धनंजय मुंडे, छगन भुजबळ यांच्या भाषणांनी महाराष्ट्र ढवळून निघाला. सर्वांवर कडी केली ती पवार साहेबांच्या सातारा येथे भर पावसात भिजत केलेल्या भाषणाने. भर कोसळत्या पावसात ओलेचिंब होऊनही पवार साहेब शब्दांचे बॉम्ब फेकतच राहिले.

**पावसातल्या भाषणाने,**
**केली कमाल मोठी,**
**वा मान गये उस्ताद**
**हाच शब्द प्रत्येकाच्या ओठी ।।१।।**
**भिजलेल्या थरथरत्या शब्दांना**
**चढली धार तलवारीच्या पातीची,**
**उदयनला चाखावी लागली**
**चव मोठ्या पराभवाची ।।२।।**
**कमळाबाईचाही उतरला माज**
**धनुष्यबाण झाले रिते,**
**शरदाचे जुने जाणते चांदणे**
**घाव घालूनी फुलले होते ।।३।।**
**या झाडाखालून त्या झाडाखाली**

**जाण्याची नित्य सवयच ज्यांची,**
**जनतेने दाखविली ताकद त्यांना**
**स्वाभिमानी संघटित मताची।। ४।।**

संपूर्ण देशभरच नव्हे तर जगभर व्हायरल झालेल्या साताराच्या भाषणामुळे ८० वर्षांचा एक तरुण मोठ्या जिद्दीने आखाड्यात उतरून एकटाच सगळ्या विरोधकांना घुमवून भारी पडतोय, असे निर्माण झालेले चित्र मोठे विलोभनीय व एकहाती ताकदीचे दर्शन घडविणारे होते. सर्वत्र त्याचीच चर्चा होती. त्याचा मोठा फायदा विरोधी पक्षांना झाला.

या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस-राष्ट्रवादीने ग्रामीण भागात चांगली कामगिरी बजावली. परंतु शहरी भागामध्ये आणि विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे शहर, औरंगाबाद, नाशिक या शहरी भागांमध्ये सत्ताधाऱ्यांना पुढावा मिळाल्यामुळेच भाजप-सेनेचे सरकार सत्तेवर येत आहे. त्यामुळे विरोधी पक्षांना यापुढील काळात शहरी भागांवर जास्त लक्ष केंद्रित करणे आवश्यक होऊन बसणार आहे. कारण जवळपास निम्मा मतदार वर्ग आता शहरी भागात राहतो आहे. शहरे दिवसेंदिवस वाढतच जाणार आहेत.

महाराष्ट्र आणि हरियानातील निवडणुकांबरोबरच देशातील इतर ५२ विधानसभा पोटनिवडणुकांचे निकाल जाहीर झाले आहेत. त्यात भाजपाला फक्त १७ आणि काँग्रेसला १४ जागा मिळाल्या आहेत. या सर्वांवरून देशाच्या राजकारणात एक पक्ष प्रमुख पद्धती (वन पार्टी डॉमिनन्स) अस्तित्वात येऊ शकणार नाही हे सिद्ध झाले आहे. काँग्रेस पक्षाने उभारी घेतली, नेतृत्व योग्य मिळाले आणि समविचारी पक्षांनी आघाडी करून एकजीवाने व संघटितपणे व्यवस्थित आखणी करून निवडणूक लढविली तर आता होऊ घातलेली झारखंड व अन्य राज्यांच्या निवडणुकीत भाजपला ते सहज धूळ चारू शकतील असे वातावरण देशभर आहे. त्याचा फायदा उठविण्यासाठी विरोधकांनी एकजुटीने लढण्याची तयारी ठेवली पाहिजे.

प्रकाश आंबेडकरांच्या वंचित विकास आघाडीचा निवडणूक लढविण्याचा मुख्य हेतू भाजप-सेनेला मदत करणे हाच आहे आणि हाच होता हे आता लपून राहिलेले नाही. भाजपची 'बी टीम' म्हणजे 'वंचित आघाडी' असे म्हटलेले आंबेडकरांना आवडत नाही. ते लगेच बदनामीचे दावे लावण्याची भाषा करतात. परंतु वंचितच्या नावाखाली दलित व बहुजन कार्यकर्त्यांना लढवून आपण त्यांचे आणि महाआघाडीच्या उमेदवारांचे तर नुकसान करतोच पण त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे घटनातज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या विरोधी असलेल्या धर्मांध व जातीयवादी शक्तींना प्रकाश आंबेडकर कळत-नकळत म्हणा किंवा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष म्हणा मदतच करताहेत. हे त्यांना कळत नाही अशातला भाग नाही. त्यामुळे रामदास आठवले आणि प्रकाश आंबेडकर या दोघांत काहीच फरक नाही. फरक असलाच तर तो इतकाच आहे की रामदास आठवले उघडपणे तर प्रकाश आंबेडकर छुप्या रितीने, लपूनछपून मदत करताहेत. हे वागणे म्हणजे 'मी नाही त्यातली आणि कडी लावा आतली' यासारखे आहे. तेव्हा दलित, वंचित व बहुजन समाजानेही प्रकाश आंबेडकरांच्या मागे आपण किती वाहत जायचे याचा एकदा गंभीरपणे विचार केला पाहिजे आणि स्वतःच्या स्वार्थासाठी सगळा समाज जर ते वेठीला धरत असतील तर हे पाप कुठे फेडाल? असा रोखठोक सवालही त्यांना विचारण्याचे धाडस केले पाहिजे.

**'हम करे सो कायदा'** या पद्धतीने आज देश व राज्याचा कारभार चालू आहे. सर्वत्र अघोषित आणीबाणीसारखे वातावरण आहे. सारे जण भिती व दडपणाखाली आहेत. हुकुमशहांना बंदुकीच्या गोळीपेक्षा विचारवंतांची अधिक भीती वाटत असते. आणीबाणीत पहिला अंकुश अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर येतो, हे आपण आपल्या देशात पाहिले आहे. सरकार विरोधी मत प्रदर्शन करणाऱ्या काही विचारवंतांना आज तुरुंगाची हवा खावी लागत आहे. काहींना नोकरी गमवावी लागली आहे. राजीनामा देऊन देश सोडून जावे लागले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर शरद पवार यांच्यासारखा एकमेव बुजुर्ग नेता खंबीरपणे उभा राहून **'दिल्लीच्या तख्तापुढे मराठा कधी झुकत नाही'** हे कृतीतून दाखवून देतो आहे. म्हणूनच पवारांची सर्वांना भीती आहे. त्यामुळे मोदी-शहांपासून 'चंपा'पर्यंत सारे जण शरद पवारांना टार्गेट करून त्यांच्यावरच टीकेचा भडीमार करताहेत. पण जनतेलाही सत्य कळून चुकले आहे की, ज्या झाडाला फळं लागतात त्यालाच लोक दगडी मारतात. वांझोट्या आणि वठलेल्या झाडांकडे कुणी ढुंकूनही बघत नाही. पण यापुढे कोणी उपरे बाहेरून येऊन महाराष्ट्रातल्या जनतेला प्रश्न विचारणार असतील की पवारांनी ५० वर्षांत महाराष्ट्रासाठी काय केले? तर त्याला कार्यकर्त्यांनी आणि जनतेने जोडा काढून हाणले पाहिजे व हा प्रश्न विचारण्याचा अधिकार तुम्हांला कोणी दिला असा प्रतीप्रश्न केला पाहिजे. मऊ लागले की लोक कोपराने खणतात म्हणून जशास तसे वागण्याची भूमिका कार्यकर्त्यांनी स्वीकारली पाहिजे. विचारांची लढाई विचारांनीच लढली पाहिजे हे तत्त्वतः आम्हालाही मान्य आहे. परंतु जाणीवपूर्वक व हेतुपुरस्सर कोणी अविचाराने लढत असेल तर त्याचे टाळके बुटानेच सडकले पाहिजे याविषयी कोणाचेही दुमत होणार नाही. सुज्ञास अधिक सांगणे न लगे!

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते झाला. त्यावेळी त्यांनी केलेले मार्गदर्शन...

# जनतेच्या प्रश्नांशी समरस व्हा...



विधानसभा निवडणुकीचा एक महत्त्वाचा टप्पा या ठिकाणी संपन्न झाला. या वेळी थोडी अडचणीची स्थिती होती. देशात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांबद्दल एक वेगळे वातावरण तयार केले होते. कोणी दहाचा अंदाज देत होतं, तर कोणी बाराचा देत होतं, तर कोणी सोळाचा अंदाज देत होतं. कोणी वीसचा अंदाज देत होतं. त्यामुळे साहजिकच पक्षामध्ये आस्था असणाऱ्या आणि पक्षाची काळजी घेणाऱ्या कार्यकर्त्यांची मानसिकता चिंतीत झाली होती. पण एकदा आपण बसून ठरवले की, आलेल्या परिस्थितीवर मात करण्याची खबरदारी आपण घेतली पाहिजे. आणि मला एका गोष्टीचा आनंद आहे की, आपण एकदा ठरवलं, तर लहान थोर कार्यकर्ता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जातो. पडेल ती कष्ट करण्याची तयारी ठेवतो. आणि यश मिळवून देतो. हा इतिहास तुम्ही घडवला. त्याबद्दल तुमचं सर्वांचे कौतुक करतो.

सर्व पदाधिकारी आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, सगळ्यात शेवटी खाली काम करणारा कार्यकर्ता, या सगळ्यांनी कष्ट केले. काँग्रेसचे सहकार्य मिळाले. शेतकरी कामगार पक्षाची साथ मिळाली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेची साथ मिळाली.



कवाडेंच्या नेतृत्वाखालील आंबेडकरी विचारांच्या जनतेची साथ मिळाली. या सगळ्या साथींमुळे आपण 54 जागांवर येऊन पोचलो. आज आपला आकडा हा शिवसेना व भाजप हे सत्ताधारी पक्ष सोडल्यानंतर क्रमांक एकचा करण्याचा प्रयत्न तुम्ही लोकांनी केला. त्यामुळे तुम्हा लोकांचे अभिनंदन करणे, हे माझे कर्तव्य आहे.

या निवडणुकीत लोकांची साथ मिळाली. तरुणांची साथ मिळाली. आणि ज्यावेळी अशी साथ मिळते, त्यावेळी आपल्या जबाबदाऱ्या फार वाढत असतात. आणि आज कोणी विजयी झाले म्हणून आनंद आहे. पराभूत झाले म्हणून दुःख मानण्याचे कारण नाही. पण, आता जी जबाबदारी आहे, त्यात आधीच्या सहकाऱ्यांनी सांगितले की, आपल्याला दोन तीन गोष्टीत महत्त्वाचे काम करायचे आहे. एक, आज शेतीची अवस्था बिकट झाली आहे. मध्यंतरी दुष्काळाची स्थिती होती. आता अतिवृष्टी झाली आहे. आज नाशिकसारखा जिल्हा जिथं फळबागाचं चांगलं काम झाले. तिथं फळबागा उद्ध्वस्त होत आहेत. आणि हे फक्त नाशिकमध्येच नाही, तर जिथे जिथे असं पीक घेतलं जातं, तिथं तिथं हे संकट आलेले आहे. इतर पिकं

पण आहेत. सोयाबीनसारखं पीक आहे. ते मला जातायेता दिसतं की, सोयाबीनची शेंग कुजलेली आहे. कोल्हापूर आणि सांगली भागामध्ये उसाचे पीक घेतले जाते. त्याही ठिकाणी मध्यंतरीच्या महापुराच्या वेळी तिथली शेती धोक्यात आलेली आहे. म्हणून आपल्याला या सगळ्या प्रश्नात लक्ष घालावे लागेल. शेती अर्थव्यवस्था संकटात येण्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे आत्महत्यासारखे प्रश्न वाढत आहेत. या प्रश्नामध्ये सखोल अभ्यास करून त्या त्या भागातील गरजा लक्षात घेऊन या शेतकऱ्यांशी समरस होण्याची भूमिका ही तुमची, माझी व सर्वांची आहे. त्यासाठी आम्ही काही जाणकारांची मदत घेतोय. कृषी विद्यापीठातील तज्ज्ञांना आपण एकत्रित करतोय. त्यांच्याकडून सल्ला घेतोय. त्यांच्याकडून कार्यक्रमाचा आराखडा तयार करतोय. आणि तो तुमच्यापर्यंत पोचवून तो तुम्ही खालपर्यंत राबविण्याची काळजी घेतली पाहिजे. हा महत्त्वाचा कार्यक्रम आपल्या सगळ्यांना राबवायचा आहे.

दुसरा महत्त्वाचा प्रश्न आहे, आज महाराष्ट्राचे नाव उद्योगधंद्यासंबंधी देशात आहे. पण, आज काय चित्र दिसत आहे. अनेक कारखाने आज बंद आहेत. मी निवडणुकीवेळी यवतमाळमध्ये गेलो होतो. तेथील कार्यकर्त्यांनी माझी राहण्याची व्यवस्था रेमंडच्या गेस्ट हाऊसमध्ये केली होती. ते गेस्ट हाऊस



एमआयडीसीमध्ये येतं. मी सकाळी उठल्यानंतर चक्कर टाकली, त्या ठिकाणी लोकांना विचारले, तर 60 टक्के कारखाने बंद होते. आणि राहिलेले 40 टक्के कारखाने होते, त्यात तीन शिफ्ट असतील, तर एकच शिफ्ट कशीबशी चालली. हजारो लोकांची नोकरी गेली. नाशिकमध्ये गेल्यानंतरही त्या ठिकाणी मला कार्यकर्त्यांचा संच भेटला. लोक औद्योगिक वसाहतीत काम करत होते. ते सांगत होते की, एका महिन्यामध्ये 16 हजार कामगारांची नोकरी गेली. एका शहरात. एका औद्योगिक वसाहतीत. आणि आज महाराष्ट्रातील असे अनेक जिल्हे आहेत की, जिथे औद्योगिक वसाहती आहेत. 50 टक्के कारखाने बंद आहेत. राज्य आणि केंद्र सरकार ते सुरू करण्यासाठी पाऊल टाकत नाहीत. हजारो कष्टकऱ्यांचे संसार उद्‌धवस्त होण्याची वेळ आली. त्यामुळे आपल्या भागातील लोकप्रतिनिधींनी मग तो आमदार असो किंवा नसो, त्यांनी या कामात मुख्यत्वे लक्ष घालायचे आहे की, हे कारखाने सुरू झाले पाहिजे. कामगार टिकला पाहिजे. त्यासाठी जे जे करावे लागेल, त्यासाठी आपल्या पक्षाचा एक लहानसा ग्रुप आपण तयार करतोय. आणि त्यांच्यावर ही जबाबदारी टाकतोय की, संबंध महाराष्ट्राचा अभ्यास करून या कामात एक प्रकारची जागृती करून सरकारला जागे करणे व आग्रह धरणे. या कामासाठी विशेषतः शशिकांत शिंदे ते





**जयंत पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन शरद पवार यांचे स्वागत केले,**

आपल्या कामगार संघटनेत अनेक वर्षांपासून काम करत होते. दुर्दैवाने त्यांना यश मिळाले नाही. आणि जितेंद्र आव्हाड की, ज्यांचा मतदारसंघ ठाण्यात आहे. या ठाण्याच्या परिसरात अनेक मोठे उद्योग होते. ते उद्योग आज बंद पडलेले आहेत. त्यामुळे त्या ठिकाणची स्थिती काय आहे, याची कल्पना त्यांना आहे. या सहकाऱ्यांनी संबंध राज्याचा अभ्यास करून या संबंधी काय काळजी घ्यावी, हे काम आपण त्यांच्याकडे सोपवत आहोत.

तिसरा महत्त्वाचा प्रश्न आहे की, या निवडणुकीत आपण पाहिले की, तरुणांची शक्ती उभी राहिली. या तरुणांमध्ये उत्साह होता. त्या उत्साहाला योग्य दिशा दिली नाही, तर नैराश्य निर्माण होईल. आणि हा नैराश्य निर्माण झालेला वर्ग सामाजिक शांततेसाठी अडचणीचा ठरू शकतो. म्हणून बेरोजगारांच्या हाताला काम, या प्रश्नातही आपल्याला लक्ष घालायचे आहे. आपल्याकडे तरुणांमध्ये काम करणारे मेहबूब शेख, सूरज चव्हाण, रवीकांत वरपे या आपल्या तरुण सहकाऱ्यांवर आपण काम सोपवणार आहोत. या कामालाही एक गती देणे, एक जागृती देणे यासाठी आपल्याला अधिक कष्ट घ्यावे लागतील.


आज आपल्याला निवडणुकीमध्ये एक गोष्ट दिसली की, आपण निवडणुकीमध्ये कमी कोठे पडलो, तर आपण नागरी परिसरामध्ये कमी पडलो आणि विशेषतः मुंबई आणि ठाणे या परिसरामध्ये. या नागरी भागातले अनेक प्रश्न आहेत. मध्यंतरी मुंबई आणि त्या भागातील काही प्रश्नांसंबधी विद्या चव्हाण आणि काही सहकारी आले होते. आणि एकट्या मुंबईमध्ये लोकलने प्रवास करणाऱ्यांचे चित्र आम्हा लोकांसमोर ठेवले. एवढी कठीण व दयनीय परिस्थिती दैनंदिन जीवनामध्ये आहे. आणि त्यांनी आकडेवारी दिली की, आपल्या रेल्वेमध्ये मुंबईत रोज अकरा माणसे मृत्यूमुखी पडतात. लोकलमध्ये झालेल्या अपघातातून आणि ज्यांचा हातपाय मोडला. जखमी झाले, असा आकडा फार मोठा आहे. मला खरं तर कौतुक वाटतं या मुंबई आणि उपनगरामध्ये राहणाऱ्यांचं. तुम्ही कल्पना करा की, ती गृहीनी सकाळी चार वाजता किंवा पाच वाजता उठत असेल, स्वयंपाक करून नवऱ्याचा डबा घेऊन जात असेल. त्यांची एक भाषा असते, सात चाळीस, आठ दहाची, म्हणजे या ट्रेन. आणि गडबडीत त्या ट्रेनमध्ये जायचे आणि परत संध्याकाळी यायचे. आणि घरची जबाबदारी सांभाळायची. एक प्रचंड टेन्शन. दैनंदिन जीवनामध्ये रोज टेन्शन. आणि हा प्रश्न काही लाखात आहे. जो रोज दृष्टीस पडतो. मला वाटतं की, या प्रश्नाकडे आपल्याला गांभीर्याने लक्ष द्यावे लागेल. नवाबभाई आणि बाकीचे जे सहकारी आहेत. ठाण्याचे सहकारी आहेत. यांना विचारून घेऊ की, यात काय केले पाहिजे. अशा नागरी प्रश्नांमध्येही आपल्याला अधिक लक्ष द्यावे लागेल. असे अनेक प्रश्न आहेत. त्यात लोकांच्या सुखदुःखात सहभागी होऊन समरस होण्याचा परिचय हा सर्वसामान्य माणसाला झाला पाहिजे. या पद्धतीची पावले आपल्याला टाकायची आहेत. लोकांनी निवडून दिले. त्यांनी त्यांचे काम केले. आणि आता आपली जबाबदारी आहे की त्यांच्या मूलभूत प्रश्नाशी समरस होणे.

**विधानसभेचे माजी अध्यक्ष दिलीप वळसेपाटील यांचा ६३ व्या वाढदिवसानिमित्त प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. यावेळी फलटणचे आमदार दीपक चव्हाण आणि विक्रमगडचे आमदार सुनिल भुसार यांचाही त्यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.**





Best Compliments



# पवारसाहेबच एक नंबर

## श्रीनिवास पाटील यांचे गौरवोद्‌गार


ज्या तरुणाने राष्ट्रवादी पक्ष स्थापन केला, त्या पक्षाचे ज्यांनी सुरूवातीपासून नेतृत्व केले. काही पक्षांना निवडणूक आयुक्तांच्या मान्यतेसाठी दहा दहा वर्षे झटायला लागले, पण, ज्यांनी तीन महिन्यात झालेल्या निवडणुकीतही निवडणूक आयुक्तांची मान्यता मिळवून दिली, ते आमचे नेते, आदरणीय पवारसाहेब. ज्यांची निवड आपण सगळ्यांनी केली, ते अजितदादा. नावातच अजित आहे. कोणीही टक्कर देऊ शकत नाही, असा स्वभाव. सच्चा कार्यकर्ता, सामान्य माणसाचा मित्र. रात्री बारा वाजता फोन केला, तरी फोन घेणार. 1 लाख 65 हजारांच मताधिक्य कोणालाही पडत नाही. बारामती शहरातलं पूर्णपणे औद्योगीकरण झाल्यानंतर एक तालुक्याचं गाव एवढ्या सुंदररितीने वसवलं जातं. तिथं विमानतळ होतं. तिथं तारांकित हॉटेल होतात. त्याकरिता प्रयत्न केलेले अजितदादा. आमची मुलगी सुप्रिया. स्वभावाने अत्यंत मऊ. कोणाच्या काळजात रुतणार नाही, अशी आमची ती कन्या. साताऱ्यात पावसात सभा झाली. आणि मुख्यमंत्री म्हणतात, पावसाचा आम्हाला काही अनुभव नाही. आम्ही काळ्या मातीतली माणसं आहोत. कुळवं धरला आणि पेरणी सुरू झाली आणि पाऊस सुरू झाल्यावर शेतकऱ्याला जो आनंद होतो, तोच आनंद शरद पवारांना पावसाचा झाला. तो संपूर्ण महाराष्ट्राला झाला. मी सहज मागं जाऊन उभा राहिलो. आणि ते इतकं व्हायरल झालं. 61 वर्षांची मैत्री. आता जर कोणाला विचारलं, शरद पवारांचे जवळचे मित्र कोण, तर श्रीनिवास पाटील नाव येतं. याचा आनंद किती मोठा आहे.

पवारसाहेबांनी आणखी चार पाच सभा घेतल्या असत्या तर चित्र बदललं असतं. थोडा उशीर झाला. दादा म्हणतात, गेले ते गेले, पण उरलेली काही मंडळी, काही काही कारणानं थोडी घसरली, दुर्दैवं आहे. मला तर 26 तारखेला सकाळी साहेबांनी सांगितले की, कागदपत्रं गोळा करा आणि फार्म भरा. बाकी काहीही नाही. मी 27 पानांचं स्टेटमेंट भरलं. साहेबांनी एकच सल्ला दिला. सातारच्या पावसाची आणि शेतकऱ्यांची पोरं आम्ही आनंदित झालो. उड्या मारायला लागलो आणि मला तर शेवटची दोनच मिनिटे मिळाली. आणि मी म्हणालो, मान छत्रपतीच्या गादीला आणि मत मात्र राष्ट्रवादीला. अमोल कोल्हे माझ्या बरोबर होते. आम्ही दोघांनी




उदयनराजे भोसले यांचा पराभव करून सातारा लोकसभा मतदारसंघातून पोटनिवडणुकीत विजयी झालेले खासदार श्रीनिवास पाटील यांचा पुष्पगुच्छ देऊन जयंत पाटील यांनी सत्कार केला. तेव्हा शेजारी रामराजे नाईक निंबाळकर, छगन भुजबळ आणि सुप्रिया सुळे

काही काही जुळवणी केली होती. पाऊस पडत होता. मला दादा कोंडकेंची आठवण झाली, ढगाला लागली कळं आणि तुमची सगळी मतं राष्ट्रवादीला मिळं. एवढंच. माणसांनी प्रेम केलं. निवडणूक लोकांनी हातात घेतली. पवारसाहेबांनी तीन वेळा पाठिंबा देऊन ज्यांनी सत्ता उपभोगली, त्या माणसाला कोणतेही कारण नसताना मोदी बागेत सकाळी 9 ते 11 जाऊन साहेबांना विश्वास दिला की, कुठेही पाठवा. आणि दुपारी पक्षांतर केले. पक्षांतर करणाऱ्या माणसाला धडा मिळतो, हे पवारसाहेबांमुळं झालं. त्यांचा मनापासून आभारी आहे. मग 2024 असूद्या कदाचित अल्याड असूद्या. जे काही असेल त्यात धडाका लावू. मला काय 26 तारीख ते 13 तारीख फक्त पाच- सहा दिवस. माझे सगळे आमदार बाळासाहेब पाटील, मकरंददादा पाटील, शशिकांत शिंदे, पृथ्वीराजबाबा चव्हाण, पाटणकर सरकार, इतक्या माणसांनी उचलून धरल्यावर, खरं तर चारच माणसं लागतात, पण सहा माणसांनी उचलून धरल्यावर काय. आनंदाची गोष्ट आहे की, जिथं मी जातो तिथं लोकं फोटो काढताना म्हणतात की, मिशांवर ताव द्या. काय गंमत आहे. परमेश्वराची कृपा आहे. साहेबांचा आशीर्वाद आहे. जितेंद्र असूद्या. जयंतराव असूद्या. मी त्यांचा खासदार होतो. ते अर्थमंत्री झाले आणि महाराष्ट्राचे चित्र बदलून गेले. अशी महाराष्ट्राच्या मातीतली माणसं. साहेबांचं परवाचं स्टेटमेंट मला खूप आवडलं. मी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला आणि तरुण उमेदवारांना पाठिंबा दिला. आमच्यापेक्षा तरुण मुलगा साहेब हेरतायेत, शोधतायेत. तेव्हा कृपा करून काम करा. परळीतून निवडून आलेला माझा छोटा भाऊ, त्याने तर कमालच केली. कमीत कमी 10 किलो वजन कमी झालं. एवढा साधा माणूस. त्याने विरोधी पक्षनेतेपद गेली पाच वर्षे विधान परिषदेत सांभाळलं. आक्रमक स्वाभावाचा, सत्य सांगणारा आण भगवानगडावर प्रेम करणारा. हा तरुण आमदारा झाला. म्हणून तुम्हा सर्वांचे मनापासून अभिनंदन करतो. भारत भालके आमदार झाले. नवीब मलिक अणुशक्तीनगरमधून आमदार झाले. त्यांचे अभिनंदन करतो. मी आणि साहेब आम्ही दोघं 79 चे आहे. ते दोन महिन्यांनी वडिल आहेत आणि माझा नंबर नेहमी दोन असतो. लोकं म्हणायची दोन नंबर का. कारण एक नंबर ते आहेत. कोणासाठी तर शरद पवार एक नंबर. पहिल्या निवडणुकीमध्ये वाजपेयी सरकार एक मताने पडले आणि मला उमेदवारी मिळाली. मी काय म्हणायचो, तुमचं एक मत मला आणि माझं एक मत शरद पवारांना. गाडीला इंजिनाशिवाय ताकद नाही. ते इंजिन शरद पवार आहेत. आणि दोन नंबरचा डबा आम्ही. तेव्हा आदरणीय पवारसाहेबांची ताकद, विश्वास, ठेवून अर्ध्या रात्रीही उठून मदत करणारा मनुष्य आहे. तुमचं आपरेशन असू किंवा शिक्षणाकडे दुर्लक्ष असो. आरोग्याचा काही प्रश्न असो. एकदा त्यांचा मतदारसंघ बघा. महाराष्ट्राचे चार वेळा मुख्यमंत्री झाले. वयाच्या 38व्या वर्षी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. यशवंतरावांचे मानसपुत्र, आबासाहेब कुलकर्ण्यांचे शिष्य, एवढा मोठा यशवंत नेता, आपल्या इच्छित स्थानी बसावा, अशी आपली अनेक वर्षांची इच्छा आहे. ती पूर्ण व्हावी, अशी पांडुरंग चरणी प्रार्थना करतो.



## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांच्या सत्काराच्या निमित्ताने मुंबईतील राष्ट्रवादी भवनात झालेल्या समारंभातअजित पवार यांनी केलेले भाषण...

# पवारसाहेबांमुळे मिळाली राष्ट्रवादीला नवीन उभारी



नवनिर्वाचित आमदारांनी माझी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या गटनेतेपदी निवड केल्याबद्दल मी आपल्या सर्वांचे मनापासून आभार मानतो, धन्यवाद देतो. दिवाळीच्या सर्वांना शुभेच्छा देतो.

प्रांताध्यक्षांनी आपल्या प्रास्ताविकात राज्यातील विधानसभेच्या निवडणुकीचा साधारण अहवाल ठेवण्याचा प्रयत्न केला. खर तर आपण सगळे निवडून आलेलो आहोत. झाले. कसं झालं. कुठं आपण कमी पडलो. कुठं अधिक काम आपल्याला करायचे आहे. त्याची चर्चा आपण करणार आहोत.

सध्या सगळ्यांचे लक्ष सरकार स्थापनेकडे आहे. साहजिकच आपण विरोधी पक्षात राहणार आहोत. आपण आघाडीने लढलो. त्यामध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि त्यामध्ये असणार समाजवादी पार्टी, स्वाभिमानी शेतकरी संघटना, शेतकरी कामगार पक्ष, असे सगळे मित्र पक्ष मिळून आपली संख्या



आपले सहकारी काही थोडक्या मतांनी पराभूत झाले आहेत. त्या सगळ्यांना मला सांगायचे आहे की, नाउमेद होऊ नका. खचू नका. आपण नव्या जोमाने त्या ठिकाणी काम करूयात. प्रांताध्यक्षांनी निर्णय घेतला की, जसं आज नवनिर्वाचित सदस्यांना बोलावले, तसं पराभूत उमेदवारांना साहेबांच्या सोईची तारीख ठेवून बोलावले जाणार आहे. त्यांच्याशी पण चर्चा करू. काय 110 ते 115 पर्यंत गेली आहे. काही अपक्ष आपल्या संबंधित आहेत. पण, गेल्या 15- 20 वर्षांचा आम्हा लोकांचा जो अनुभव आहे, त्याच्यामध्ये अपक्ष थोडे सत्ताधारी पक्षाकडे झुकण्याचा प्रयत्न करत असतात. कारण, त्यांना त्यांच्या मतदारसंघामध्ये कामं करायची असतात.

लोकसभेच्या निवडणुकीत आपल्याला पाहिजे तसं यश

मिळालेले नाही. तिथं आपल्या चार जागा आणि आपण पाठिंबा दिलेली अमरावतीची एक जागा आणि काँग्रेसची एक जागा चंद्रपूरची आली. आणि बाहेर राज्यात आपली एक जागा आली. तसं संख्येने आपण थोडं कमी होतो. त्यामुळे कार्यकर्ते वेगळ्या मनस्थितीत होते. हे सगळं असताना आताचे राज्यकर्ते जे राज्यात होते, त्यांनी वेगवेगळ्या लोकांना सांगायला सुरूवात केली की, तुम्ही आता निवडूनच येणार नाही. तुम्ही आता पराभूतच होणार आहे, तुम्ही आता तिथं कशाला थांबता. या इकडं. आम्ही सगळ्या गोष्टी तुमच्याकरता करतो. तुम्हाला मतदारसंघाचा विकास करायचा आहे. हे केल्यानंतर आपले काही जिवाभावाचे सहकारी आपल्याला सोडून गेले. काही काँग्रेसला सोडून गेले. वास्तविक माझा दावा आहे, खरा असेल, खोटा असेल, मला माहिती नाही. ही घटना घडली नसती. पवारसाहेबांनी ज्या पद्धतीने झंझावती दौरा केला आणि त्याच्यातून मतदारांमध्ये एकप्रकारचे मतपरिवर्तन झाले. मी अनेकदा म्हणत होतो की, अंडरकरंट आहे. त्या ठिकाणी बघा काय घडतयं ते. मला कुठंतरी वाटत होतं की, आपण आघाडीच्या वतीने शंभरच्या पुढे येणार. आणि तशा पद्धतीने घडत होतं. ही सगळी लोकं काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस सोबत राहिली असती, तर आज आपण पूर्ण सरकार आणलं असतं, ही वस्तुस्थिती आहे. पण, हे ठिक आहे की, हे असं असतं तर असं झालं असतं आणि तसं असतं तर तसं झालं असतं. याला काही अर्थ राहत नाही. कारण, शेवटी फिगर महत्त्वाची आहे. आज सरकार त्यांनी बनवावं, आपण सगळे विरोधी पक्षात आहोत. आपण आता संख्येने मजबूत आहोत. आता कोणीही सरकार सहजासहजीने चालवू शकत नाहीत.



**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विधीमंडळ गटनेतेपदी अजित पवार यांची एकमताने निवड झाल्यानंतर त्यांनी बैठकीत सर्वांना नमस्कार करून अभिवादन केले. त्यावेळी व्यासपीठावर पाठीमागे शरद पवार, जयंत पाटील, प्रफुल पटेल आणि छगन भुजबळ.**

आज माझ्या ग्रामीण भागामध्ये खूप मोठ्या प्रमाणात पाऊस पडला आणि ओल्या दुष्काळासारखी परिस्थिती झाली. पिकं आपली गेली. माझा शेतकरी हवालदिल झालेला आहे. त्यांना मदत झाली पाहिजे, ही आपली प्रमुख मागणी आहे. आपल्यापुढे बेरोजगारांचा प्रश्न आहे. तो आपल्याला धसास लावायचा आहे. ती आपली महत्त्वाची मागणी आहे. जयंतराव पाटील साहेब राज्यपालांची वेळ घेतील. जयंतराव, मी, धनंजय, भुजबळसाहेब, सुनील तटकरे, वळसे पाटील आम्ही सगळे सहकारी त्यांना भेटायला जाणार आहे. कारण, आज सरकार कोणाचे नाही. राज्यपाल तिथले प्रमुख असतात. त्यांना सांगणार आहे. हे प्रश्न आहेत. त्या प्रश्नांची उकल झाली पाहिजे. जनतेने कौल द्यायचा तो दिला आहे.

पहिल्यांदा महाराष्ट्राच्या इतिहासात असं घडलं आहे. सत्ताधारी पक्षाला दिवाळीत काही गोडधोड खाता आलेले नाही. आणि आपण 54, काँग्रेस 44 आणि मित्रपक्ष तसे असूनदेखील आपण तसे समाधानी आहोत. आपण तसे खूष आहोत. काही काही जागा तर फार कमी मताने पडलेल्या आहेत. तिथं अधिक काम केले असतं, तर बरं झालं असतं, असं प्रत्येकाला वाटतं. काहींना असं वाटतं की, आम्हाला पाहिजे ती मदत कमी झाली. पण, तसं नाही. या सरोजताई महाले येथे बसलेल्या आहेत. नाशिकच्या माझ्या सहकाऱ्यांना विचारा, रंजन ठाकरे वगैरे सहकारी आहेत. तिथं त्यांना त्या मतदारसंघात मतदार त्यांना मदत करत होते आणि निधी देत होते. जे आम्ही डॉ. अमोल कोल्हे यांच्या बाबतीत बघितले.

त्यांच्या खासदारकीला पण तसचं घडलं. त्याच्या जोडीला बाळासाहेब आजबे. त्यांचंही तसंच घडलं. संजय बनसोडे, त्यांचेही तसंच घडलं. तुम्हाला सांगू का, तुमचा विश्वास बसणार नाही. नीलेश लंकेच्या एका कार्यक्रमाला मी गेलो, त्या गावाने माझ्या हातात एक कोटी रुपयाचा चेक दिला. नीलेश लंकेला द्यायला. पक्षाला. आणि चंद्रकांत पाटील मुक्ताईनगरमध्ये. तिथं आपण त्यांना पाठिंबा दिला. काही काही ठिकाणी आपण पाठिंबा दिला. त्याचा आकडा जर पाहिला तर आपण साठच्या पुढे जातो. त्याच्यातले अनेक मान्यवर पवारसाहेबांना भेटून गेलेले आहेत. अमळनेरमध्ये अनिल भाईदास पाटील यांना पोतभर पैसे दिले. त्याबद्दल मी जळगावकरांचे धन्यवाद मानतो. पण, त्यातले पाव पोते ठेवून बाकीचे द्यायचे ना. आपल्या पाच- दहा जागा वाढल्या असत्या. सांगायचे तात्पर्य की, मला अजूनही विश्वास वाटत नाही की, मी 1 लाख 65 हजारांच्या मताधिक्याने निवडून आलो. वास्तविक मतदारसंघात बाकीचे सगळे काम करत होते आणि बाकीचे आम्ही शेवटच्या दिवशी त्या ठिकाणी सभा घेतली. एवढं भरभरून प्रेम त्या भागातील जनता करते. आणि पवारसाहेब देतील त्या उमेदवाराचे बटन दाबायचे, एवढाच. मुख्यमंत्री म्हणायचे, आता ढाण्या वाघ दिलाय. मग मी म्हणायचो, आता ढाण्या वाघापुढं आपली शेळी होती का काय होतंय. परंतु सगळ्यांची डिपॉझीट बारामतीकरांनी जप्त केली. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. त्यांच्या ऋणात राहण्याचा मी प्रयत्न करतो. मावळातला माझा सुनील शेळके. माझ्या मनात, दिलीप वळसे पाटलांच्या मनात नेहमी खंत असायची की, प्रदीप गारटकर आमचा अध्यक्ष आहे. सुप्रिया आहे. आम्ही सगळे काम करत असताना सगळ्या जागा आम्ही या ना त्या प्रकारे आम्ही निवडून आणल्या. पण, मावळची जागा काही आम्हाला 99 पासून मिळाली नाही. सुनीलला घेतला आणि तो इथं पोचायच्या आतच त्याचे तिकीट जाहीर करून टाकलं. तो 94 हजारांनी निवडून आला. भाजपचा बालेकिल्ला. त्या ठिकाणी सुनील 94 हजारांनी निवडून येतो. राज्यमंत्री झालेल्यांना त्या ठिकाणी पराभूत व्हावं लागलं. मुंब्र्यातून जितेंद्र आव्हाडांच्या विरोधात त्यांची बहिण दिली. आम्हाला तर कळेना, काय भावाबहिणीचं चाललंय. राज्यात भावबहिणीचं जरा गंभीरच चाललंय. बारामतीत भावाबहिणीचं जरा बरं आहे. परळीत काय, मुंब्र्यात काय. तसं मागं चुलता-पुतण्यांचं चालायचं. तसं आता भावबहिणींच चाललय. गमतीचा भाग जाऊद्या. कालच भाऊबीज झाली आहे. सर्व बहिणींना शुभेच्छा. मुंब्र्यामध्ये जितेंद्र पाऊण लाखाच्या मताधिक्याने विजयी झाला. त्यांचे करावे तेवढे कौतुक कमी आहे. जयंतराव सगळा महाराष्ट्र पिंजून काढत होते. तरीसुद्धा जयंतराव वाळव्यातून 72 हजाराच्या मताधिक्याने विजयी झाले. जर तिथं थांबले असते, तर लाखाची संख्या त्यांनी कधीच ओलांडली असती. बबनदादा सहाव्यांदा 68



राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधीमंडळ गटनेतेपदी निवड झाल्याबद्दल अजित पवार यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना श्रीनिवास पाटील, सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे, वंदना चव्हाण, जयंत पाटील, सुनील तटकरे

हजारांच्या मताधिक्याने विजयी झाले. तसेच, आमचे आंबेगावचे दिलीप वळसे पाटील हे 67 हजाराच्या मताधिक्याने विजयी झाले. तसेच, सुमनताई, रोहितने चांगला प्रचार केला. लोकं म्हणायचे, रोहित बोलतोय का आर. आर. पाटील बोलतायेत, हेच समजत नाही. इतकी छाप रोहितवर पडलेली आहे. त्यामुळे त्या ठिकाणी सुमनताई साडेबासष्ठ हजारांनी विजयी झाल्या. आर. आर. वरून पहात असतील. आर. आर. आज तुम्ही नाही, नाही तर आपले सरकारच आले असते. परंतु, आज ताई विजयी झाल्या आहेत. अनेक मान्यवर प्रचंड मताधिक्याने विजयी झाले आहेत.

दिंडोरीमधून नरहरी झिरवाळ 61 हजार मताधिक्याने, आमचे छगन भुजबळ साडेछप्पन हजार, भुजबळसाहेबांच्या जवळचे तर अनेक लोक पक्ष सोडून गेले. त्यामुळे आपल्याला काळजी वाटत होती. आदिती तटकरेने तर तिच्या वडिलांना जे जमले नाही, ते तिने पहिल्या निवडणुकीत करून दाखवले. 40 हजारांच्या मताधिक्याने त्या ठिकाणी निवडून आली. तसेच, आमची भावकी अशोक पवार, तिथे अशोकला द्यायचे का



प्रदीपला द्यायचे, असा वाद तिथं माझा आणि जयंतरावांचा चालू होता. परंतु सगळ्यांनी आग्रह केला. आणि विशेषतः साहेबांनी सांगितले की, अशोकला तिकीट द्यायचे. त्याच्यातून अशोकने 41 हजारांचे मताधिक्य त्या ठिकाणी मिळवले. डॉ. किरण लोमटे यांनी तर 58 हजारांचे मताधिक्य मिळवले. त्यांच्याकडे पण आर्थिक चणचण होती. परंतु प्रचंड मताधिक्याने त्यांनी वैभवचा पराभव केला. तीच गोष्ट कर्जत- जामखेडला रोहितने केली. मतदारसंघ नवा. काहीच माहिती नाही. गेल्या वर्षभर तो काम करत होता. काय घडणार, काय होणार, हे काही महिती नव्हते. परंतु रोहितने ज्याप्रकारे कष्ट घेतले. राष्ट्रवादीच्या माझ्या सर्व जिवाभावाच्या कार्यकर्त्यांनी साथ दिली. त्याच्यातून साडेत्रेचाळीस हजाराच्या मताधिक्याने विद्यमान मंत्र्यांना पराभूत करण्याचे काम रोहितने त्या ठिकाणी करून दाखवले. मकरंदआबा साडेत्रेचाळीसच्या मताधिक्याने वाईतून निवडून आले. कराड उत्तरमधून जवळपास 50 हजारांच्या मताधिक्याने आमचे बाळासाहेब पाटील विजयी झाले.

एका गोष्टीचे समाधान आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष संघटनेला महत्त्व देतो. प्रांताध्यक्षांना उमेदवारी मिळाली. ते त्यांच्या हातातच होते. शेखर निकम तर रत्नागिरी जिल्ह्याचे अध्यक्ष आहेत. तेही प्रचंड मताधिक्याने निवडून आले. पालघरसारख्या आदिवासी जिल्ह्यात सुनील भुसारा 25 हजारांच्या मताधिक्याने निवडून आला. आमचे लातूरचे बाबासाहेब पाटील मागच्या वेळेस पराभूत झाले. पण, खचून गेले नाहीत. संघटनेलाही ताकद दिली आणि स्वतःही प्रयत्न केले. लातूरचे जिल्ह्याचे अध्यक्ष असताना त्यांनी ते स्वतः आणि संजयलाही निवडून आणले. दोन जागा आपल्याकडे आल्या होत्या. शंभर टक्के रिझल्ट लातूरवाल्यांनी दिला. आमचा पुणे शहराचा अध्यक्ष चेतन तुपे. तिथे वंदनाताई, सुप्रिया आम्ही सारे काम करत होतो. पण चेतनने तो मतदारसंघ निवडून आणला. एका गोष्टीचे आश्चर्य बघा, डॉ. अमोल कोल्हे ज्यावेळी खासदारकीला उभे राहिले, त्यावेळी तेथे राष्ट्रवादीचा फक्त एक आमदार होता. पाच आमदार विरोधी होते. आज ज्या आमदारांना घड्याळ मिळाले, त्यांच्या

मतदारसंघातले सगळेच्या सगळे आमदार घड्याळाचे निवडून आले. त्या विलासला म्हणालो, त्या अण्णानी घड्याळ घेतले, तसे तुही घड्याळ घेतले असते तर तुही आमदार झाला असता. अपक्ष अपक्ष काय करत बसला. म्हणजे यांना बदल पाहिजे होता.

मला एका गोष्टीचे सांगायचे आहे, खडकवासल्याची. सुप्रियापासून जागा रिक्त आहे. त्या जागेवर सचिन दोडके फक्त 2595 मतांनी पराभूत झाला. शहरात एकाच वार्डात तो मागे पडला. म्हणजे पहिलं तो निवडून आल्यात जमा होता. म्हणजे तुम्हाला एकच सांगतो, 50 हजार, 60 हजार, 70 हजार असले तरी काही घाबरायचे नाही. लोकं केंद्रात वेगळा बदल करतात आणि राज्यात वेगळा बदल करतात. साहेबांचा करिष्मा आपल्याला पहायला मिळाला. सगळे तरुण आपल्या बाजूने झाले होते. मित्रांनो, आमचा रमेश थोरात तर 700 मतांनी गेला. आमच्या ग्रामीण भागामध्ये 11 आहेत. पण, एकच जागा गेली, तीही दौंडची. तीही 700 मतांनी. बाकी सगळ्या जागा काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने जिंकल्या. तो विजय शिवतारे तर एवढी टिवटिव करायचा, त्याला तर त्याची जागाच दाखवली. त्याला म्हटलो, बघतोच तुला आणि बघितले. आमच्या शिवाजीनगरची जागा, कॅन्टोन्मेंटची जागा फार कमी मतांनी गेली. नाहीतर फार चांगला रिझल्ट पुण्याने दिला असता.

बीडला तर चांगले काम झाले. अशी परिस्थिती झाली होती की, सगळ्याच्या सगळ्या जागा निवडून येतात की काय. गेवराईची जागा थोडक्यात गेली आणि केजमध्ये मुंदडांनी ऐनवेळी पक्ष बदल केला. तिथे आपल्या पृथ्वीराज साठेंना पराभूत व्हावे लागले. पण सहापैकी चार जागा बीडने दिल्या.

नगरमध्ये तर काय काय चर्चा करायचे, एकही जागा काँग्रेस– राष्ट्रवादी काँग्रेसची निवडून देणार नाही. तिथं सहा जागा आपल्या आणि दोन जागा काँग्रेसच्या, अशा आठ जागा निवडून आल्या. संग्राम पक्षात राहिला. निवडून आला आणि वैभव तिकडे गेला, आणि पडला. राहुल उभाच राहिला नाही आणि आपला घनःश्याम शेलार थोडक्यात गेला. मधले दहा– बाराच दिवस प्रचाराला भेटले. अजून एक आठवडा जर मिळाला असता, तर आपलं सरकारचं आलं असतं. बाकी काही नाही. इतका तो अंडरकरंट होता.

नाशिकने खूप चांगले काम केले. मी नाशिकच्या अध्यक्षांचे आणि बाकी सगळ्यांचेच कौतुक करतो. पुण्याचे प्रदीप गारटकर, संजोग वाघिरे, प्रशांत जगताप यांचे कौतुक करतो. तसंच नाशिककरांचे कौतुक करीन. नाशिककरांनी सहा जागा दिल्या. आपण इगतपुरीचा उमेदवार राष्ट्रवादीने काँग्रेसला दिला. तोही त्या ठिकाणी निवडून दिला. अमरावतीला पण आपण संजय खोडकेने त्या ठिकाणी पत्नीला उमेदवारी दिली आणि ते त्या ठिकाणी निवडून आले. म्हणजे संजयराव पूर्णपणे आपल्याकडे आहेत. आणि सुरेखाताई शरीराने तिकडे आहेत आणि मनाने इकडे आहेत. शेवटी आम्ही एकोप्याने काम करणार



बारामतीतून आमदारपदी निवडून आलेल्या अजित पवार यांचा गुलाबपुष्प देऊन शरद पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी शेजारी जयंत पाटील, प्रफुल पटेल आणि छगन भुजबळ



**राष्ट्रवादीला निवडणुकीत मिळालेल्या यशाचे मोठे श्रेय शरद पवार यांच्या झंझावती दौरे व मेहनतीला असल्यामुळे सर्व आमदार व कार्यकर्त्यांनी उभे राहून पवार साहेबांचे अभिनंदन केले.**

आहे. पालघरला पाचपैकी एक जागा काँग्रेसची गेली. बाकी आघाडीच्या आल्या. हेही पालघरकरांचे कौतुक केले.

युवकांचे पण राजू नवघरे तो तिथल्या मतदारसंघाचा युवकांचा अध्यक्ष आहे. तो आज आमदार झाला आहे. नबाव मलिक शहराचे अध्यक्ष आहेत. तेही आमदार झाले आहेत. असं संघटनेत काम करणारे होते. ते निवडून आले. आता त्यांच्यावरची जबाबदारी नवीन लोकांकडे टाकावी लागणार आहे. सगळ्यांना काम करावे लागणार आहे.

बेकारीचा महत्त्वाचा प्रश्न आहे. बेकारीची प्रश्न आहे. पावसाने जो काही गोंधळ घातला आहे, तो प्रश्न आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आहे.

ज्या विश्वासाने महाराष्ट्रातील जनतेने आघाडीवर भरोसा दाखवलेला आहे, जी ताकद दिली आहे. एक मजबूत विरोधी पक्ष म्हणून काम करण्याचा संदेश आपल्याला दिलेला आहे. ते काम आपण सगळे मिळून चांगल्या पद्धतीने करू. कुठेही काही घाबरण्याचे काम नाही. अनेक नवे चेहरे आहेत. 54 पैकी जवळपास 25 नवीन चेहरे आहेत. दिलीप वळसे पाटील, मी, जयंत पाटील, छगनराव भुजबळ आम्ही सातव्यांदा आहोत. बाकीचे नवीन निवडून आलेले आहेत.

श्रीनिवास पाटील यांनी ज्या पद्धतीने यश मिळविले, त्याचे आख्ख्या महाराष्ट्राला कौतुक आहे. जनता यशवंतराव चव्हाणसाहेबांनंतर पवारसाहेबांच्या मागे आहे. आम्हाला खंत आहे की, प्रभाकर देशमुख, शशिकांत शिंदे, सत्यजित पाटणकर किंवा शहरातील जागा या गेल्या. पण, खासदारकीची जागा निवडून आली. श्रीनिवास पाटलांचे काम आपण जवळून पाहिले. कराडचे खासदार म्हणून काम पाहिले. सातारकारांना पण खूप खूप धन्यवाद देतो.

या निवडणुकीत जयंतराव पाटील राबले. अमोल कोल्हे आणि अमोल मिटकरी हे महाराष्ट्राला माहित झाले. वास्ताविक आपण नवीन चेहऱ्यांना संघटनेत संधी देत आहोत. कल्याणराव आखाडे असतील, अविनाश धायगुडे, सुभान अली असतील, या सगळ्यांनी खूप काम केले. साहेबांचे महाराष्ट्राच्या जनतेने ऐकले. अग्रलेख पहा. त्यातून आपल्याला नवीन उभारी मिळाली. त्याचा पूरेपूर फायदा घेऊन महाराष्ट्र पिंजून काढूयात. आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अतिशय तडफेने लोकांमध्ये मिसळलेला पक्ष, लोकांनी विश्वास टाकलेला पक्ष, अशी पक्षाची ओळख आपण त्या ठिकाणी करूयात. अशी अपेक्षा करतो. आपण सर्वांनी टाकलेली जबाबदारी सर्वांना विश्वासात घेऊन आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विधीमंडळात काम कसे उजवे ठरेल, याची काळजी घेईल.

# हार्दिक अभिनंदन

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ‘घड्याळ’ या निशाणीवर विधानसभेची निवडणूक लढवून जे ५४ उमेदवार आमदार म्हणून निवडून आले त्या सर्वांचे पक्षातर्फे अभिनंदन करणारा फलक भालचंद्र शिरोळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी पक्षाच्या मुंबईतील मुख्यालयासमोर लावला आहे. आवडत्या गोष्टीला उभारी देण्याचा उद्‌गार म्हणजे अभिनंदन! या अर्थाने आपण या फलकाकडे पाहिले पाहिजे. जे आपल्याला जमले नाही, ते त्याने करून दाखविले म्हणून जो उत्स्फूर्त उद्‌गार बाहेर पडतो तो ‘अभिनंदन’ हाच असतो. अभिनंदन करायला मन मोठे लागते. ज्याचे अभिनंदन करायचे, तो आवडावा लागतो. अभिनंदन आवडले की नावडले हा प्रश्न गौण असतो. कोणी कोणी आपले अभिनंदन केले, हे अभिनंदन स्वीकारणारे पक्के लक्षात ठेवतात. तेव्हा चला, आता आपण सारे जण या विजयी आमदारांचे अभिनंदन करूया!!!




दार व आमदारांचे
त मन:पूर्वक अभिनंदन
छगन भुजबळ
अजित पवार
दिलीप वळसे पाटील
धनंजय मुंडे
नवाब मलिक
जितेंद्र आव्हाड
रोहित पवार
अशोक पवार
अतुल बेनके
सुनिल शेळके
दिलीप मोहिते
संदीप क्षीरसागर
आदिती तटकरे
इंद्रनील नाईक
अनिल भाईदास पाटील
मनोहर चंद्रिकापुरे
सुनिल भुसारा
राजेश टोपे
नितीन पवार
माणिकराव कोकाटे
दिलीप बनकर
बबनराव शिंदे
डॉ. किरण लहामटे
दत्तात्रय भरणे
मकरंद पाटील
आशुतोष काळे
चेतन तुपे
यशवंत माने
प्राजक्त तनपुरे
दिपक चव्हाण
राजेश पाटील
भारत भालके
मानसिंगराव नाईक
शुभेच्छुक
प्रशांत जावकर | सुहास वायकर | संतोष ढाले





# मताधिक्यात अजित पवार राज्यात No 1

प्रत्येक विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांचे मताधिक्य वाढतच चालले आहे हे यावेळीही दिसून आले. २०१४ च्या निवडणुकीत श्री. पवार यांना एक लाखाचे मताधिक्य मिळाले होते. यंदाच्या (२०१९) निवडणुकीत हे मताधिक्य १ लाख ६५ हजार २०७ एवढे झाले. राज्यात सर्वाधिक मताधिक्याने अजित पवार विजयी झाले असून सर्व विरोधी उमेदवारांच्या अनामत रकमा (डिपॉझिट) जप्त झाल्या आहेत. डिपॉझिट वाचविण्यासाठी आवश्यक असलेली एकूण मतदानाच्या एक षष्ठमांश मतेही भाजपचे गोपीचंद पडळकर किंवा अन्य कोणीही उमेदवार मिळवू शकला नाही. अजित पवार यांच्यावर सातत्याने टीका करून त्यांना लक्ष्य केलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन आणि आशिष शेलार या चौघांना जेवढे मताधिक्य मिळाले त्यापेक्षा अधिक मताधिक्य अजित पवार यांना मिळाले.







यावरून मतदारसंघात आणि राज्यात कुणाची लोकप्रियता अधिक आहे हे समजू शकते. राज्यात सर्वाधिक लोकप्रिय व युवकांचे आकर्षण असलेले नेते म्हणून अजित पवार यांच्याच नावावर जनतेने शिक्कामोर्तब केले आहे. अजित पवार यांना एकूण १,९५,६४१ एवढी मते मिळाली असून त्यांचे मताधिक्य १ लाख, ६५ हजार, २६५ एवढे आहे. फडणवीस, महाजन, शेलार आणि चंपा या चौघांच्या मताधिक्याची बेरीज केली असता ती १ लाख, ३६ हजार, ३६० एवढीच भरते. म्हणजे त्यापेक्षाही २८९०५ मते अजित पवार यांना जास्तच पडली आहेत. अर्ज भरला त्यादिवशी कण्हेरीच्या मारुती मंदिराजवळ आणि प्रचार संपणाऱ्या शेवटच्या दिवशी मिशन स्कूल मैदानाजवळ अशा दोनच सभा अजित पवार यांनी घेतल्या. स्वतः राज्यभर इतर उमेदवारांचा पवार प्रचार करीत होते. स्वतः मतदारसंघात प्रचार न करताही केवळ कार्यकर्त्यांच्या जिवावर व विश्वासावर जर एवढे मताधिक्य मिळत असेल तर यावरून मतदारसंघात त्यांनी केलेले काम किती प्रचंड आहे आणि प्रेम व विश्वासार्हता किती मोठी आहे हे दिसून येते. बारामतीच्या जनतेने पवार साहेबांवर ६० वर्षे, शारदाबाई पवार यांच्यावर २० वर्षे आणि अजित पवार यांच्यावर गेली ३५ ते ४० वर्षे अव्याहत प्रेम करून बारामतीकरांचा नाद करायचा नाही आणि पवारांशिवाय दुसरे कुणीही येथे चालणार नाही हेच सिद्ध करून दाखविले आहे.





# भल्या भल्यांना राष्ट्रवादीची धडकी बसेल...

## प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे उद्‌गार

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या चार महिन्यांत अनेक स्थित्यंतरे होताना आपण पाहिली. मागची पाच वर्षे विधानसभेत आपण विरोधी पक्षात राहिलो. विधानसभा असो, अथवा विधान परिषद असो, मला अभिमानाने सांगावे लागेल की, अत्यंत प्रभावी काम जर कोणत्या पक्षाने विरोधी पक्ष म्हणून केले असेल, तर विधान परिषदेत धनंजय मुंडे, सुनील तटकरे आणि त्यांच्या नेतृत्वाखाली सगळ्यांनी केले. आणि विधानसभेत देखील अजितदादांच्या नेतृत्वाखाली सरकारला विरोध करण्याचे काम अत्यंत प्रभावीपणे करण्यात आले.

लोकसभेच्या निवडणुकीचे चिंतातूर होणारे निकाल आले. बऱ्याच ठिकाणी विरोधकांना लाखापेक्षा जास्तीचे मताधिक्य होते. ते पाहून महाराष्ट्रात अनेक जण समजायला लागले की, 226 विधानसभा मतदारसंघात युती पुढे आहे, म्हणजे हाच निकाल महाराष्ट्राच्या विधानसभेत लागण्याची शक्यता आहे.

पाच वर्षात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने विरोधी पक्षात राहताना आमचे अनेक पत्रकार मित्र विचारायचे की, हे मुद्दे का मांडत नाही. पण, आम्ही सगळेच मुद्दे मांडत होते. ज्यावेळी आम्ही शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मागितली आणि महाराष्ट्राच्या विधानसभेत 19 आमदारांना निलंबित करण्याचे काम करण्यात आले. त्यावेळी खरी गती महाराष्ट्रातील सर्व पक्षांनी एकत्रित येऊन काम करण्यासाठी लागली. त्याचा परिणाम म्हणून आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पुढाकारातून संघर्ष यात्रा काढली. नंतर यवतमाळपासून नागपूरपर्यंत हल्लाबोल यात्रा काढली. चालत जाऊन सरकारच्या विरोधात भूमिका मांडण्याचे काम लोकांमध्ये केले. त्यानंतर परिवर्तन यात्रा निघाली आणि सगळ्यात शेवटी आपण शिवस्वराज्य यात्रा काढली. या यात्रा महाराष्ट्रात जात असताना जनतेने आपण मांडलेल्या विचारांचे उत्स्फूर्तपणाने स्वागत केले. लोकांचे प्रचंड असा प्रतिसाद मिळत होता. तरीही लोकसभेच्या निवडणुकीत

असं का झालं, म्हणून लोकांच्या मनात प्रश्नचिन्ह राहिलं. पण, ज्यावेळी शिवस्वराज्य यात्रा निघाली, त्यावेळी डा. अमोल कोल्हे आणि आम्ही रात्री उशिरा बसलो आणि शिवस्वराज्य यात्रा कशी पाहिजे, याचा आराखडा तयार केला. त्यानंतर अमोल कोल्हे आणि अमोल मिटकरी, या दोन अमोल, खरं तर अनमोल म्हटले पाहिजे. या दोघांनी महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने जनजागरण केले. मला खात्री आहे की, इथं निवडून आलेल्या अनेक आमदारांना या दोघांनी मार्गदर्शन केल्यानंतर कार्यकर्त्यांमध्ये जी नवचेतना जागृत झाली. त्याचा अनुभव आपल्या सगळ्यांना आला. मला वाटतं, अनिलजींना त्यांचा सगळ्यात जास्त अनुभव आला. त्यांच्या सभेला जवळपास 30 हजार लोकं उपस्थित होती.

2014 साली आपण 40 आमदार निवडून आणलेले केलेली मेहनत ही महाराष्ट्राला आणि तुमच्या अनेक पिढ्यांना आदर्श म्हणून लक्षात राहिल. एवढ्या मेहनतीने पवारसाहेबांनी राष्ट्रवादीच्या प्रचाराचे काम उभा करण्याचे काम केले.

मी 30- 35 वर्षांपूर्वीचे पवारसाहेब बघितलेले होते. 30- 35 वर्षांपूर्वी ते आमच्या इस्लामपूरला सभेला आले. सभा उरकल्यानंतर स्टेजवरून उतरल्यानंतर पुढची सभा गाठण्याचा त्यांच प्रयत्न असायचा. दिवसाला 12-15 सभा पवारसाहेब हेलीकॉप्टरने नाही तर गाडीने करायचे. या वेळी मी पाहिले की, 30- 35 वर्षांपूर्वी 85- 90 साली पवारसाहेबांची जी ऊर्जा होती, ती तशीच ऊर्जा, काकणभरही कमी न झालेली ऊर्जा फार जवळून या विधानसभेच्या निवडणुकीत अनुभवायला आली. बाकीचे सगळे राबले असले तरी पवारसाहेबांचा उत्साह प्रचंड होता.



**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांच्या विजयासाठी शरद पवार यांनी जी प्रचंड मेहनत घेतली. त्याबद्दल त्यांचा श्रीनिवास पाटील यांनी मोठा गुलाबाचा पुष्पहार घालून सत्कार केला. तेव्हा शेजारी, अजित पवार, जयंत पाटील, प्रफुल पटेल आणि छगन भुजबळ.**

होते. त्यातले एक आमदार हनमंतराव डोळस यांचे निधन झाले. सहा आमदार लोकसभेच्या निवडणुकीनंतर आपला पक्ष सोडून गेले. ज्यांना आपण हमखास तिकीट देणार होतो, असे 10- 12 जण आपला पक्ष सोडून गेले. त्यामुळे महाराष्ट्रात अशा पद्धतीचे वातावरण झाले की, पक्ष 25-30 च्या पलिकडे जाणार नाही. पण आपल्याला प्रत्येक वेळी सांगत आलो की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ही सगळ्यात मोठी की, जे दुसऱ्या पक्षात नाही, ते माझ्या पक्षात आहे, असं मी सांगायचो. पत्रकार मला विचारायचे, पण मी सांगायचो की, आमच्याकडे शरद पवार नावाचा नेता आहे. त्या नेत्यामुळे महाराष्ट्रात काहीही होऊ शकतं, असं मी सतत सांगायचो. आज विधानसभेच्या 54 सदस्यांचा सत्कार करताना त्यांच्या निवडीसाठी पवारसाहेबांनी जे अथक परिश्रम घेतले, रात्रीचा दिवस केला. पाऊस, ऊन, वारा या सगळ्यांची तमा बाळगली नाही. वयाच्या ऐंशीव्या वर्षी पवारसाहेबांनी

भाजपने ही निवडणूक 370 कलमावर नेण्याचा प्रयत्न केला. सुरूवातीच्या काळात अमित शहा 370 शिवाय काही बोलत नव्हते. नरेंद्र मोदी तेच बोलायचे. त्यामुळे ही निवडणूक महाराष्ट्राच्या स्थानिक प्रश्नांऐवजी वेगळ्या मुद्द्यांवर नेण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू झाला. तो जनजागरण करून सांगण्याचे काम महाराष्ट्रामध्ये आमच्या अमोल कोल्हे आणि अमोल मिटकरी यांनी केले. महाराष्ट्रात दोघांच्या सभा झाल्या. वेगवेगळ्या झाल्या. प्रचंड मोठ्या झाल्या. विधानसभेत जो उमेदवार उभा राहिला, त्याचा पहिला आग्रह असायचा की, दोन अमोलपैकी एक अमोल आमच्याकडे पाठवा. त्यामुळे या दोघांचे कौतुक करावे तितके थोडे आहे. खेडचे दिलीप मोहिते आम्हाला नेहमी म्हणायचे की, आमचे खासदार आम्हाला परत द्या. मी त्यांना म्हणायचो की, मतदान होईपर्यंत तुमचे खासदार तुम्हाला दिसणार नाहीत. तुम्ही त्यांचे नावही काढू नका. ते प्रचाराला नाही आले,

तरी तुम्ही निवडून येणार. फक्त अमोल कोल्हेंना परत बोलावू नका. महाराष्ट्रात या दोघांनी प्रचार केला. त्याचा मी जाणीवपूर्वक उल्लेख या ठिकाणी करतो.

महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळातील जवळपास 12 जणांना पराभव बघायला मिळाला. काही मंत्री थोडक्यात बचावले. काही ठिकाणी पवारसाहेबांना सोडून आम्ही निवडून येतो, अशी मानसिकता असणारी लोकं होती. त्यात सातारचे नाव आपल्याला घ्यावे लागेल. सातारमध्ये साडेतीन चार महिन्यापूर्वी लोकसभेच्या निवडणुकीत पवारसाहेबांनी ज्यांना आग्रहाने तिकीट दिलं आणि त्यांना निवडून आणण्यासाठी सगळ्यांनी एकमताने प्रयत्न केले आणि निवडून आणले. तेच आपल्याला सोडून गेले. पण, त्यानंतर पवारसाहेबांनी आपल्या खिशातून एक हुकमी एक्का बाहेर काढला. आणि तो हुकमी एक्का माझे जुने खासदार आहेत. आणि ते एकदा बोलायला लागल्यानंतर किती बोलू शकतो आणि समोरच्याला किती धूळ फेकू शकतो आणि पराभव करू शकतो, हा अनुभव मी घेतला आहे. श्रीनिवास पाटील यांना आदरणीय पवारसाहेबांनी उमेदवारी दिली आणि ते आज प्रचंड बहुमताने विजयी झाले आहेत. महाराष्ट्रात हे एक उदाहरण आहे.

महाराष्ट्रात मागच्या पाच वर्षात भाजपने विरोधकांची माणसे फोडायची आणि पुन्हा त्यांना निवडून आणायचे, हा प्रयत्न करण्याचे ठरवलेले होते. महाराष्ट्रामध्ये लोकसभेच्या खासदाराला राजीनामा द्यायला लावला. आणि आज त्या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसचेच खासदार पुन्हा निवडून आलेले आहेत. हा महाराष्ट्राच्या आणि सातारच्या जनतेचा फार मोठा विजय आहे. महाराष्ट्रातल्या सामान्य माणसाला पक्ष बदललेला आवडत नाही. पक्ष बदलूच्या विरोधात महाराष्ट्र आहे. म्हणून ज्यांनी ज्यांनी पक्ष बदलले, त्यातील 80 टक्के लोकं या निवडणुकीत पराभूत झाली, हेही आपण लक्षात ठेवावं. त्यामुळे पक्ष बदलून नाही तर माणसं टिकवून जिंकायचं असतं, ही भूमिका महाराष्ट्रातील भाजपच्या नेतृत्वाने लक्षात घेतली नाही. म्हणून ज्यांनी पक्ष सोडला, त्यांना पराभूत करण्याचे काम अनेक ठिकाणी झालं.

विदर्भ हा भाजपचा बालेकिल्ला आहे, असं समजलं जायचं. 2014 साली विदर्भात भाजपला 44 जागा होत्या. आमच्या पक्षाकडे फक्त एकच जागा होती. पण, आम्ही बारा जागा फक्त तिथे लढवू शकलो. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या चर्चेत आम्ही बऱ्याच जागा मागितलेल्या. पण, 12 जागांवर आम्हाला समाधान मानावं लागलं. आणि बारापैकी सहा जागांवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांचा विजय झाला. माझी अनेक वर्षांपासूनची मागणी आहे की, विदर्भाची जमीन भुसभुशीत आहे. आपण लक्ष घातलं. ताकद लावली, तर पुढच्या वेळी बाराच



सातारची ऐतिहासिक सभा,
पावसात शरद पवारांनी केले भाषण,
भिजत असलेला हजारोंचा जनसमुदाय

नाही तर 17- 18 आमदार आपण निवडून आणू शकतो. एवढी ताकद आहे. त्यामुळे भविष्यात विदर्भात जास्त लक्ष देण्याची गरज आहे. हे विदर्भातील जनतेने सहा आमदार निवडून देऊन आम्हाला सुचविलेले आहे.

उत्तर महाराष्ट्रात देखील आपल्या आधी पाच जागा होत्या. आता सात जागा आहे. पश्चिम महाराष्ट्रात आधी दहा जागा होत्या. आता त्या 19 पर्यंत गेलो. नगरसारख्या जिल्ह्यामध्ये, खरं तर नगरकरांचे अभिनंदन केले पाहिजे. बारापैकी सहा आमदार राष्ट्रवादी काँग्रेसचे निवडून देण्याचे काम हे अहमदनगर जिल्ह्याने केले. त्या जिल्ह्यात काही लोकं भाषणं करायची, बारा विरोधी शून्य करू. पण, बारा शून्य करण्याची भाषा करणाऱ्यांच्या तोंडावरच अहमदनगर जिल्ह्याने आपले सहा आमदार निवडून दिले. आणि काँग्रेसचे दोन, असे आठ आमदार दिले. जे सहा निवडून आले, त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे, ते सगळे तरुण आमदार आहेत. सगळे नवीन चेहरे आहेत. आणि जवळपास सगळ्यांनी पहिल्यांदा निवडणूक लढली आहे. त्यामुळे नवा चेहरा देण्याचे वैशिष्ट्य काय आहे आणि त्याचा अनुभव काय आहे, हे आपल्याला अहमदनगर जिल्ह्याने अनुभवयाला दिले.

निकाल लागायच्या आधी एक्झीट पोल आले. त्यावर आमच्या सगळ्या प्रसारमाध्यमांनी कोणी अठरा देतोय, कोणी वीस देतोय, कोणी एकवीस देतोय, कोणी बावीस देतोय, ज्यांनी चोवीस दिले, त्यांची आमच्यावर फार मेहेरबानी झाली. त्यामुळे सगळीकडे सन्नाटा होता. सगळ्यांना असं वाटायचं की, हे कसं शक्य आहे. त्यावेळी मी मुलाखत दिलेली आणि मी प्रसारमाध्यमांना सांगितलेले की, माझी अटकळ आहे की, आम्ही साठ जागांपर्यंत विजयी होऊ शकतो आणि महाराष्ट्रात दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून आमचा पक्ष नावारुपाला आल्याशिवाय राहणार नाही. आमचे थोडे काही मित्र, राजीव देशमुख असेल, सचिन दोडके, रमेश थोरात, ज्योती कलाणी, प्रभाकर देशमुख, उत्तम जानकर, विजयसिंह पंडित, शशिकांत शिंदे हे आपले तीन हजार मतांच्या आत पडले. नेहमी निवडून येणारी लोकं काठावर पडली. त्यामुळे आपण साठपर्यंत जायचे राहिलो. मात्र दुसरं खरं ठरलं. आपण 116-17 जागा महाराष्ट्रात चिन्हावर लढलो. मित्र पक्षांना आपण काही जागा दिल्या. स्वाभिमानी शेतकरी संघटनेला आपण काही जागा दिल्या. त्यामुळे सगळ्यात कमी जागा लढवून आदरणीय पवारसाहेब आपल्या पुढाकारामुळे आणि आपल्या ताकदीमुळे आणि प्रयत्नामुळे आपल्याला महाराष्ट्रात दोन नंबरची म्हणजे जवळपास 92 लाखापर्यंतची मते मिळाली. त्यामुळे आपले किती उमेदवार कोणामुळे पडले, याचा विषय येथे मांडत नाही. ज्यांचा पराभव झाला आहे, त्या उमेदवारांनाही



बोलावण्यात येणार आहे.

जे विजयी झाले, ते प्रचंड मतांनी विजयी झाले. पण, सगळ्यात मोठा विजय महाराष्ट्रामध्ये मतदारसंघात न जाता, प्रचार न करता, विरोधक कोण आहे, याची तमा न बाळगता, महाराष्ट्राच्या विधानसभेत इतिहासामध्ये एवढे मताधिक्य कोणाला मिळाले नसेल, एवढे मताधिक्य अजितदादांनी मिळवले. माझ्या मतदारसंघातील कार्यकर्ते म्हणाले की, काय केलेय दादांनी ते आपण बघायला एकदा जायला पाहिजे. एवढ्या मोठ्या प्रचंड मताधिक्याने दादा विजयी झाले.

आता नव्याने पहिल्यांदाच निवडून आलेल्यांना माझी विनंती आहे की, विधानसभेच्या कामकाजात भाग घ्या. कारण, विधानसभेच्या कामकाजात जे मागे राहिले, ते बरेच पराभूत झाले. त्यामुळे लोकांना मतदारसंघात कळाले पाहिजे की, आपला आमदार बोलतो. त्यामुळे आपण त्यात पूर्णपणाने लक्ष घातले पाहिजे.

राज्याच्या राजकारणात अनेक सभा होतात, पण एक सभा महाराष्ट्राच्या कायम लक्षात राहिल, आणि ती म्हणजे भरपावसात पवारसाहेबांनी सातारला केलेली सभा. एखादा नेता असता तर त्याने सांगितले असते की, आता पाऊस सुरू झाला, लोकांनाही सांगा जायला. मीही बाहेर पडत नाही. पण, भर पावसात पवारसाहेबांनी आपलं भाषण केले. आणि 50- 60 हजारांचा जमावही पवारसाहेबांचे भाषण ऐकत उभी राहिली. आणि शरद पवारसाहेब म्हणजे काय आहे, याची पुन्हा एकदा ओळख महाराष्ट्राला झाली. पवारसाहेबांनी आपल्या पक्षाला पुन्हा एकदा एक नवीन ऊर्जा दिली. आणि दिल्लीसमोर झुकायचे नाही, हा जो छत्रपती शिवाजी महाराजांचा बाणा होता, तो पुन्हा एकदा आपल्या समोर यशस्वीपणे मांडला आहे. आज आपण पवारसाहेबांचे जेवढे कौतुक करू, तेवढे कमीच आहे. कारण, आपल्या सगळ्यांना माहिती आहे की, आपण कसं पवारसाहेबांच्या नावामुळे निवडून आलो.

आज आत्मचिंतन करताना, राष्ट्रवादी काँग्रेस सगळ्या जातीधर्मांचा पक्ष आहे. सर्व समाजाला या पक्षात स्थान आहे. हा पक्ष सर्व जाती धर्मातील कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन जाणारा पक्ष आहे. ठराविक विचारांचा आणि धर्माचा हा पक्ष नाही. महाराष्ट्रातील सर्व जातीधर्मांना बरोबर घेऊन हा पक्ष जातो. ही पक्षाची पुन्हा एकदा महाराष्ट्राला ओळख झालेली आहे. तोच वसा घेऊन पुढची पाच वर्षे ताकदीने काम करूयात. महाराष्ट्रातील निवडणुकीचे निकाल आपण बघितले तर, पुढची पाच वर्षे जर आपण अत्यंत प्रभावीपणे विरोधी पक्ष म्हणून काम केले, महाराष्ट्रात जनजागरण प्रभावीपणे केले, महाराष्ट्रातले, तुमच्या जिल्ह्यातले, मतदारसंघातले प्रश्न जर आपण सतत मांडले तर मला खात्री आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुढच्या वेळी स्वतःच्या बळावर महाराष्ट्राच्या विधानसभेत निवडून आल्याशिवाय राहणार नाही. तो विचार आणि ती ऊर्मी आम्हाला पवारसाहेबांच्या कर्तबगारीतून मिळालेली आहे.

नागरी भागात थोडासा आम्हाला फटका बसला. मुंबई, ठाणे येथे. नागरी प्रश्न आमच्या वंदनाताई चव्हाण यांनी सगळ्या शहरात जाऊन मांडले. तोच विचार आणि तोच प्रयत्न आपल्याला अधिकपणाने पुढे न्यायचा आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागाबरोबर नागरी भागातले शहरातलेही प्रश्न प्राधान्याने मांडण्याचे काम केले तर मला विश्वास आहे की, लोकं आपल्या मागे आल्याशिवाय राहणार नाहीत. तो प्रयत्न आपण करूयात.



माझी पक्षाचा अध्यक्ष म्हणून निवड झाली, त्यावेळी प्रफुल्ल पटेल यांनी भाषण केलेले की, यांचा पायगुण चांगला आहे. पण, लोकसभेचे निकाल लागल्यानंतर मी डोक्याला हात लावला आणि म्हटले, काही खरं नाही. पण, आज सुदैवाने मला मनापासून आनंद होत आहे. पण, या काळात महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस ऊर्जेने उभी राहिलेली आहे. ताकदीने उभ्या राहणाऱ्या या पक्षाची भल्या भल्यांना धडकी बसेल. एवढी ताकद शरद पवारसाहेबांच्या नावात आणि कर्तबगारीत आहे. हा विचार पुढे नेण्याचे काम भविष्यकाळात आपण ताकदीने करू.

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या विजयता मोठा वाटा असणाऱ्या खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचा जयंत पाटील पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना.**



प्रा. स्वाती शिंदे-पवार

# सातार्‍यात म्हातारा पावसात भिजला



आभाळालाच रडू अनावर आलं
'शरदाचं चांदणं' अमृतात न्हालं
अजिंक्यतार्‍यावरची भिजली आरोळी
दिल्लीच्या तख्ताला भिडूदे
रक्ताळलेले पाय 'साहेब'
थांबा थोडे मला धरु दे
थकला नाही भागला नाही
जीव तुमचा किती मोठा
तुमच्यामुळेच हंबरतो आहे
गायी गुरांचा भरला गोठा
छत्रपतींच्या सातार्‍यात तुम्ही ओलेचिंब होता
राजाला कुठं रडता येतं...?
म्हणून तर आभाळाला हांक देता
वाकला नाही... झुकला नाही...
आभाळालाच हुंदका दाटून आला
सातार्‍यात 'म्हातारा' पावसात भिजला
थरारला देह अवघा महाराष्ट्र थिजला
अमृताच्या धारांनी राज्याभिषेक केला...
त्याचा शिलालेख झाला
'शरद पवार' ही बडाक्षरी नावाची जादू
विजुगिषी वृत्तीचा तो कनवाळू
दखलपात्र माणूस येथ मराठी मातीचा
कसलेल्या पैलवानांचा 'वस्ताद' बारामतीचा
तुम्ही ठोकलात शड्डू 'बुडत्या जहाजाचा कॅप्टन' बनून
इतिहासात नोंद होईल ही 'एकट्याची लढाई' म्हणून
आभाळ गहीवरलं पृथ्वीवर सांडलं
तुमच्या मनातल्या वादळाचं त्यानं 'सुंबरान' मांडलं
'युथ आयकॉन' तुम्ही युवा मनातला
मॅच्युअर राजकारणाचा 'काबील चेहरा' जनमनातला
घाबरली 'ईडी' तुम्हा हस्तांदोलन करताना
चिघळल्या जखमा काळजात एकेक बुरुज पडताना
इमानदारीचं तुमचं रक्त
मातीसाठी राबणारे तुम्ही महाराष्ट्रभक्त
सात्विक संतापाचा केवढा कोंडमारा
सहाफुटी देहावर चढला नाही रागाचा पारा
सातार्‍यात म्हातारा पावसात भिजला
थरारला देह अवघा महाराष्ट्र थिजला
अमृताच्या धारांनी राज्याभिषेक केला...
त्याचा शिलालेख झाला
शतकातूनच एकदाच जन्मतो युगपुरूष
संयमी नेतृत्व लाभत नाही पुन्हा-पुन्हा
तुम्ही 'देवमाणूस' आम्ही कपाळकरंटे जन्मलो
हाच इथल्या मातीचा गुन्हा
शून्यातून केलीत विश्वाची निर्मिती
राष्ट्रवादी.... महाराष्ट्रवादी.... तुम्ही मुक्ती दारिद्र्याची
रोजगार हमीचे तुम्ही निर्माते
इस्त्राईली तंत्रज्ञानाचे खरे उद्गाते
शासनाचं राशन तुमच्यामुळेच आलं
बारामतीचं 'सिंगापुरी मॉडेल' झालं
'रयते'चे वाली झालात अन् पारंब्या फुटल्या वडाला
किती मायेनं आकार दिलात तुम्ही महाराष्ट्रातील दगडांना
मेल्यावरच मोठी होतात महाराष्ट्रात माणसं
तुम्हाला कळून नाही का आलं...?
एकट्यानंच केलीत कित्ती पायपीट
वादळवारं... पाऊसधारा... भागन्‌भाग पिंजून काढला
सातार्‍यात म्हातारा पावसात भिजला
थरारला देह अवघा महाराष्ट्र थिजला
अमृताच्या धारांनी राज्याभिषेक केला...
त्याचा शिलालेख झाला
'नेहरु तारांगण' तुमच्यामुळेच हसतं आहे
सैन्यदलात नेटानं महिला आरक्षण बसतं आहे
'सिता' तुम्ही उभी केलीत
'आणीबाणी'तून जनता सोडविलीत
नाशिकला मुक्त विद्यापीठाचं द्वार खुलं केलं
मराठवाड्याला बाबासाहेबांचं नाव दिलं
स्वामी रामानंद तिर्थ नांदेडात वसले
तुमच्या डोळ्यांच्या डोहात कित्येकदा बुद्ध हसले
औद्योगिक वसाहत, माथाडी मंडळ तुमचीच दूरदृष्टी
किल्लारी आणि भूजला उभी केलीत सृष्टी
पन्नास टक्क्यांचं महिला आरक्षण
किती चालविलीत बुद्धी विलक्षण
माजघरातल्या हुंदक्यांना किती मोठं स्थान दिलं
स्त्री-पुरुष समानतेला सुप्रियाचं दान दिलं
किती खपलात जातीसाठी मातीसाठी तिळतिळ तुटला
वळीवाच्या पावसालाच मग
धाय मोकलून हंबरडा फुटला
सातार्‍यात म्हातारा पावसात भिजला
थरारला देह अवघा महाराष्ट्र थिजला
अमृताच्या धारांनी राज्याभिषेक केला...
त्याचा शिलालेख झाला
माडलं कधीच दलबदलूचं गार्‍हाणं
की पुढे केली नाहीत शरीराची तक्रार
पचविलं मुक वेदनांचं जहर... सारं हालाहाल
झुकला नाही... वाकला नाही... मानली नाही हार
शांतताप्रिय जबान तुमची अजिबात घसरत नाही
'महाराष्ट्र नभीचा शरदचंद्र' काळालाही ओसरत नाही
कुस्ती, कब्बडी, खो-खो, रक्तातच नवे डाव
क्रिडी संघटकाला कुठे कठीण हल्ल्यांचा पाडाव
बरसत होता पाऊस अन् महाराष्ट्र गरजत होता
'तो मौनी म्हातारा' आज आग ओकीत होता
मोहोर उमटली जिद्दीची अन् शौर्याचा इतिहास रचला
'रक्ताळले पाय' अन् 'भिजला देह'
काळजात रुतून बसला
ठसा उमटला मराठी मुलूखाचा युगपुरुष भिजला
अजिंक्यतारा हादरला... हेलावून गेला
तेजाने झळकली 'राजमुद्रा' गडावर झेंडा फडकला
राष्ट्रवादी पुन्हा... राष्ट्रवादी पुन्हा...
सातार्‍यात म्हातारा पावसात भिजला
थरारला देह अवघा महाराष्ट्र थिजला
अमृताच्या धारांनी राज्याभिषेक केला...
त्याचा शिलालेख झाला

- प्रा. स्वाती शिंदे-पवार, विटा




आपण किती कौतुक करावे, यासाठी शब्द नाहीत. 1980 सालापासून मी पवारसाहेबांसोबत आहे. साहेब 1978 साली मुख्यमंत्री झाले आणि 80 साली ते पदावरून उतरले, तेव्हापासून आम्ही सोबत आहे. त्यांनी माझ्याविषयी नेहमीच वडिलांची भूमिका ठेवली आहे. मित्रांनो, त्यावेळी साहेबांचे वय 40 होते आणि आता ते 80च्या जवळ आहेत. पण, साहेबांची हिंमत या वेळीची, जेव्हा लोकसभेचे इलेक्शन झाले. त्यावेळेपासून एक एक करून मंडळी आपल्यापासून दूर गेली. पण, पवारसाहेबांनी धीर आणि हिंमत मात्र कायम राखली. आमच्यासारखे लोकंही फार चिंतेत होते. पण, त्यांनी पक्षाला ज्या पद्धतीने सांभाळले. मग दादा असोत, सुनीलभाऊ असतो. जयंतराव असतो. सगळे असोत. फार चिंतेत असायचो. त्यावेळी पवारसाहेबांचे एकच वाक्य असायचे की, तुम्ही काळजी करू नका. आपण मैदान कधी सोडायचे नाही. विजय निश्चित आपला आहे.

मित्रांनो, पवारसाहेबांनी ज्या पद्धतीने फक्त महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला एक दिशा दिलेली आहे. आज देशामध्ये, दिल्लीमध्ये पवारसाहेबांबद्दल एक वेगळा आदर लोकांच्या मनामध्ये निर्माण झालेला आहे. माझी आपल्या सगळ्यांना विनंती आहे की, येणाऱ्या काळामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी, फक्त आमदारांची जबाबदारी नाही. खासदारांची नाही. तर सगळ्यांचीच आहे की, आपण येणाऱ्या काळामध्ये आपल्या पक्षाची बांधणी कशी करणार आहे.

मित्रांनो, आम्ही विदर्भातील आहोत. दादांनी सांगितले. जयंतरावांनी सांगितले. विदर्भात राष्ट्रवादी नाहीच, असं लोकांनी गृहीत धरून चालले होते. पण, बारा जागा लढवल्या. सहा आल्या. मला असं वाटतं की, आपल्याला जर काँग्रेसने योग्य जागा दिल्या असत्या, ही कोणावर टीका नाही. पण, जर योग्य जागा दिल्या असत्या, तर निश्चित आपला स्कोर कुठं कमी राहिला नसता. आपण दहा– बाराच्याही वरती गेलो असतो. ही मला खात्री आहे. उदाहरण देतो, आमचा भंडारा– गोंदिया जिल्हा. जिथून जनसंघचा पहिला आमदार आला, तो भंडारा जिल्ह्यातून आलेला आहे. त्यामुळे पवारसाहेबांना माहिती आहे की, आमचा जिल्हा भाजपचा बालेकिल्ला नागपूरनंतर आहे. बाकीचे जिल्हे नंतर. त्या जिल्ह्यामध्ये 2014 मध्ये सातपैकी सहा आमदार त्यांचे



# ईडीचे आपण आभारच मानूया, त्यांनी विजयासाठी आपल्याला खूप साथ दिली

## प्रफुल पटेल यांचे उद्गार



आमदार म्हणून पुन्हा निवडून आल्याबद्दल छगन भुजबळ यांचा पुष्पगुच्छ देऊन शरद पवार यांनी सत्कार केला. शेजारी प्रफुल पटेल.

आले होते. यंदा सातपैकी फक्त त्यांचा एकच आमदार आलेला आहे. ही एक महत्त्वाची बाब आहे. नागपूर शहराच्या बाबतीत असे कोणी सांगितले की, नागपूर जिल्ह्यामध्ये बारापैकी सहा जागा या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आल्या आहेत. शहरातील फक्त दोन जागा तीन हजार मतांच्या फरकानी पडल्या. याचा अर्थ असा आहे की, तिथून मुख्यमंत्री निवडून येतो. नितीन गडकरी त्या भागातून निवडून येतात. तिथं संघाचे हेडक्वार्टर आहे. तिथे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. म्हणजे कुठल्याही गोष्टी अशक्य आहेत, असं समजायचे कारण नाही. आपली जी कमी असेल, ती येणाऱ्या काळात दुरुस्त केली जाईल.

साहेब, आपण सर्वांचे आभार मानले. पण, आपण ईडीचेही आभार मानले पाहिजे. त्यांनी पण आपल्याला खूप साथ दिली. मदत केली. ज्यामुळे आपल्या सगळ्यांना खूप प्रचंड फायदा झाला. तुम्ही तिथे जाताना थांबले. पण, मी जाऊन आलो. म्हणून मी तुम्हाला सांगतो की, तिथे काही अडचण नाही. चहा, जेवण बाकी सगळं तिथं चांगलं मिळते. आणि संध्याकाळी वेळेवर घरी जायची परवानगी मिळते.

# पवारसाहेबांनी बदलली देशाच्या राजकारणाची दिशा

## खासदार डी. पी. त्रिपाठी यांचे उद्गार



महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर दिल्लीतून अभिनंदनाचे एवढे फोन आले की, एवढे फोन कधी आले नाहीत. या निवडणुकीत पवारसाहेबांनी अशी दिशी दिली की, देशात ज्या पद्धतीचे वारे चालले होते की त्यात बदल केला जाऊ शकत नाही. हा विजयरथ कोणी थांबवू शकत नाही. यांना कोणी हरवू शकत नाही. त्याला विराम लागला. त्याला रोखले गेले. फक्त रोखले नाही तर विरोधी पक्षाची ताकद वाढवली आणि सांगितले की, फक्त महाराष्ट्रातच नाही तर लोक एकत्र आले तर देशातही विरोधी पक्ष उभा राहू शकतो. राजकारणाची नवीन दिशा चालू शकते. हा क्षण पवारसाहेबांनी देशाला दाखवला आहे.

14 वर्षांपूर्वी नागपूरच्या अधिवेशनामध्ये मी पवारसाहेबांविषयी एक शेर म्हणला होता. तो मी पुन्हा आज म्हणतोय. त्याच्या अर्थावर ध्यान ठेवा. आज भारतात एक वेगळ्या प्रकारचे दिशा बदल होत आहेत. सुरवात करणे गरजेचे होते. त्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे होते. ती सुरवात पवारसाहेबांनी केली. सर्व नवनिर्वाचित आमदारांचे अभिनंदन करताना मी सांगेन की, पवारसाहेबांनी जी दिशा दाखवली आहे, त्यांनी दाखवून दिले की, तुम्हारी जीत की हर रथ को रोक सकता है और राजनिती की रास को बदला जा सकता है.

तो शेर पवारसाहेबांच्या आजच्या दिशेबद्दल आहे,


**मेरी हिंमत को सवारो, मेरे हम राह बनो**
**मेरे साथ चलो, मेरे साहस की प्रशंसा करो**
**मेरी हिंमत को सवारो, मेरे हम राह बनो**
**मैने शमा जलायी है, हवाओ के खिलाफ...**



अजित पवार यांची कण्हेरी येथे अर्ज भरल्यानंतर झालेली पहिली सभा.

Best

Compliments




**आकाश**
**नवी दिल्ली**

# पकड सुटत चाललेले सरकार










काश्मीर खोऱ्यात जे कोणते राजकीय पक्ष होते त्या सर्वांवर एक प्रकारे बंदी आणि त्यांच्या सर्व नेत्यांना नजरबंद व स्थानबध्द करण्यात आलेले आहे. यात राजकीय संवादाद्वारे राजकीय प्रक्रिया पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती पावले उचलली जात आहेत हे गुलदस्तात आहे. काश्मीरशी संबंधित एका वरिष्ठ तज्ञाने सांगितले की काश्मीरमधील बहुतेक सर्व राजकीय नेत्यांना आणि हुरियतच्या नेत्यांनाही बंदिस्त करुन वर्तमान केंद्रीय राजवटीने राजकीय संवाद साधण्यासाठी किंवा वाटाघाटी सुरु करण्यासाठी जे 'बफर' असते तेच नष्ट केलेले आहे आणि त्यामुळेच त्यांची अवस्था अंधारात चाचपडण्यासारखी झाली आहे. ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.

या देशाचे पंतप्रधान उर्फ विश्वगुरु उर्फ ब्रह्मांडनायक राष्ट्रवाद, देशभक्ति, साहस याबाबत नेहमीच बोलत असतात. त्यांचीच री त्यांचे सहनायक उर्फ भाजपचे चाणक्य उर्फ देशाचे गृहमंत्रीही ओढत असतात. त्यांच्या सुरात सूर मिळविण्याचे काम इतर लहानमोठी प्यादी किंवा झिलकरी करीत असतात. मग एक मंत्री म्हणतात 'अरे, 56 इंची छाती असलेला नेताच 370 रद्द करु शकतो.' दुसरे आणखी काही म्हणतात आणि ही तोंडपुज्यांची वाचाळ दिंडी सतत सुरु असते.



पण ज्या जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा व अधिकार देणारी कलमे 370 व 35(अ) रद्द केल्यानंतर पुढे काय करायचे याबाबत पूर्णतया अंधार आहे. तेथील परिस्थिती पूर्ववत व सर्वसामान्य -सुरळीत करण्याच्या संदर्भात जी पावले उचलायला हवीत ती न उचलता केवळ विचका सुरु आहे. राष्ट्रवाद व देशभक्तीचे दावे करणारे, फुशारक्या मारणारे हे सरकार किती परधार्जिणे आहे याचे उदाहरण नुकतेच घडले. या सरकारने भारतातील संसद सदस्यांना काश्मीरला जाण्यास मज्जाव केला. पण युरोपियन युनियन(इयू)च्या संसदसदस्यांना मात्र मोदी राजवटीने काश्मीरची सैर करवली आणि त्यांच्याकडून स्वतःला प्रमाणपत्र मिळविले. परंतु संशयास्पद गोष्टींचे भांडे नेहमीच फुटते. युरोपियन युनियनचे जे शिष्टमंडळ भारतात आले आणि त्यांनी काश्मीरला भेट दिली ते अधिकृत शिष्टमंडळच नव्हते. युरोपियन संसदेच्या अधिकृत नसलेल्या शिष्टमंडळाला काश्मीरला नेण्यात आले एवढेच नव्हे तर साक्षात पंतप्रधानांनी देखील त्यांना भेट देऊन उपकृत केले. या शिष्टमंडळाचा दौरा खासगी होता. राजनैतिक आणि मुत्सद्देगिरीच्या पातळीवर एवढी दिवाळखोरी पूर्वी कधी झाली नव्हती. परंतु हल्ली प्रश्न विचारणे, प्रश्न व शंका उपस्थित करणे हे 'दंडनीय अपराध'झाल्याने त्याबाबत केवळ कुजबूज सुरु आहे. काही माध्यमांनी या संदर्भातील काही गोष्टी खणून काढल्या. त्या लक्षात घेतल्यास या देशाचे नेतृत्व किती सुमारबुध्दी आहे याची कल्पना यावी.

मुळात काश्मीरचा मुद्दा ही केवळ द्विपक्षीय म्हणजे भारत व पाकिस्तान पुरती मर्यादित बाब असल्याने इतर तिसऱ्या कोणत्याही देशाला त्यात लक्ष घालण्याचे कारण नाही ही भारताची जगजाहीर भूमिका आहे. असे असूनही या तत्वाला भारतानेच हरताळ फासला आणि विनाकारण युरोपियन युनियनच्या संसदसदस्यांना आणि अधिकृत दौरा नसताना काश्मीरला नेण्याचा अगोचरपणा



काश्मीरला नेण्यात आलेले युरोपियन युनियनचे शिष्टमंडळ

गुलाब नबी आझाद आणि सीताराम येचुरी यांना पहिल्यांदा श्रीनगरला जायला सरकारने परवानगी नाकारल्यानंतर त्यांची विमानतळावर भेट झाली.



करण्यात आला. एका बाजुला भारतातल्याच संसदसदस्यांना काश्मीरला जाण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस सीताराम येचुरी आणि काँग्रेसनेते व जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री गुलाम नबी आझाद यांना दोनवेळेस श्रीनगर विमानतळावरुन माघारी पाठविण्यात आले होते. अखेर कोर्टांकडे दाद मागून या दोन्ही नेत्यांना विविध अटी मान्य करुन श्रीनगरला जायची परवानगी मिळाली. अजुनही कोणाही भारतीय नेत्याला, पत्रकाराला काश्मीरला जाताना अनेक अडथळे पार करावे लागत आहेत. परंतु युरोपियन युनियनच्या संसदसदस्यांना मात्र या सरकारने काश्मीरमध्ये मुक्तद्वार दिले. याला म्हणतात परधार्जिणेपणा!


आता या दौऱ्याच्या आयोजनातही कशा संशयास्पद गोष्टी होत्या त्याची माहिती फारच मनोरंजक किंवा एखाद्या कथा-कादंबरीप्रमाणे वाटेल. बेल्जियमची राजधानी ब्रसेल्स (हे युरोपियन युनियनचे मुख्यालयपण आहे) येथे मादी शर्मा नावाची महिला एक थिंकटँक चालवते. महिलाकल्याणाच्या क्षेत्रात ही संस्था काम करते असा दावा केला जातो. 'वुइमेन्स इकॉनॉमिक अँड सोशल थिंकटँक' ही संस्था त्या चालवतात. आता या संस्थेचा आणि काश्मीरचा संबंध काय हा प्रश्न उपस्थित होतो. तर या संस्थेतर्फे युरोपियन संसदसदस्यांच्या एका शिष्टमंडळाची निवड करण्यात आली. यातील बहुतांश सदस्य हे उजव्या विचारसरणीचे होते असे आता आढळून आले आहे. नावापुरत्या दोन-तीन उदारमतवादी विचाराच्या राजकीय पक्षांचे प्रतिनिधी या शिष्टमंडळात समाविष्ट करण्यात आले होते. या शिष्टमंडळास भारतातील 'आयआयएनएस' (इंडियन इन्स्टिट्यूट फॉर नॉन अलाइड स्टडीज) नावाच्या थिंकटँकने म्हणजे अध्ययन संस्थेने भारतभेटीसाठी निमंत्रित केले असल्याचे सांगण्यात आले. या भारतातल्या संस्थेचा ठावठिकाणा शोधण्याचा प्रयत्न केला असता ही संस्था कधीतरी 1980च्या दशकात स्थापन झाल्याची माहिती मिळाली. ही संस्था गोविंदनारायण श्रीवास्तव नावाच्या व्यक्तीने स्थापन केली होती. ही व्यक्ती पत्रकार होती अशी माहिती समजते. या व्यक्तीचा मृत्यु 1999 मध्ये झाला असून सध्या या संस्थेच्या कार्यालयाला टाळे लागलेले आहे. या कार्यालयात कुणीच येत नसल्याची माहिती समजली. म्हणजे जवळपास निष्क्रिय व टाळेबंद असलेल्या संस्थेच्या नावाने आमंत्रण आल्याचा दावा करुन या तथाकथित शिष्टमंडळाचा दौरा आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्याच्या आयोजनातील प्रमुख केंद्रबिंदू असलेल्या मादी शर्मा यांचे पंतप्रधान कार्यालयात लागेबांधे असून त्यांनी या शिष्टमंडळास भारताच्या पंतप्रधानांबरोबर भेट घडवून आणण्याचे आश्वासनही दिले होते आणि विशेष म्हणजे ही भेटही घडवून आणली गेली. जे भारताचे पंतप्रधान देशातील लोकांना भेटणे दुरापास्त आहेत. भारतातील विरोधी पक्षनेत्यांना देखील ते भेटत नाहीत ते पंतप्रधान या अनधिकृत शिष्टमंडळास मात्र भेटले. या शिष्टमंडळाने अपेक्षेप्रमाणे काश्मीरबाबत मोदी

सरकारला एक सर्टिफिकेट देऊन टाकले आणि ते परत गेले. कार्यभाग उरकण्यात आला. राजसत्तेच्या भाट-भक्तांनी त्याचेही पोवाडे गाण्यास सुरुवात केली.

यातून उत्पन्न होणारे काही प्रश्न ! हे सर्व नाटक कशासाठी रचण्यात आले ? काश्मीरचा मुद्दा द्विपक्षीय पातळीपुरताच मर्यादित असताना विनाकारण युरोपीय संसदेच्या सदस्यांना बोलावून त्याला आंतरराष्ट्रीय स्वरुप देण्याच्या या कृतीचा अर्थ काय ? अनधिकृत शिष्टमंडळास पंतप्रधानांनी भेट देण्याचे कारण काय ? भारतातील इतर पक्षांच्या राजकीय नेत्यांना काश्मीरमध्ये जाण्यास मज्जाव का ? पत्रकारांना देखील तेथे जाण्यात असंख्य अडथळे आणले जाण्याचे कारण काय?


वगैरे वगैरे वगैरे !!

काश्मीरचे विभाजन करुन दोन केंद्रशासित प्रदेशात त्याचे रुपांतर करण्याबरोबर तेथील बहुतेक सर्व राजकीय पक्षाच्या









नेत्यांना नजरकैदेत व स्थानबध्दतेत ठेवण्यात आलेले आहे. याला आता तीन महिने होऊन गेले आहेत. परंतु केंद्र सरकारने तेथे राजकीय प्रक्रिया किंवा राजकीय संवाद किंवा वाटाघाटी सुरु केलेल्या नाहीत. सर्व काही बंदिस्त व निष्क्रिय अवस्थेत आहे. केंद्र सरकारने ब्लॉक पातळीवरील निवडणुका घेतल्या आहेत परंतु त्यामध्ये केवळ सरकार पुरस्कृत उमेदवार उभे राहू शकले आहेत आणि त्यांना भरघोस मते पडल्याचे दावे जोरजोरात करण्यात येत आहेत. परंतु यापूर्वी देखील तेथे याच पध्दतीने निवडणुका होत असत आणि त्यामागे सरकारी यंत्रणांचा कसा हात असे याच्या सुरस कथाही प्रचलित होत्या. त्याचीच पुनरावृत्ती केली जात नाही हे कशावरुन ? असेच आणखीही काही अनुत्तरित प्रश्न या संवेदनशील काश्मीर मुद्यावर आहेत.

जम्मू-काश्मीर आणि लडाख हे दोन केंद्रशासित प्रदेश 31 ऑक्टोबर रोजी अधिकृतपणे अस्तित्वात आले. जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल म्हणून गुजरात केडरचे आयएएस अधिकारी आणि नरेंद्र मोदी मुख्यमंत्री असताना त्यांचे प्रधान सचिव असलेले गिरिशचंद्र मुरमू यांची नियुक्ति करण्यात आली. देशाची सूत्रे चालविणाऱ्या दोन प्रमुख व्यक्ती - पंतप्रधान व गृहमंत्री - गुजरातचेच असल्याने त्यांना अशा संवेदनशील पदासाठी गुजरातशी व त्यांच्याशी निकट संबंधित व्यक्तीची नियुक्ती करावीशी वाटणे आणि या दोन्ही नेत्यांचा






‘अजेंडा’ राबविण्यासाठीही अशाच व्यक्तीची आवश्यकता भासणे हे स्वाभाविक मानावे लागेल. जम्मू-काश्मीरचे विभाजन करणे, त्यांचे दोन केंद्रशासित प्रदेशात रुपांतर करणे आणि त्यांचे विशेषाधिकार संपविण्याची प्रक्रिया तर मोदी सरकारने पूर्ण केली. परंतु जम्मू-काश्मीर आणि विशेषतः काश्मीर खोऱ्यात परिस्थिती सर्वसाधारण व सुरळीत करण्याची बाब अद्याप मोदी राजवटीला जमलेली नाही.

काश्मीरमध्ये परिस्थिती शांत आहे, एकही गोळी महिना-दीड महिना झाडली गेली नाही आणि कुणाचीही हत्या झाली नाही हे सरकारचे दावे गेल्या काही दिवसात फोल ठरल्याचे आढळून आले आहे. लडाख केंद्रशासित प्रदेश अस्तित्वात



आल्याच्या दिवशी(31 ऑक्टोबर) कारगिलमधील नागरिकांनी एक प्रचंड मोठा मोर्चा काढून आपला विरोध व निषेध प्रकट केला. कारगिल व द्रास या दोन प्रमुख शहरातील बाजार तीन दिवस बंद ठेवण्यात आले होते. लडाख केंद्रशासित प्रदेशात लेह आणि कारगिल हे दोन जिल्हे समाविष्ट आहेत. कारगिलच्या नागरिकांनी नव्या केंद्रशासित प्रदेशाचे नाव 'लेह-कारगिल' असे ठेवण्याचे सुचविले होते. कारगिल हा प्रामुख्याने शिया मुस्लिम बहुसंख्यक जिल्हा आहे. लेहवर बौध्द धर्मीयांचे वर्चस्व आहे. केंद्र सरकारने या भागातील बेकारी कमी करण्याच्या दृष्टीने नोकऱ्या देण्याबाबत काही वायदे केले होते आणि 31 ऑक्टोबरपूर्वी त्यावर अंमलबजावणीचे आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात तसे काही न घडताच विभाजन झाले आहे. कारगिलचा या विभाजनालाही ठाम विरोध आहे. बाहेरच्या व्यक्तींना आपल्या जमीनी दिल्या जातील या कल्पनेने येथील नागरिक धास्तावलेले आहेत. सरकार ही त्यांची भीती दूर करु शकलेले नाही. यातच त्यांचे अपयश स्पष्ट होते. काश्मीर खोऱ्यातही वेगळी भावना नाही. त्यामुळेच तेथील नागरिकांनी, दुकानदार व व्यावसायिकांनी आपण होऊन बंद पाळण्याची भूमिका घेतलेली आहे. केवळ नागरिकांच्या सोयीपुरती व आवश्यक ती खरेदी करण्यापुरतीच दुकाने उघडणे व नंतर बंद ठेवणे अशा रीतीने आपला निषेध चालू ठेवला आहे. या एका उदाहरणावरुनच काश्मीरमध्ये परिस्थिती किती सर्वसामान्य व सुरळीत आहे हे कळून येईल.

काश्मीर खोऱ्यात जे कोणते राजकीय पक्ष होते त्या सर्वांवर एक प्रकारे बंदी आणि त्यांच्या सर्व नेत्यांना नजरबंद व स्थानबध्द करण्यात आलेले आहे. यात राजकीय संवादाद्वारे राजकीय प्रक्रिया पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती पावले उचलली जात आहेत हे गुलदस्तात आहे. काश्मीरशी संबंधित एका वरिष्ठ तज्ञाने सांगितले की काश्मीरमधील बहुतेक सर्व राजकीय नेत्यांना आणि हुरियतच्या नेत्यांनाही बंदिस्त करुन वर्तमान केंद्रीय राजवटीने राजकीय संवाद साधण्यासाठी किंवा वाटाघाटी सुरु करण्यासाठी जे 'बफर' असते तेच नष्ट केलेले आहे आणि त्यामुळेच त्यांची अवस्था अंधारात चाचपडण्यासारखी झाली आहे. ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. अशा रीतीने एखाद्या समाजाला, राज्याला सतत बंदिस्त अवस्थेत दाबून ठेवणे उचित नाही व त्याचा स्फोट झाल्यास त्यातून आणखी नवे पेचप्रसंग निर्माण होतील.


हे मतप्रदर्शन करणाऱ्या व्यक्तीने काश्मीरमध्ये अतिशय उच्च पदांवर काम केलेले आहे. परंतु सुमारबुध्दी नेतृत्वाला शहाणपणाच्या सल्ल्याचे नेहमीच वावडे असते आणि चुकांचे समर्थन करण्यातच ते धन्यता मानत बसतात.


काश्मीरवर टिप्पणी करताना एका तज्ञाने सांगितले की हा वाघावर स्वार



जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल गिरीशचंद्र मुरमू







लेह लडाखचे नायब राज्यपाल

होण्याचा प्रकार आहे. वाघावर स्वार तर झाले आहेत परंतु उतरायचे कसे हे या सरकारला समजेनासे झाले आहे. कारण उतरले तर वाघ नक्की खाणार या भीतीने धास्तावलेले हे सरकार आहे आणि त्यामुळेच ते आता चुकामागून चुका करीत सुटले आहे. आणखी एका तज्ञाने युध्दात वापरल्या जाणाऱ्या जमिनीतल्या सुरुंगाचे उदाहरण दिले. जमिनीतल्या सुरुंगावर पाय तर ठेवला आहे. जर पाय काढला तर त्याचा स्फोट होणार आहे. आता या अवस्थेत किती काळ उभे राहणार असा हा पेच प्रसंग आहे आणि मोदी सरकार या पेचात अडकलेले आहे. जर्मनीच्या प्रमुख अँजेला मर्केल भारताच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आल्या होत्या. त्यांनी अचूकपणे या परिस्थितीचे वर्णन केले आणि काश्मीरमधील सध्याची परिस्थिती अशाच रीतीने दीर्घकाळ राहू शकणार नाही असे स्पष्टपणे म्हटले. हा भारताचा दौरा आटोपून परतताना त्यांनी दिलेली कानपिचकीच होती.

विरोधी पक्षनेते आणि पत्रकार काश्मीरबाबत वस्तुनिष्ठ गोष्टी बोलत असतात. परंतु ते देशद्रोही व राष्ट्रविरोधी असल्याचे आणि त्यांच्या या कृतिमुळे परदेशात भारताची प्रतिमा मलिन होत असल्याची टीका वर्तमान राजवटीतर्फे सातत्याने केली जात असते. पण काश्मीरच्या मुद्याचे आंतरराष्ट्रीयीकरणात केंद्र सरकारच जबाबदार आहे असे म्हटल्यास त्यात वावगे काय ? या सरकारने त्यांच्या परराष्ट्र धोरणाचा केंद्रबिंदू पाकिस्तान ठेवलेला आहे. पाकिस्तान म्हटले की काश्मीर व दहशतवाद या दोन मुद्यांभोवती भारताचे परराष्ट्रधोरण फिरत राहणार हेही ओघाने आलेच. अशा परिस्थितीत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी जेव्हा काश्मीरवर मध्यस्थीची भाषा केली त्याला जबाबदार कोण होते ? भारताचे पंतप्रधान व डोनाल्ड ट्रंप यांच्यातील बोलण्यांमध्ये हा मुद्दा आल्याचे ट्रंप यांनी म्हटलेले होते व त्यावर भारतीय पंतप्रधान मूग गिळून गप्प आहेत. याचाच अर्थ पाणी कुठेतरी मुरते आहे. अन्यथा युरोपीय युनियनचे शिष्टमंडळ, डोनाल्ड ट्रंप यांचा गौप्यस्फोट या गोष्टी घडल्या नसत्या. वर्तमान सरकार अनेक संशयास्पद गोष्टी करीत आहे आणि काश्मीर हे त्याचे सर्वात मोठे उदाहरण आहे. काश्मीरमध्ये हे सरकार काय करु इच्छित आहे याचा कोणताही आराखडा सरकारने सादर केलेला नाही. संसदेला देखील विश्वासात घेतलेले नाही आणि केवळ मूठभर अधिकाऱ्यांना हाताशी धरुन केवळ दोनच नेते काश्मीरची हाताळणी करीत आहेत. याची परिणिती काश्मिरी जनता भारतापासून आणखी तुटण्याची स्थिती निर्माण होईल आणि तेथील जनतेला कायमस्वरुपी सुरक्षा दलांच्या छायेत रहावे लागण्याची ही दुश्चिन्हे आहेत!



# स्वतःचं नेतृत्व अधिक मजबूत करा

आपल्याला महाराष्ट्रातील काही भागात अधिक जागा मिळाल्या, तर काही भागामध्ये आपल्याला आणखी काम करण्याची गरज आहे, हे लोकांनी निवडणुकीच्या निकालातून दाखवून दिले आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातला लहानथोर कार्यकर्ता अत्यंत जिद्दीने या निवडणुकीत उतरला आणि पक्षाची भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला. तुम्हा लोकांना निवडणुकीत यश आले नाही. त्याला कारण अनेक आहेत. जे विजयी झाले, त्यांनी जबरदस्त शक्ती लावलेली होती. दिल्ली आणि राज्याचे सरकार त्यांच्या हातामध्ये असल्यामुळे त्याचा पुरेपूर लाभ घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. याचीही काही किंमत आपल्याला द्यावी लागली. पण, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा कार्यकर्ता बहुसंख्य ठिकाणी एकत्रित काम करत होता. दापोलीच्या उमेदवाराने आपला अनुभव वेगळा सांगितला. पण, मला स्वतःला असं वाटतं की, ज्यावेळी उमेदवार पक्षाचा कार्यकर्ता काम करत नाही, असं सांगतो. त्यावेळी स्वतःताला आधी तपासून पाहिले पाहिजे. माझ्याच पक्षातला कार्यकर्ता माझ्यापासून दूर का जातो. विरोधी व्यक्तींनी काम केले नाही, ते मी समजू शकतो.



विधानसभा निवडणुकीत विजयासाठी प्रचंड कष्ट घेऊनही पदरी अपयश आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांचे मनोबल वाढविण्यासाठी त्यांच्याशी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, विधान मंडळाचे राष्ट्रवादीचे गटनेते अजित पवार, खासदार श्रीनिवास पाटील आणि आमदार छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश कार्यालयात सुसंवाद साधला. त्यावेळी त्यांनी वंचितला पाठिंबा देणारा दलित, नवबौद्ध हा वर्ग आपल्या बाजुला आहे की नाही हे पाहिले नाही त्यामुळेच त्याचा फटका बसला आहे. आता आपल्या कामाने हा समाज आपल्याकडे कसा येईल असा प्रयत्न येत्या काळात करणार असल्याची माहिती या बैठकीत दिली.

काही ठिकाणी काँग्रेस पक्षाचे जे आपले सहकारी आहेत, तिथं काही ठिकाणी थोडी फार गडबड होऊ शकते. आपण आपलाच कार्यकर्ता ज्यावेळी विरोधी काम करतो, ही तक्रार ज्यावेळी आपण करतो, त्यावेळी मला स्वतःला वाटते की कामच्या स्वरूपासंदर्भात स्वतःला तपासून घ्यायला पाहिजे.

निवडणुकीमध्ये नव्या पिढीने आपल्या पक्षाला पाठिंबा चांगला दिला. या निवडणुकीमध्ये आपण पाहिले, प्रचारामध्ये तुम्ही सगळेच होता. तुमच्या सभांना तरुण पिढी फार मोठ्या प्रमाणात उभी होती. त्यांची साथ आपल्याला मिळाली. या निवडणुकीमध्ये आणखी एक काम आपल्याला बघायला मिळाले. समाजात जो अल्पसंख्यांक आहे, विशेषतः मुस्लीम. त्यांनी ताकद नावाने संघटित होतोय. लोकसभेच्या निवडणुकीवेळी तो अधिक संघटित झाला. त्याच्यामध्ये मुस्लीम समाजही होता. नंतर मुस्लीम समाज त्यापासून बाजूला गेला. आणि मुस्लीम समाजाने याचा अर्थ असा काढला की, वंचित म्हणजे भाजपला अप्रत्यक्ष मदत करणे, हे त्यांच्या ध्यानात आले. आणि समाजातला एक घटक की जो डा. बाबासाहेब आंबेडकरांना मानणारा आहे. नव बौद्ध आणि तत्सम वर्ग आज वंचितच्या माध्यमातून उभे राहिले आहेत. आणि गेल्या अनेक वर्षांचा अनुभव पाहिला तर हा घटक आपल्या बरोबर होता. तो आपल्यापासून बाजूला गेला आहे. तो बाजूला गेला म्हणून त्यांना दोष देण्यात अर्थ नाही. त्यांचा विश्वास संपादन करण्यात आपले काही तरी चुकलं. समाजकारणामध्ये काम करत



**अतिवृष्टीमुळे खराब झालेल्या सोयाबीन पिकाची नाशिक जिल्ह्यात जाऊन शरद पवार यांनी पाहणी करून शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. तेव्हा शेजारी रवींद्र पगार व इतर मान्यवर.**

राष्ट्रवादीच्या पाठिमागे खूप मोठ्या प्रमाणात ठिकठिकाणी उभी राहिली. या वेळी अल्पसंख्यांकांची मनस्थिती काही झाले तरी चालेल, पण भाजप नको, आणि आपल्याला पाठिंबा द्यायचा, हे सूत्र त्यांनी स्वीकारले. त्याची मदत झाली. शेतकरी वर्गाचा पाठिंबा आपल्याला समाधानकारक झाला.

काही बाबतीत मात्र आपण कमी पडलो. काही जणांनी सांगितले की, वंचितने असं केलं, वंचितने तसं केलं. शेवटी वंचित म्हणजे कोण, तर समाजातील एक गरीब वर्ग आज वंचितच्या असताना सगळ्यांना बरोबर घेऊन जातो, त्यामध्ये हा वंचितला पाठिंबा देणारा वर्ग हाही आपल्या बरोबर आहे की नाही, हे आपण फारसे बघत नाही.

आपण राजकीय निर्णय घेतो, विधानसभा सोडा, विधान परिषद सोडा, अगदी ग्रामपंचायत असो, पंचायत समिती असो, जिल्हा परिषद असो, सहकारी संस्था असो, या ठिकाणी आपण उमेदवार घेतो. पण, हे घेत असताना आपले सूत्र, आपल्या आजूबाजूला जे लोक आहेत, त्याच्या बाहेर जायला आपण

तयार होत नाही. आणि नेमका हा गरीब वर्ग आपल्यापासून बाजूला जातो. या गरीब वर्गातील आत्मविश्वास वाढविण्याचे काम वंचितने केले. त्यामुळे तो वर्ग संघटित झाला. त्याच्यामुळे या पुढे आपल्याला वंचितमध्ये सहभागी झालेला, पाठिंबा दिलेला वर्ग कामाने, विश्वासाने आपल्याकडे कसा घेता येईल, याची काळजी घेण्याची गरज आहे. या कामात तुम्ही सगळ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे. आज महाराष्ट्रामध्ये अतिवृष्टीने ठिकठिकाणी नुकसान झाले आहे. विदर्भात झाले आहे. मराठवाड्यात झाले आहे. या वेळी आपला प्रत्येक सहकारी बांधावर दिसला पाहिजे. त्याचा राजकीय फायदा व्हावा म्हणून नव्हे, तर त्या वर्गाच्या हिताच्या जपणुकीसाठी राष्ट्रवादीच उतरतो, हा संदेश ठिकठिकाणी गेला मी म्हटलो, का. कशाशाठी. कशामुळे. तर त्या म्हणाल्या की, आमच्यावर कितीतरी संकटं आली तरी त्यांचे आमच्या पाठिशी उभं राहण्याची दानत नाही. मोदी हा व्यक्ती म्हणत नाही, तर हा संबंध वर्ग. ती आदिवासी बाई असं बोलते, याचा अर्थ आताच्या सत्ताधाऱ्यांबद्दल राग, नाराजी त्याच्यामध्ये आहे. ही जरी असेल तर त्या सगळ्यांना संघटित करणे, हे काम आपणच करू शकतो. तर मला खात्री आहे की, या संकटाच्या काळात आपणच त्यांच्या पाठिशी उभे राहतो, हा विश्वास वाढविण्याची गरज आहे. त्याच्यामध्ये तुम्ही सगळ्यांनी वैयक्तीक लक्ष द्या. मी ज्या ज्या वेळी जातो, त्याचा फायदा एक होतो की, एक संदेश जातो, राज्यात किंवा देशात की राष्ट्रवादी काँग्रेस आणि त्यांची लीडरशीप लगेच



**''आधी मोदींना पहिले घालवा,'' असे आदिवासी समाजातल्या महिलाही भेटीच्या वेळी आवर्जून पवार साहेबांना सांगत होत्या.**

पाहिजे आणि लोकांना त्याची आवश्यकता आहे.

काल आम्ही नाशिक जिल्ह्यात गेलो. मला आश्चर्य वाटले. आम्ही इगतपुरीला गेलो. तिथे आदिवासी समाजाच्या महिला होत्या. त्या भाताच्या पिकाचे नुकसान झालेले दाखवत होत्या. त्यांना विचारले की, काय करायला पाहिजे. काय केले पाहिजे. ते म्हणाले, मोदीला पहिलं घालवा. मला काही समजेना, आदिवासी समाजातील दोन बायका, त्यांच्या शेतात भाताचे नुकसान झाले आहे, आणि त्या म्हणतात की, मोदीला घालवा. कामाला लागते. मी गेल्यानंतर तुम्ही तुमच्या भागात लक्ष देता. त्या गोष्टीचा लाभ लोकांना होत असते. याची नोंद योग्य वेळी मतदारही घेत असतो.

काही ठिकाणी आपण पराभूत झालो. त्यातील धरसोड वृत्तीचा विचार आपण केला पाहिजे. पण, काही ठिकाणी संघटनात्मक काम कमी पडले. तिथे आपल्याला किंमत मोजावी लागली. त्याच्यामध्ये दोन भाग आहेत की, काही जिल्ह्यांमध्ये प्रमुख पदाची जबाबदारी काही लोकांकडे वर्षानुवर्षे आहे. काही

ठिकाणी बैठक घेऊन जिथे पाच वर्षे, दहा वर्षे, पंधरा वर्षे सत्तेत आहे संघटनेच्या तिथे काही बदल करता येतील का सर्वांना विश्वास घेऊन त्याची गरज आहे. नव्यांना संधी दिली पाहिजे. नवा चेहरा, नवा उत्साह हा त्या ठिकाणी आणला तर तो अधिक जोमाने काम करेन. त्यासाठी आपल्याला अधिक लक्ष द्यावे लागेल. संघटनात्मक जबाबदारी घेऊन एक वरिष्ठांचा संचही जबाबदारी टाकून तयार केला पाहिजे. ती काळजी तुम्ही त्या ठिकाणी घेतली पाहिजे.

तरुण वर्ग आपल्याकडे मोठ्या प्रमाणात येत आहे. एससी, एसटी, महिला यांचेही संघटन वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपण आदिवासी आणि दलित यांच्यामध्ये संघटना म्हणून काम करण्याला कमी पडतो. आपला सामाजिक विभाग आहे, पण त्याला अधिक कष्ट घेऊन काम करण्याची गरज आहे. हा वर्ग विचाराने दुसरीकडे जाऊ इच्छित नाही. आपण त्यांच्या पाठिशी भक्कमपणाने उभं रहावं. आपण त्यांना प्रतिष्ठा देतोय, हे दिसलं पाहिजे. त्या कामात अधिक लक्ष देण्याची गरज आहे. महिलांची जबाबदारी रुपालीताई यांनी घेतल्यानंतर त्या सगळीकडे फिरतायेत, हे आपल्याला दिसत आहे. पण त्यांनी एकट्याने कष्ट करून चालणार नाही. त्या त्या भागातील, त्या त्या जिल्ह्यातील, तालुक्यातील सहकाऱ्यांनी ज्या भागातील भगिनी काम करण्यासाठी पुढे येत आहेत, त्यांच्या पाठिशी सहकार्याची भूमिका घेतली पाहिजे. त्या दृष्टीने आपण अधिक लक्ष देण्याची गरज आहे. निवडणुकीमध्ये यश आले नाही म्हणून नाउमेद होण्याची गरज नाही. प्रांताध्यक्षांनी विचार केला आहे की, तुमच्या सगळ्यांवर काही जबाबदाऱ्या टाकायच्या आहेत. तुम्हाला एखाद्या जिल्ह्याची जबाबदारी असेल, एखाद्या भागाची जबाबदारी असेल, जे काही पक्ष तुमच्या कामात लक्ष घालेल ते, तुमच्यावर जबाबदारी टाकण्याचे कारण म्हणजे तुमच्या मतदारसंघामध्ये, तुमच्या जिल्ह्यामध्ये पक्षाच्या वतीने हा संदेश द्यायचा आहे की, अ, ब, क हा आमचा सहकारी निवडणुकीत यशस्वी झाला नाही, पण, आमच्या भागाचा, जिल्ह्याचा क्रमांक एकचा नेता तो आहे. ते स्थान जनमानसात होईल, याची काळजी पक्ष घेणार आहे. ठिकठिकाणी प्रत्येक गोष्टीत तुम्हाला सहभागी करून घेण्याचा निकाल घेतलेला आहे. त्यामुळे तुम्हीसुद्धा त्या तयारीत राहिले पाहिजे.

एकदंर निवडणुकीचा निकाल घेतल्यानंतर मुंबई शहर, ठाणे जिल्हा येथे आपल्याला अधिक जबाबदारीने काम करण्याची गरज आहे. पक्ष म्हणून ताकद आम्ही त्या ठिकाणी देणार आहोत. मुंबईत आपली एकच जागा आली. ठाण्यात आपल्या दोनच जागा आल्या. पालघरला आपली एकच जागा आली. एकेकाळी ठाण्यातील महानगरपालिका आपल्याकडे होत्या. आता यामध्ये आपण थोडसं कमी पडतोय. पक्ष म्हणून आमची सगळी शक्ती तुमच्या पाठिशी उभी करणार आहोत. पण तुम्ही सुद्धा आपापल्या क्षेत्रात अधिक कष्टाने संघटना बांधण्याच्या तयारीला लागले पाहिजे. आज त्याची अत्यंत गरज आहे. आपण तयारीला लागू या. पुन्हा उभं करूयात. आज जी काही संकटे महाराष्ट्रात आहेत. त्यात तुम्ही पण सहभागी आहात, हे चित्र दाखवूयात आणि आपलं स्वतःचं नेतृत्व अधिक मजबूत करण्याची काळजी घेऊयात.





# राष्ट्रवादी प्रबोधिनी तयार करा...

## खासदार श्रीनिवास पाटील यांचे विचार

तुम्ही मंडळींनी आता मदत करण्याची गरज आहे. गावं बरीचशी बुडलेली आहेत. बी नाही. माझ्या लहानपणी एक पद्धत होती की, पायलीभर बी द्यायचं आणि पोतंभर माघारी घ्यायचं. आता जर लोकांना मदत केली आपल्याच गावातल्या, आपल्या भागातल्या बियाबाबतची, खतांची. पडलेल्या घरांचे पंचनामे करण्यासंदर्भात तलाठी, सर्कल ऑफिसर काम करत नसतील तर तहसीलदारांना भेटा. तुम्ही मिळवून दिलं, असं जर लक्षात आलं, तर लोकं तुमच्या मागे उभे राहतील. कारण, आता तुम्ही मोकळे व्हायला पाहिजे. आभार दौरा करा. त्यात विचारा, काय पाहिजे. काम करता येतात. जाताना काम करा आणि येताना झालं म्हणून सांगा. माझं उदाहरण देतो, काल मी निघालो होतो, एका गावची लोकं मला भेटली. त्यांना मी मदत केली. काम झालं. एका दिवसात. काही काही छोटी असतात. दादांनी आता स्पष्टपणाने सांगितले. दादांना कोणतीही गोष्ट भिजत ठेवायला आवडत नाही. खटका. आमच्याकडे म्हणतात की, जागेवर पलटी आणि खटक्यावर बार.

मला साहेबांना एक सुचवायचे आहे की, राष्ट्रवादी विचारांची राष्ट्रीय प्रबोधिनी जर आपल्या कुठे काढता आली, जर तरुणांना आवाहन करत साहेब महाराष्ट्रभर फिरतात. चांगली चांगली मुले आहेत. सचिन दोडकेसारखा मुलगा म्हणतो की, तरुणांची ताकद वापरा. ट्रेनिंग द्यायला पाहिजे. बंदूका असून उपयोग नाही. गोळ्या असून उपयोग नाही. नेम धरायचा कळले पाहिजे आणि कधी बार व्हायला पाहिजे, हे कळले पाहिजे. याकरिता आपण साहेबांच्या मागे लागू यात आणि राष्ट्रीय प्रबोधिनी स्वर्गीय यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या नावाने काढा किंवा शरदरावांच्या नावाने काढा. पण जर प्रबोधिनी झाली आणि तिथला कार्यकर्ता जर तयार झाला, तर तिकीटासाठी त्यांचा नंबर आणि सर्टीफिकेट जोपर्यंत सामान्य समाजातला तरुण, सुशिक्षित तरुण पक्षाचा ध्येयवाद आणि पुढे करण्याची कामे, वक्तृत्व, आता अमोल मिटकरी आहे. काय आहे, नुसतं बोलणं. अमोल कोल्हे काय आहे. नुसतं बोलणं. पण, त्यातून माणसांची मने जिंकणे, यासाठी प्रबोधिनी केली तर फार बरं होईल.

पुनर्वसन करण्यासाठी आपण मदत करा. अजितदादांसोबत पिंपरी चिंचवडच्या नवीन भागात गेलो होते. तिथे मंडळींनी इंग्रजी भाषेत भाषण केले. नव्याने आलेल्या. जमिनी आपल्या आहेत. घरं आपण बांधलेली आहेत. पण त्यांचा आणि आपला काही संबंध नाही. पण, काही कार्यकर्ते असे आहेत की, ॲम्बुलन्स अडकली. मृत्यूचा दाखला लागला. शिक्षणात काही द्यायचे आहे. तर त्यांचा संपर्क लागतो. जी मंडळी परकीय भागातून आलेली आहेत, त्यांना जर आपण जवळचे मानले, उदा. खडकवासल्यात सचिन दोडकेने काय केले, संपर्क. मी तुमच्यासाठी काहीतरी करतो, तुम्ही बिहारी असला, बंगाली असला, तुम्ही गुजराती असताल, पण तुम्ही माझ्या इथे राहताय, इंग्रजी बोलणारी काही मंडळी तयार करा. हिंदी बोलणारी काही मंडळी तयार करा. म्हणून राष्ट्रीय प्रबोधिनी काढणे, त्यात तरुण तयार करणे, प्रचारक तयार करणे, आपल्या विरोधात जे पक्ष आहेत, त्यात आयुष्यभर काम करणारी मंडळी आहेत. आणि हजार रुपये, पाचशे रुपयात काम करतात. बूथ कमिट्यांचे काम आपल्याला वाढवले पाहिजे. ज्यातून आपली माणसं निश्चितपणे संपर्क साधतील.

शरदरावांनी मला संधी दिली. आम्ही चौघे खासदार. मी, सुप्रियाताई, तटकरेसाहेब आणि अमोल कोल्हे जे काही लागेल ते आम्हाला सांगा. महाराष्ट्राच्या प्रश्नासाठी लढण्याची ताकद आमच्यात आहे. फक्त साताऱ्यापुरते नाही. महाराष्ट्राचा कुठलाही प्रश्न आम्ही मांडू शकतो. म्हणून संपर्क साधा. उत्तर येईल. जसं पवारसाहेबांच्या अभिनंदनाच्या पत्राचे उत्तर येते, रोजच्या हजार पत्रावर सह्या होतात. आपला संपर्क ठेवू आणि राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचा ध्येयवाद उचलून धरून अनेकांच्या मनात 2024 आहे, पण त्याच्या अगोदरसुद्धा काही घडू शकतं. म्हणून आपण सगळ्यांनी प्रयत्नपूर्वक काम करूयात.



# पराभवाने खचू नका, पक्षाला उभारी द्या

## अजित पवार यांचे उद्गार

आपल्याशी तुमच्याशी संवाद साधता यावा यामागे एक कारण आहे की, तुम्ही सर्व जण फार जिद्दीने, ताकदीने लढले आहात. संघर्ष केला आहे. काहींनी कडवी झुंज दिली आहे. त्याबद्दल मी आपले मनापासून कौतुक करतो. आणि आभार मानतो. मघाशी उत्तम राव जानकर व सचिन दोडके यांनी सांगितले. निवडणुकीत जय पराजय होत असतो. परंतु जय किंवा पराजय हा सन्मान पूर्वक असला पाहिजे. पक्षाच्या कार्यकर्त्यांचा जय व पराजय हा सन्मान पूर्वक आहे. दहा दिवस झाले तरी अजून कोणी सत्ता स्थापन करण्यात पुढे येत नाही. हे सगळं घडत असताना आपल्या सर्वांना बोलावणे मागे हेच कारण आहे की काही काहींना अचानक उमेदवार दिल्या. काही काही अचानक आपल्यातून निघून गेले. त्यांना शेवटच्या क्षणाला उमेदवारी देण्यात आली. प्रांताध्यक्ष नेहमी तुम्हाला व जिल्हा अध्यक्षांना सांगत होते, की बाबांनो आपल्या आपल्या मतदार संघात बूथ कमिट्या स्थापन करा. त्या जर केल्या असत्या तर अजिबात अडचण आली नसती.

आपण ११८ जागा लढवल्या. फार क्वचित ठिकाणी बंडखोरी झाली. बऱ्याच ठिकाणी आपण शांत केले. काही ठिकाणी काँग्रेसला राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार दिले. म्हणजे ते उमेदवार राष्ट्रवादीचे होते, पण तिथे काँग्रेसकडे ताकदीचे उमेदवार नव्हते म्हणून राष्ट्रवादीचे उमेदवार दिले. कल्याण पश्चिममध्ये मनसेचे उमेदवार राजू पाटील यांना आपण पाठिंबा दिला. बडनेरला रवी राजाला दिला. मुक्ताईनगर ला चंद्रकांत पाटील यांना दिला. करमाळ्यात संजय शिंदे यांना दिला.

शिरोळमध्ये राजेंद्र यड्राकर त्यांच्या ताकदीवर निवडून आले. शंकरराव गडाखही नेवाशातून निवडून आले. वास्तविक हा सगळा आकडा साठच्या पुढे आहे. आपल्यामध्ये दहा- बारा जागा, मग ती चाळीसगावची राजीव देशमुखची जागा असेल, जिंतूरची विजय भांबळेंची जागा असेल, नाशिकमध्ये अपूर्व हिरे यांना उमेदवारी दिली, पण तिथे सीपीआयनीने उमेदवारी दिली. त्यांनी 22

हजार मते घेतली. उल्हासनगरमध्ये ज्योतीताई कलानी यांचा पराभव अत्यंत अल्प मतांनी झाला. दौंडमध्ये रमेशअप्पा थोरात तर अतिशय कमी मतांनी पराभूत झाले. खडकवासल्याला सचिन दोडके, कोरेगावातील शशिकांत शिंदे यांचा पराभव आजही आम्हाला पटत नाही. माळशिरसमध्ये 2590 मतांनी उत्तमराव जानकर पराभूत झाले.

खूप मोठी ताकद आपल्याला नगर व नाशिक या जिल्ह्याने या निवडणुकीच्या निमित्ताने दिली. पण, काही काही जिल्हे फार कमी पडले. विशेषत औरंगाबाद, नांदेड, परभणी, वर्धा, अमरावती, वाशिम, अकोला, चंद्रपूर, सिंधूदुर्ग, धुळे, नंदूरबार, मुंबई. मुंबईमध्ये नवाब मलिक सोडले तर दुसरं कोणी निवडून आले नाही. तिथं खूप काम करावे लागणार आहे. एक आहे की, चंद्रपूरला आपल्याला एकही जागा वाटणीला मिळाली नाही. त्यामध्ये चंद्रपूरकरांचा काही दोष नाही. ते मागणी करत होते.

आता पूरग्रस्त परिस्थिती जी काही महाराष्ट्रावर आलेली आहे. त्यात साहेबांनी दौरे सुरू केलेले आहेत. पुन्हा मराठवाड्याच्या दौऱ्यावर जात आहेत. आम्हीही दौऱ्यावर जात आहोत. संजय कदमने सांगितले की, तिकडे खूप मोठे नुकसान भाताचे आणि इतर पिकांचे झालेले आहे. भाजीपाला, फळबागा आणि धान्यांची पिके गेली आहेत. आता आपण या लोकांच्या मागे धावून गेले पाहिजे. अधिवेशन ज्यावेळी येईल, त्या त्या वेळी आम्ही भूमिका चांगल्या पद्धतीने मांडण्याचे काम आणि जे कोणी सरकार येईल, त्यांना वाकवण्याचे काम निश्चितपणाने करू. याबाबत तीळमात्र शंका मनात बाळगू नका.

आता पाच जिल्हा परिषदेच्या ज्या निवडणुका येणार आहेत आणि पुन्हा बूथनिहाय आखणी करण्याचा कार्यक्रम आहे. मघाशी बऱ्याच जणांनी सांगितले की, कोण कोण कामात कमी पडलं. त्या संदर्भात माहिती घेऊन जिथे कोण कामात कमी पडलेले असेल, त्यांना तिथली जबाबदारी कमी करून तिथं दुसऱ्याला कशी जबाबदारी देता येईल, आणि त्याला जास्त गती कशी देता येईल, हाही प्रयत्न केला जाईल.

आता पदवीधर, शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची मतदार नोंदणी महाराष्ट्रात काही ठिकाणी चालू आहे. याची नोंदही या ठिकाणी उपस्थित असलेल्या जिल्हाध्यक्षांनी आणि या ठिकाणी उपस्थित असणारे जे उमेदवार आहेत, त्यांनी घेतली पाहिजे.

काही जणं सोडून गेले, त्यांचे त्यांना लखलाभ. पण, इथं बसणारे पण काही तळ्यात मळ्यात होते. थांबू का जाऊ, थांबू का जाऊ, काही उमेदवारही तसं वागत होते. जे पराभूत झाले ना ते तुमच्या या असल्या हलगर्जीपणामुळे पराभूत झाले. लोकं म्हणातायेत की, यांना राष्ट्रवादीत रहायचे आहे की जायचे आहे, हेच त्यांना कळेना. अशा पद्धतीची जर तुमच्या मनात संभ्रमावस्था असेल, तर जनतेने तुम्हाला का मतदान करावे. काही जिल्हाध्यक्षही तसेच. त्यांनी स्वतःच्या अंतर्मनाला विचारावे की आपण काय वागलो आणि कशा पद्धतीने वागलो. हे बरोबर नाही. साहेब एकिकडे किती कष्ट घेतायेत आणि तुम्ही त्या जिल्ह्याचे अध्यक्ष काय दिवा लावतायेत. याचे कुठे तरी आत्मचिंतन, आत्मपरिक्षण करा. त्याची गरज आहे. आता कोणाला जर जायचे असेल तर जावा, पण निकालच आता साहेबांमुळे असा लागला की गेलेले पण म्हणतायेत की, येऊ का, येऊ का. जाणारे पण



विसरले की, आता म्हणतायेत त्यावेळी वेगळं डोक्यात आलं होते. आता बरं चांगलं डोक्यात आलं. अशा प्रकारचे जे स्वार्थी राजकारण आहे, ते सोडून द्या. नवीन मुलंही चांगली पुढे येतात. त्यांना संधी दिली तर त्या संधीच सोने करतील. नगर जिल्ह्यामध्ये फक्त संग्राम जगताप जुना उमेदवार होता. जुना म्हणजे दुसऱ्या टर्मचा. बाकीचे पाचही उमेदवार पहिल्या टर्मचे उमेदवार निवडून आलेले आहेत. असं अनेक ठिकाणी घडलेले आहे. संधी मिळाली तर चांगले करू शकतात, हे या निडणुकीच्या निमित्ताने आपण लक्षात घेतले आहे.

माझं आपल्याला एकच सांगणे आहे की, आता जरी काही वेगवेगळ्या गोष्टी घडत असल्या तरी विरोधात बसण्याचा कौल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस किंवा महाआघाडीला दिलेला आहे. आपण आपली जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न मनापासून करतोय. समोरच्यांनीही सरकार लवकरात लवकर स्थापन करावे, अशी आपली अपेक्षा आहे. पराभूत उमेदवारांना एक गोष्ट मला नम्रतापूर्वक सांगायची आहे की, स्वर्गीय विलासराव देशमुख यांचाही पराभव झाला होता. त्या मतदारसंघात ते चाळीस हजार मतांनी पराभूत झाले होते. आणि पुढच्या पाच वर्षात ते 80 हजारांनी निवडून आले. आणि राज्याचे मुख्यमंत्री झाले. म्हणजे पराभव झाला म्हणजे सगळं संपलं आणि आता आपल्याला कोणीच वाली राहिला नाही, असं समजण्याचे काही कारण नाही. हे तुम्ही लक्षात घ्यावे. अशी माझी आपल्या सगळ्यांना विनंती आहे. जे लोकं राष्ट्रवादीमध्ये नवीन आले आहेत, त्यांनी आता येथून पुढे आपली संघटना वाढवायची आहे. तुम्हाला पक्षाने संधी दिलेली होती. तुम्ही यश जवळपास गाठत आणलेले होते. पद मिळाले नाही म्हणून माघार घेऊ नका. मूळचे जे आमचे आहेत, त्यांनाही विश्वासात घेऊ. प्रांताध्यक्षांच्या सल्ल्याने त्या त्या जिल्ह्यामध्ये आपल्याला काय काय नवीन समीकरणे करायची आहेत, कोणाला संधी द्याची, या गोष्टी निश्चितपणाने चांगल्या पद्धतीने करू. कारण, आता आपल्याला थांबून चालणार नाही. आता अधिक जोमाने महाराष्ट्रामध्ये सर्वदूरपर्यंत फिरून आपल्याला काम करावे लागेल. यंदा विदर्भात आपण 12 जागा उभ्या केल्या. त्याच्यात आपली बोपखेलची जागा बंडखोरी झाली म्हणून थोड्या मतांनी गेली. म्हणजे सात जागा झाल्या असत्या. म्हणजे विदर्भानेही आपल्याला चांगला कौल दिला आहे. पण जळगाव, धुळे, नंदूरबार इथं आपल्याला अधिकचे काम करावे लागणार आहे. तिथं निश्चितपणे बदल होतोय. मताधिक्य पूर्वीपेक्षा खूप कमी झालेले आहे. काही काही ठिकाणी तर 60- 60 हजारांचे मताधिक्य तोडून आपले उमेदवार निवडून आलेले आहेत. ही पण गोष्ट आपण लक्षात घ्या. मी एक नंबरने निवडून आलो. तर तुम्ही तुमच्या कामामधून वेळ काढा आणि बारामती का एवढे लीड भेटतंय, असं काय बारामतीत झाले आहे. राष्ट्रवादीचा कार्यकर्ता, अध्यक्ष आणि तिथली टीम तिथे कशा पद्धतीने काम करते हे समजून घ्या. सगळचं त्याच्यातले करता येईल, असा माझा दावा नाही. परंतु काही तरी गोष्टी तिथल्या शिकण्याचा आपण प्रयत्न करा. निवडणूक आल्यानंतरच जागे व्हायचे, असं नाही, तर जनतेशी सतत संपर्क ठेवायचा. संघटना मजबूत करायची. बूथनिहाय कमिट्या त्या ठिकाणी व्यवस्थित करायच्या आणि सोशल मिडियाचाही चांगला वापर करायचा.

सोशल मिडियाच्या त्यांच्या टीमनेही चांगले काम केले होते. काही गाणी तयार केली होती. सोशल मिडियाचे काम चांगले दिसत होते. जे मागे दिसत नव्हते. ते लोकांना पटेल अशा पद्धतीने काम झाले. ही पद्धत सगळ्यांनी बघितली. जे वेगवेगळे सेल आहेत, त्यांनी उत्तम पद्धतीने काम केले. पण, काहींनी इतकं समाधानकारक काम केलेले नाही. त्याही बद्दल थोडेसे वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची गरज आहे. आम्ही सगळे तुमच्या बरोबर आहे. विरोधी पक्षाची ताकद ही 110 ते 115 आमदारांची आहे. त्यामुळे काही कमी आमदार नाहीत. त्यामुळे तुमच्या भागातील जे जे प्रश्न असतील, ते वेगवेगळ्या आयुधांचा वापर करावा. लोकसभेमध्ये सुप्रिया, सुनील तटकरे, श्रीनिवास पाटील, अमोल कोल्हे हे चांगल्या पद्धतीने काम करत आहेत. ते लोकसभेमध्ये आपला आवाज उठविण्याचे काम निश्चितपणाने करतील, त्या बद्दल काळजी करू नका.

बरेच पराभूत आता, आम्हाला एमएलसी करा, अशी



# जुना हिशोब सेना चुकता करते आहे...




...पोरगं रडतंय, दिसत नाही का?

जय आपल्या मनासारखे चालत नसते आणि प्रत्येक गोष्ट आपल्या मनासारखी होत नसते, हे ध्यानी यायला लहानपणी मनाविरुद्ध निर्णय व्हावे लागतात. कदाचित देवेंद्रांचे लहानपणी घरात खूप लाड, कोड-कौतुक झाले असेल. मनाप्रमाणे प्रत्येक गोष्ट होत असेल. घरचेही मागेल ती गोष्ट आणून देत असतील. पण राजकारणात पुन्हा मलाच मुख्यमंत्री पद हवे, असा हट्ट धरून ते बसले, तर बाहेरचे लोक (शिवसेना) म्हणतील, आम्ही दरवेळी तुझा हट्ट पुरवायला थोडेच तुझे सालकरी गडी आहोत! मोठेपणी निर्णय जेव्हा मनाविरुद्ध जाऊ लागतात तेव्हा ते पचविणे नव्या पिढीला मग जड जाते. केवळ जडच जाते असे नव्हे, तर आत्मविश्वास गमाविण्याचा प्रसंग त्यांच्यावर येतो, हे देवेंद्र आणि त्यांचे निकटचे, अंतर्गत गोटातले सहकारी सध्या जे काही बोलताहेत त्यावरून आपल्या लक्षात येऊ शकेल.

''थोडा अन्याय व्हावा, ते बरे असते.'' या न्यायमूर्ती माधवराव रानडे यांच्या वाक्याचा अर्थ हा आहे. अन्याय झाला तर पाय जमिनीवर राहतात. पाय जमिनीवर राहणे याचा अर्थ विजयाने हुरळून न जाणे आणि पराभवाने होरपळून न जाणे. मागील पाच वर्षे सत्तेत असताना भाजपने शिवसेनेवर प्रचंड अन्याय केला. त्यांना लाचार कुत्र्यासारखे वागून मानहानीचे अपमानास्पद जिणे जगायला लावले. आता ते जुना हिशोब चुकता करीत असतील तर त्यात त्यांचे काय चुकते आहे असे कोणीही सुज्ञ माणूस म्हणणार नाही!

मागणी करतील. पण, लगेच काही कोणाला एमएलसी करता येणार नाही. त्याच्यामध्ये फार चांगल्या पद्धतीने विचार करून राज्याला त्याचा उपयोग होणार आहे का. हा विचार होईल. आणि उद्या फक्त दोन जागा येणार आहेत. त्यामुळे तुम्ही एमएलसीवर फार अवलंबून राहू नका. कारण, काहींना ती स्वप्न पडायला लागलेली आहेत. तुमच्या स्वप्नांचा चक्काचूर होईल. जसं अच्छे दिन आने वाले है चं स्वप्न पडलं आणि त्याचं वाटोळं झालं. तसं तुमचं होईल. म्हणून ते तुमच्या डोक्यातून काढून टाका. काम करत रहा. काम करत राहिल्यानंतर पक्ष तुमचा विचार करेन, तेही तुम्हाला न सांगता विचार करेन. उद्याच्या काळात ते घडणार आहे. जसं घडेल तसं ते तुमच्या लक्षात येईन. आणि मग तुम्हाला कळेल की, पक्षाला उभारी देणाऱ्याच्या मागे पक्ष उभा राहतो. हे आपल्याला पहायला मिळेल. आपला महाराष्ट्रात सर्वदूर कसा तडफेने पोचेल आणि त्याच्यातून कोणी किती गेले तरी साहेबांना मानणारा वर्ग महाराष्ट्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर आहे. यंदा तरुण वर्ग, तरुणांची ताकद, शक्ती आपल्याला एवढी प्रतिसाद देत होती, आम्ही फिरत असतानाही ते पाहत होतो. म्हणून हे सगळे घडत होते. जनरेशन गॅप वगैरे काही राहत नाही. आता जो शेतकरी अडचणीत सापडला आहे, त्याला बाहेर काढण्यासाठी आपण अंग झोकून काम करूयात.



जे उमेदवार विजय होऊ शकले नाहीत, त्यांच्यासाठी ही बैठक आहे. एक आहे की, आपण विजयी झालो नाही, म्हणजे पुन्हा कधी होणार नाही, असा काही भाग नाही. अनेक जणांनी पराभव पचवून यशाची शिखरे गाठली, त्याची उदाहरणे मी तुम्हाला द्यायलाच पाहिजे, असा काही भाग नाही. असे प्रसंग अनेकांवर येतात. आमच्यावर पण येतात. पण, त्यातून खचून जायचे नाही, ही पहिली गोष्ट. मला आनंद आहे की, आपल्यातल्या काही लोकांनी सांगितले की पराभवात ही आनंद आहे. हे पाहून मला आनंद झाला की, चला ठिक आहे की, काही तरी आनंद आहे. आपण पुन्हा एकदा लढायला तयार झालो आहोत. कोणी तरी सांगितले की, एकदम साठ- सत्तर हजार मतदार कशी वाढली. मला सांगायचे आहे की, त्याचा अभ्यास करा. एका मतदारसंघात असे झाले. होते. ती केस कोर्टात गेली आणि अडीच वर्षाने त्याचा निकाल लागला. आणि त्यांना विजयी घोषित करण्यात आले. हे उदाहरण आहे. तुम्ही जर कामाला लागले तर, हे खोटे मतदार कसे आहेत, दोन ठिकाणी नाव कसे काय आहे. याचा तुम्ही जरूर अभ्यास करा.

आता या निवडणुकीत अनेक हारजीत होते. त्याचे अनेक अर्थ आहेत. त्याच्यामुळे जो निवडून आला नाही, तो योग्य नाही, असा काही भाग नसतो. निवडणुकीमध्ये आपला संपर्क किती आहे. निवडणुकीमध्ये झुकाव कुठे आहे. समोरचे उमेदवार कोण आहेत आणि बूथनिहाय तयारी कशी आहे, असा सगळ्या अनेक गोष्टी त्या निवडणुकीसंदर्भात असतात. त्यातल्या एखाद्या गोष्टी जर कमतरता झाली, तर आपल्याला थांबावे लागते. म्हणून आपण या सगळ्या गोष्टींचा विचार करून लढायला उभे राहिले पाहिजे. आणि आपण ते आतापासूनच लढायला उभे राहिला आहात. त्याबद्दल खरोखरच आनंद वाटावा, अशी ही गोष्ट आहे.

खरं म्हणजे निवडणुकीध्ये एक झुकाव असतो. पण, आपल्याला कळालेच नाही की, आपली हवा आहे. किंबहुना लोकसभेच्या निवडणुकीनंतर अनेक जण एवढे हताश झाले होते की, आता काही शक्यच नाही. काही तिकडे गेले. आमचे मुख्यमंत्री तर नेहमी भाषणात बोलायचे, पवारसाहेबांची परिस्थिती अशी आहे की, आधे इथर जाव, आधे उधर और बाकीके पिछे आव. त्यांना तेवढे चांगले उत्तर व्हॅट्सअपवर दिले. मुख्यमंत्र्यांची परिस्थिती शोले पिक्चरसारखी झाली. शोले

**अमोल मिटकरी भाषण करताना**



# पवारसाहेबांना डोळ्यासमोर ठेवून पुन्हा कामाला लागा

## माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांचा कार्यकर्त्यांना संदेश

पिक्चरमध्ये गब्बरसिंग विचारतो, अरे वो सांबा कितने आदमी थे. सांबा बोलतो, सरदार एकही आदमी था. शरद पवार. एक पवारसाहेब आहेत की, त्यांनी ही निवडणूक अशी काही फिरवली की, कोणाला काही समजलेच नाही.

आता आमची गाडी आली. त्यावेळी एका गाडीत महिला बसलेल्या होत्या. महिलाच गाडी चालवत होती. पारशी होत्या. आमच्या बरोबरीने त्या गाडी चालवत होत्या. त्यामुळे सिक्युरिटीला शंका आली. त्याने त्यांना विचारले तर, अरे पवारसाहब. अरे पवारसाहेब म्हणत होत्या. आणि त्यांना पवारसाहेबांसोबत सेल्फी काढला. मला सांगायचा आहे की,


महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर भाषण करताना

मुंबईतही राष्ट्रवादीबद्दलचे प्रेम सर्वसामान्य लोकांच्या मनात प्रचंड आहे. महाराष्ट्रामध्ये तर ते आहेच आहे. म्हणून आपल्याकडे सर्वात महत्त्वाची जी गोष्ट असेल, तर ती पवारसाहेब. एवढं चांगलं नेतृत्व. अनुभवी नेतृत्व. कष्ट करणारे नेतृत्व आहे. आणि आपण सर्वांनी ते पाहिले आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत काम करणारे. हा आपल्यासमोर एक आदर्श आहे. पवारसाहेबांच्या जीवनातही चढउतार आले. आपल्या जीवनातही येतात. त्यावेळी जर आपण पवारसाहेबांचे उदाहरण डोळ्यासमोर ठेवले तर. त्यामुळे आजपासून तुम्ही कामाला लागा आणि पुढच्या प्रत्येक निवडणुकीत तुम्ही विजय निर्माण करू शकता. त्यासाठी आपण सर्वांनी तयार रहावे. कोणी नाराज झाले नाही. कोणी नाराज होऊ नये.


जीवन हे संग्राम, बंदे ले हिंमत से काम, जीवन हा एक संग्राम आहे. जीवनात चढउतार येत असतात. त्यावेळेला अतिशय हिमतीने तुम्ही काम घ्या. हीच हिंमत घेऊन, आशा घेऊन आणि साहेबांचे मार्गदर्शन घेऊन आपण येथून जाऊयात.

अतिवृष्टीमुळे आज राज्यातला संपूर्ण शेतकरी समाज उद्‌ध्वस्त होऊन संकटात सापडला आहे. हातातोंडाशी आलेली पिके पावसाने हिरावून घेतली आहेत. शेतकऱ्यांच्या घरात कोणताही मालच काय पण कडबा, चारा सुद्धा जाणार नाही, अशी परिस्थिती आहे. अशा वेळी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना जेवढी म्हणून मदत करणे शक्य असेल तेवढी कार्यकर्त्यांनी केली पाहिजे. शेतकऱ्याच्या नुकसानीच्या पिकांचा सरकारकडून पंचनामा होतो की नाही हे पाहून त्यांना मदत मिळवून दिली पाहिजे.



# जनतेचा भाजपला धोक्याचा इशारा

## HARYANA ELECTION RESULT




| | BJP | Cong | JJP | INLD | Others |
|---|---|---|---|---|---|
| Party | 40 | 31 | 10 | 1 | 8 |
| Loss/Gain | -7 | +16 | +10 | -18 | -1 |
| Voteshare | 36.5 | 28.1 | 14.8 | 2.5 | 18.1 |





**हरियाना आणि महाराष्ट्राच्या निवडणुकांसंबंधी भाजप नेतृत्वाचा आडाखा किती चुकीचा होता ते निकालांनी स्पष्ट केले. हरियानात महिला अत्याचार व त्यांची सुरक्षितता, बेकारी, कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न हे तर ज्वलंत प्रश्न होतेच पण हे मुख्यतः शेतीशी निगडित राज्य असल्याने शेतकऱ्यांचे प्रश्नही तेवढेच गंभीर होते. परंतु राष्ट्रवाद, देशभक्तीची धुंदी व दहशतवादाच्या नावाखाली एका विशिष्ट समाजाला बदनाम करण्याच्या भाजपच्या प्रचारमोहिमेला यश लाभू शकले नाही. ही प्रचारमोहिम सपशेल निष्प्रभ ठरली. किंबहुना महाराष्ट्रात देखील हाच प्रकार झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. थोडक्यात हरियानाच्या निकालांनी भाजपच्या एकंदरीतच निवडणूक व्यवस्थापनाच्या परिणामकारकतेबद्दल, प्रभावीपणाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण केले.**








महाराष्ट्र आणि हरियाना विधानसभा निवडणुकांची फलनिष्पत्ती म्हणजेच निकाल भाजपच्या जिव्हारी झोंबले आहेत. फाजील आत्मविश्वास या पक्षाला नडला असा सरसकट निष्कर्ष बहुतेकांनी काढला आहे. महाराष्ट्र व हरियानात सहज विजयाची अपेक्षा असलेल्या भाजप नेतृत्वाला म्हणजेच नरेंद्र मोदी-अमित शहा जोडगोळीला मतदारांनी जोरदार फटका दिला. हरियानात काय किंवा महाराष्ट्रात काय विरोधी पक्ष विखुरलेले, गलितगात्र झालेले, नीतीधैर्य पार गळालेले असल्याने आपला विजय आणि बहुमत पक्के असल्याचे गृहीत धरुनच भाजप नेतृत्व पूर्णपणे गाफील राहिले आणि मतदारांनी भाजपवर स्वार झालेली विजयाची नशा पार उतरवून टाकली.

महाराष्ट्रात दोनशेहून अधिक जागा मिळविण्याचे आणि हरियानात 90 पैकी 60 ते 65 किंवा सत्तर पर्यंत जागा मिळविण्याचे उद्दिष्ट भाजपने राखले होते. त्याला कारणेही होती. हरियानात यावेळी भाजप विरुध्द काँग्रेस असा जवळपास सरळ सामना होता. देवीलाल कुटुंबाचा 'इंडियन नॅशनल लोकदल' पक्ष फुटलेला होता. देवीलाल यांचे चिरंजीव ओमप्रकाश चौटाला यांनी दोन पुत्रांपैकी अभय चौटाला यांच्या बाजुने उभे राहण्याचे ठरविले. परिणामी दुसरे चिरंजीव अजय चौटाला व त्यांचे चिरंजीव म्हणजेच ओमप्रकाश यांचे नातू दुष्यंत चौटाला यांनी बंडखोरी केली. जननायक जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन करुन त्यांनी विधानसभा निवडणूक लढवली. केवळ त्यामुळेच आज भाजपला सरकार स्थापन करुन आपली राजकीय इभ्रत टिकविणे शक्य झाले.

हरियानात वैशिष्ट्यपूर्ण राजकीय परिस्थिती आहे. या राज्याच्या राजकारणावर जाट समाजाचे वर्चस्व मानले जाते. एकगठ्ठा 26 ते 27 टक्के मते या वर्गाची आहेत. त्यामुळे भजनलाल (बिश्नोई) यांचा अपवाद वगळता देवीलाल व बन्सीलाल या तालेवार जाट नेत्यांनी हरियानाच्या राजकारणावर वर्चस्व गाजवले. आज त्यांचेच वारसदार राजकारण पुढे चालवत आहेत. परंतु या एकगठ्ठा मतांच्या पलीकडेही बिगर जाट समूह आहेत. त्यामध्ये मुख्यतः अनुसूचित जातींचे समूह आहेत. बिश्नोई आहेत आणि ब्राह्मण व बनिया समाजही आहे. मनोहरलाल खट्टर हे याच बिगर-जाट समूहापैकी एका लहानशा समूहाचे प्रतिनिधित्व करतात. तसे ते हरियाणवी देखील नाहीत. फाळणीच्या वेळी काही पंजाबी कुटुंबेही हरियानात वसली त्यापैकी ते एक आहेत. दुकानदारीसारखे लहान व्यवसाय करणारा हा समूह आहे. त्यांना मुख्यमंत्री करण्याने जाट समाज कमालीचा नाराज होणे स्वाभाविक होते परंतु ताकदवान एकाधिकारशाहीकडे झुकलेले नेतृत्व असल्यास ते म्हणतील ती पूर्वदिशा असते आणि त्यांच्या लहरीप्रमाणे राजकारण चालविण्यात येते. जाट समाजाला एकप्रकारे दुखावून नरेंद्र मोदींनी मनोहरलाल खट्टर यांना त्यांच्यावर लादले. याठिकाणी महाराष्ट्र आणि झारखंड यांची उदाहरणेही विचारात घ्यावी लागतील. महाराष्ट्रातही नरेंद्र मोदी यांनी मराठा समाजाऐवजी बिगर मराठा समाजाकडे राज्याचे नेतृत्व सोपवले. झारखंड मध्येही त्यांनी ते राज्य आदिवासी असूनही बिगर आदिवासी व्यक्तीकडे राज्याची धुरा सोपवली. यामुळे बहुसंख्यक समाजात नाराजी व असंतोष निर्माण होणे स्वाभाविक होते. वर उल्लेख केल्याप्रमाणे केंद्रीय नेतृत्व एकाधिकारशाहीकडे झुकलेले असल्यास असे राजकीय प्रयोग केले जातात. इंदिरा गांधी यांनी असेच प्रकार केले होते आणि महाराष्ट्रापुरते उदाहरण द्यायचे झाल्यास अ.र.अंतुले यांचे देता येईल.पण असे राजकीय प्रयोग





मर्यादित काळात यशस्वी होतात आणि ते कालांतराने फसतात. हरियानात त्याची पुनरावृत्ती झाली असे म्हणावे लागेल.

भाजपने हरियानात मनोहरलाल खट्टर यांच्याकडे नेतृत्व कायम ठेवण्याचे जाहीर केले. त्यावरुनच त्यांच्या 'ओव्हरकॉन्फिडन्स' म्हणजेच फाजील आत्मविश्वासाची कल्पना सर्वांना आलेली होती. जाट समाजाचे प्रतिनिधित्व करणारा जो मुख्य 'फोर्स' होता – ओमप्रकाश चौटालांचा लोकदल हा पक्ष फुटलेला होता. काँग्रेस पक्ष गटबाजीने पोखरलेला होता. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावरच प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष अशोक तंवर यांनी बंड केले होते. प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षपदी फारशा प्रभावी नसलेल्या परंतु अनुसूचित जातीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कुमारी शैलजा यांना नेमण्यात आले होते. अशा स्थितीत निवडणुकीची जबाबदारी दोनवेळेस मुख्यमंत्री राहिलेल्या व जाट समाजाचे नेते असलेल्या भुपेंद्रसिंग हुड्डा यांच्याकडे सोपविण्याखेरीज काँग्रेसकडे पर्याय राहिलेला नव्हता. हुड्डा यांनाही भाजपने आर्थिक गैरव्यवहाराच्या अनेक प्रकरणात चावरं करुन सोडलेलंच आहे. त्यामुळे हुड्डा यांच्याकडे नेतृत्व सोपवून देखील काँग्रेस फारशी लढत देऊ शकणार नाही असा भाजपचा कयास होता. काँग्रेसमध्ये हुड्डा यांच्यासारख्या वादग्रस्त नेत्याकडे निवडणुकीची जबाबदारी द्यायची की नाही यावरुन द्विधा मनःस्थिती होती. परंतु सोनिया गांधी यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर काही निर्णय करण्यास सुरुवात केली. त्यात हुड्डा यांच्याकडे निवडणुकीची जबाबदारी सोपविण्याचा निर्णय समाविष्ट होता. आता हरियानाचे निकाल आल्यानंतर काँग्रेसमध्येच अशी चर्चा ऐकायला मिळते की हुड्डा यांची नेमणूक दोन महिने आधी केली असती तर कदाचित काँग्रेसला सरकारस्थापनेइतके बहुमत मिळवणे शक्य झाले असते.

अर्थात हे उशीराचे शहाणपण झाले. परंतु काँग्रेसने उशारीने का होईना हुड्डा यांच्याकडे नेतृत्व सोपवून जुगार खेळला व तो बऱ्यापैकी यशस्वी ठरला. शैलजा व हुड्डा या दोघातही भरपूर मतभेद आहेत परंतु निवडणुकीपुरते त्यांनी ते दूर ठेवले व एकत्रितपणे प्रचारही केला. त्यामुळे काही प्रमाणात बिगर-जाट मते मिळण्यासही मदत झाली.

हुड्डा यांच्या उशीराने नियुक्तीचा काही अंशी फायदा दुष्यंत चौटाला या नव्या नेत्याला मिळाला. जाट युवकांची तसेच देवीलाल कुटुंबियांच्या पाठीराख्यांनी त्यांना समर्थन दिले. ओमप्रकाश चौटाला व त्यांनी पाठिंबा दिलेले त्यांचे चिरंजीव अभय चौटाला व त्यांच्या कुटुंबियांना देवीलाल पाठीराख्यांनी नाकारले हे चित्र या निवडणुकीच्या निमित्ताने स्पष्ट झाले. लोकसभा निवडणुकीच्या वेळी स्थापन झालेल्या दुष्यंत चौटाला यांच्या पक्षाला मतदारांनी आपली पसंती दिली आणि त्यांना त्यांच्या पहिल्याच विधानसभा निवडणुकीत दहा जागांवर विजयी केले. त्यामुळेच काँग्रेसला विजयाने हुलकावणी दिली. अन्यथा हरियानात भाजपचा पराभव निश्चित होता असे अनुमान काढल्यास ते चुकीचे ठरणार नाही. जाट समाजाने यावेळी भाजपला दगा दिला. जाट समाजाची नाराजी भाजपला भोवली असेच म्हणावे लागेल. जाट समाजाच्या नाराजीची तीव्रता किती होती याचे उदाहरणच द्यायचे झाल्यास भाजपचे जाट नेते व राज्याचे अर्थमंत्री कॅप्टन अभिमन्यू यांना देखील निवडणुकीत पराभूत व्हावे लागले. अर्थात या पराभवापासूनही भाजपचे नेतृत्व काही शिकले आहे असे दिसत नाही. मात्र जाट समाजाला चुचकारण्यासाठी त्यांनी कोणताही वेळ न गमावता दुष्यंत चौटाला यांना उपमुख्यमंत्रीपद देऊन आणि तिहार तुरुंगात असलेले त्यांचे वडिल अजय चौटाला यांना जामीनावर सोडून








दिले. सत्तेच्या खेळात दुष्यंत चौटाला नवे आहेत. परंतु त्यांच्या नुकत्याच जन्माला घातलेल्या राजकीय पक्षाला सत्तेचे टॉनिक मिळाल्यास तो टिकणार आहे आणि जमले तर वाढणार आहे. त्यामुळे त्यांना भाजपकडून देऊ गेलेले उपमुख्यमंत्रीपद हा मोठाच बोनस आहे.

हरियानात भाजपला चाळीस जागांवर समाधान मानावे लागले. तेथे त्यांना स्वबळाचे बहुमत मिळू शकले नाही. हरियानात बहुमतासाठी 45 हा जादुई आकडा आहे. दुष्यंत चौटाला यांच्या पक्षाला दहा जागा मिळाल्या आहेत. काँग्रेसने जोरदार मुसंडी मारून 31 जागा मिळविल्या आहे. ओमप्रकाश चौटाला यांच्या पक्षाला म्हणजेच मूळ लोकदल पक्षाला केवळ एकच जागा मिळाली. अपक्ष आठजण आहेत. हरियानात तत्काळ पावले उचलून भाजपने सरकार स्थापन केले व इभ्रत वाचवली. हरियानात सरकारस्थापनेबाबत भाजपने चपळाई दाखवली. पक्षाध्यक्ष अमित शहा यांनी दिवाळी सोडून हरियानातील सरकारस्थापनेला प्राधान्य दिले आणि सरकार स्थापन झाल्यानंतरच सुटकेचा निःश्वास सोडला.

भाजपसाठी हा धोक्याचा इशारा आहे. हरियानात भाजपने दोन-तीन मुद्यांवर जोर दिलेला होता. मनोहरलाल खट्टर यांची स्वच्छ प्रतिमा आणि मोदी व शहा यांची देशभक्ति व राष्ट्रवादाला चुचकारणारी व्याख्याने यावर भाजपच्या प्रचाराची मदार होती. भारतीय सेनादलांमध्ये हरियानातील लोकांचे प्रमाण उल्लेखनीय आहे. सेनादले आणि खेळ(क्रीडाक्षेत्र) या दोन क्षेत्रात हरियानाची मंडळी लक्षणीय प्रमाणात आहेत. त्यामुळेच भाजपने विविध आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धात पदके मिळविणाऱ्या सुप्रसिध्द खेळाडूंना देखील या निवडणुकीत तिकिटे दिली होती. विजयासाठी तसूभरही जोखीम पत्करायची नाही यासाठी भाजपने ही सर्व जय्यत तयारी केली होती. मोदींनी त्यांच्या भाषणात सुरक्षा, राष्ट्रवाद, देशभक्ति, दहशतवादामुळे जवानांना कसे हौतात्म्य पत्करावे लागते वगैरे सर्व मालमसाला प्रचारासाठी वापरला होता. एवढेच नव्हे तर मतदानाच्या आदल्या दिवशी सेनाप्रमुख जनरल बिपिन रावत यांनी पाकव्याप्त काश्मीरमध्ये भारतीय सैन्याने व विशेषतः तोफदलाने केलेल्या हल्ल्याची माहिती जाहीर केली. देशभक्तीने भारलेले मतदार आता भाजपला भरभरुन मतदान करणार याबद्दल भाजप नेतृत्वाला शंका राहिली नव्हती.

भाजप नेतृत्वाचा हा आडाखा किती चुकीचा होता ते निकालांनी स्पष्ट केले. हरियानात महिला अत्याचार व त्यांची सुरक्षितता, बेकारी, कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न हे तर ज्वलंत



प्रश्न होतेच पण हे मुख्यतः शेतीशी निगडित राज्य असल्याने शेतकऱ्यांचे प्रश्नही तेवढेच गंभीर होते. परंतु राष्ट्रवाद, देशभक्तीची धुंदी व दहशतवादाच्या नावाखाली एका विशिष्ट समाजाला बदनाम करण्याच्या भाजपच्या प्रचारमोहिमेला यश लाभू शकले नाही. ही प्रचारमोहिम सपशेल निष्प्रभ ठरली. किंबहुना महाराष्ट्रात देखील हाच प्रकार झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. थोडक्यात हरियानाच्या निकालांनी भाजपच्या एकंदरीतच निवडणूक व्यवस्थापनाच्या परिणामकारकतेबद्दल, प्रभावीपणाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण केले.

भाजपचा आणखी एक आडाखा चुकला. महाराष्ट्र व समाधान मानून त्या आधारेच झारखंडमध्ये निवडणुकीला सामोरे जावे लागणार आहे.

झारखंडमध्येही भाजपची स्थिती यावेळी फारशी चांगली नसल्याच्या बातम्या आहेत. त्यामुळेच त्यांनी झारखंड निवडणुकीवर पूर्ण लक्ष देण्यासाठी ती वेगळी घेतली. पण आता मात्र भाजप नेतृत्वाला सावधानतेनेच निवडणूक लढवावीलागेल.

महाराष्ट्र व हरियाना येथील निवडणुकांचे एक वैशिष्ट्य मात्र ध्यानात घ्यावे लागेल. विशेषतः सत्तामदाने धुंद भाजपला यापासून धडा घ्यावा लागणार आहे. ‘विरोधी पक्ष मुक्त’ राजकारणाची पिपासा भाजपनेतृत्वात ठासून भरलेली आढळते.



हरियानात आपली सरकारे येणारच आहेत या भ्रमात ते राहिले. परंतु हरियानात बहुमत चुकले. महाराष्ट्रात जागा कमी झाल्या. मुख्य म्हणजे गलितगात्र विरोधी पक्षांना चारी मुंड्या चीत करणे ही आता औपचारिकता राहिली असल्याच्या भावनेत भाजप नेतृत्व दंग राहिले. त्या आधारावर झारखंडमधील विधानसभा निवडणूक घ्यायची आणि तेथेही आपला झेंडा पुन्हा रोवायचा अशी त्यांची योजना होती. त्यामुळे एकीकडे एकत्रित निवडणुकीचा मंत्र जपण्याचे नाटक व ढोंग भाजपनेतृत्व करीत असतानाच दुसरीकडे मात्र ते राज्यांच्या निवडणुका वेगवेगळ्या घेऊन राजकीय स्वार्थ साधू पहात होते. परंतु मतदारांना त्यांना टोला देऊन जागेवर आणले. आता महाराष्ट्र व हरियानातील निसटत्या विजयांवर

विरोधी पक्षांना कोणतीतरी जुनीपानी प्रकरणे उकरुन त्यांच्या मागे ईडी व सीबीआयचा ससेमिरा लावून देणे आणि सतत दुसऱ्यांची निंदानालस्ती करुन स्वतःची टिमकी बडविण्याचे प्रकार भाजपनेतृत्वाने भरपूर केले. त्याला काही प्रमाणात यशही मिळाले. पण येथील जनता व मतदार एवढे बुद्दू नाहीत. विरोधी पक्ष कितीही गळाठलेले, भाजपच्या धमक्यांना घाबरलेले असले, गलितगात्र झालेले असले तरी येथील मतदारांनी त्यांना ताकद दिलेली आहे. त्यांना उभे केलेले आहे आणि सांगितले आहे की या मदांध सत्तेशी लढा! आता विरोधी पक्षांनी त्यांचे लढण्याचे कर्तव्य पार पाडून येथील लोकशाही जिवंत ठेवायची आहे. ते आव्हान विरोधी पक्षांनी प्रत्यक्षात आणायचे आहे!



# पावसानं मारलं, पुरानं धुतलं वादळानं झोडलं, सरकारनं सोडलं आता शेतकऱ्यानं कुणाकडं बघायचं?

डॉ. सुधीर भोंगळे



जून महिन्यात सारेजण हात जोडून पावसाला विनंती करीत होते अरे बाबा आता लवकर बरस. किती आमची परीक्षा पाहतोस? अखेरीस जुलैच्या शेवटी त्याला पाझर फुटला. त्याने कोसळायला जी सुरुवात केली ते आता थांबायचे नावच घेत नाही. आता पाचवा महिना चालू आहे. तो रोज नियमित हजेरी लावतो आहे. लोकांनी येऊ नको म्हटले तरी तो काही आल्याशिवाय आणि बरसण्याचा त्याचा हट्ट पुरा केल्याशिवाय थांबत नाही. त्याला हाकलून देणे लोकांच्या हातात नाही. या पाहुण्याने सगळ्यांची पुरती वाट लावलीयं. शेतातली होती नव्हती ती सगळी पिकं मातीसकट धुवून नेली आहेत. शेतकऱ्यांचं अगणित नुकसान झालंय. सरकारच्या हेक्टरी 25 हजार रुपये मदतीनं ते थोडंच भरुन येणार आहे? कुठलंही नैसर्गिक संकट आलं की त्याचा पहिला फटका शेतकऱ्याच्याच भाळी बसतो. क्षणार्धात होत्याचं नव्हतं होतं. हातातोंडाशी आलेला घास निसर्ग क्रूर होऊन असा का ओढून नेतो? याचं उत्तर आजपर्यंत तरी कधी कुणाला मिळालेलं नाही. मिळेल असं वाटतही नाही. दुःख शेतकऱ्याच्या पाचवीलाच पूजलेलं आहे. दरवर्षी ते निरनिराळी रुपं घेऊन येते. यावर्षी त्याने अतिवृष्टीचं रुप धारण केलं आहे.  या रुपाचा अवतार येथे शब्दांची रंगभूषा करुन मांडला आहे.

भारतीय हवामान वेधशाळेकडे गेल्या १५०-२०० वर्षांची जी पावसाची आकडेवारी उपलब्ध आहे त्यावरून आजपर्यंत असे अनुमान आणि ठोकताळा मांडण्यात आला होता की, ७ जूनला महाराष्ट्रात मोसमी पाऊस सुरू होतो आणि तो १५ ऑक्टोबरपर्यंत चालतो. जून ते सप्टेंबर या काळात जवळपास ८५ टक्के पाऊस पडतो तो नैऋत्य मोसमी वाऱ्यांमुळे. सप्टेंबर ते डिसेंबर या काळात जो १० टक्के पाऊस पडतो तो ईशान्य मोसमी वाऱ्यांमुळे आणि उर्वरीत ५ टक्के पाऊस जो डिसेंबर नंतर किंवा बऱ्याचदा उन्हाळ्यातील एप्रिल-मे मध्ये पडतो त्याला 'अवकाळी' पाऊस असे आपण म्हणतो. यंदा पावसाचे हे चक्र पूर्णपणे बदललेले आपण




पाहतो आहोत. नेहमीचा नियमित येणारा मान्सूनचा (मोसमी) पाऊस १६ ऑक्टोबरलाच संपला आहे आणि तरी देखील ७ नोव्हेंबर उजाडला तरी अजूनही पाऊस चालूच आहे. याला 'पोस्ट मान्सून' असे म्हणतात. हा पाऊस जो लांबलेला आहे, त्याला मुख्यत्वे अरबी समुद्रात निर्माण झालेली 'क्यार' आणि 'माहा' ही चक्रीवादळे आणि कमी दाबाचा तयार झालेला पट्टा कारणीभूत आहे असे सांगितले जाते. गेल्या २० वर्षांपेक्षा जास्त कालावधीतील मान्सून अभ्यासावरून त्याचा पॅटर्न बदलला आहे. वाऱ्याने दिशा, वेग, वेळ आणि स्थान बदलला म्हणजे 'पॅटर्न बदललेला मान्सून' यंदा भारीच खट्याळ झाल्याचे आपण साऱ्यांनीच अनुभवले आहे.

अंदाज होता ९६ टक्के सरासरी पावसाचा. प्रत्यक्षात देशात पडला ११० टक्के पाऊस. एकटया महाराष्ट्रात सरासरीच्या १३२टक्के पाऊस झाला. १५ नोव्हेंबरपर्यंतचा पाऊस मॉन्सूनचा म्हणून मोजल्यास हा आकडा कितीतरी वाढेल. १०२ वर्षांपूर्वी १९१७ मध्ये भारतात सरासरीच्या ११८ टक्के पाऊस झाला होता. यंदा १९९४ नंतरचा सर्वाधिक पाऊस आहे. यंदा देशभरातील जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यांत अनुक्रमे ०, १०५, ११५ आणि १५२ टक्के पाऊस झाला. राज्यात ३२ टक्के पाऊस अतिरिक्त पडला आहे. राज्यात यंदा गेल्या ३० वर्षांतील सर्वाधिक पाऊस आहे. महाराष्ट्रात १९०१ पासून आतापर्यंतच्या ११९ वर्षात चौथ्या क्रमांकाचा पाऊस आहे. मराठवाड्यात एकूण पावसाचे दिवस ३४ आहेत, याचाच अर्थ या ३४ दिवसांत पडणारे पावसाचे पाणी मराठवाड्याला ३६५ दिवस जपून वापरावे लागते.

भारतात संततधार पाऊस पडण्याचे दिवस कमी होत अचानक कमी वेळात जास्त पाऊस वाढतो आहे. सध्या खट्याळ 'मॉन्सून'चा प्रवास हा उशिरापर्यंत म्हणजे उशिरा आगमन, उशिरा परतीचा प्रवास असा होत आहे. साधारण १५ जुलैला आगमन झाल्यानंतर चार







महिन्यांच्या प्रवासानंतर १५ नोव्हेंबरपर्यंत जलधारा बरसण्याचे काम मॉन्सून करेल असे वाटले होते. पण तो परत जायचे अजून नावच घेत नाही.



गेल्या दोनशेहून अधिक वर्षापासून हवामान खात्याने मॉन्सूनला १ जून ते ३० सप्टेंबर या कालखंडात बरसणारा तो मॉन्सून अशी व्याख्या करीत बांधून टाकले आहे. नेहमी ढोबळमानाने एक सप्टेंबरला नैऋत्य मोसमी वाऱ्याच्या परतीचा प्रवास सुरू होतो व ३० सप्टेंबरला म्हणजे साधारणपणे ३० दिवसांनी पूर्ण होतो. यंदा नैऋत्य मोसमी वाऱ्याचा परतीचा नऊ ऑक्टोबरला प्रवास सुरू झाला आणि १६ ऑक्टोबरला म्हणजे सात दिवसांत संपला, असे जाहीर केले गेले. सात दिवसांत घडलेला हा परतीचा प्रवास नेहमीपेक्षा पाचपट गतीने होत नैऋत्य मॉन्सून परतला, असे जाहीर

झाले. तसे घडलेले नाही. मॉन्सूनचे वारे वाहण्याची दिशा कायम असली तरी ती काहीशी पूर्वेकडे सरकली आहे. समुद्राकडून जमिनीवर येणारे व जमिनीवरून समुद्राकडे वाहणाऱ्या वाऱ्यांची दररोज वेळ व दिशा मुंबईसारख्या ठिकाणी देखील बदलती आहे. बंगालच्या उपसागरात खालच्या बाजूसही चक्रीवादळे निर्माण होऊ लागली आहेत. अरबी समुद्रात देखील कमी दाबाचे पट्टे आणि चक्रीवादळ याची संख्या यंदा वेगाने वाढली आहे.

मॉन्सूनची खरी सुरवात मे-जूनऐवजी थेट जुलैमध्ये होताना दिसते आहे. ऑगस्टमध्येच खऱ्या अर्थाने तो सक्रीय होताना दिसतो. ऑक्टोबरमध्येही आणि कधीकधी तर डिसेंबर-जानेवारीमध्येदेखील पाऊस होत आहे. याचे कारण मॉन्सूनचा परतीचा प्रवास लांबला आहे. भारतच नव्हे तर नेपाळ, भूतान, बांगला देश तसेच पाकिस्तान या ठिकाणीही मॉन्सून पावसाचे प्रमाण बदललेले आहे. मॉन्सूनमधील बदल हा सौरवादळे व वाढलेली वैश्विक किरणे याचा परिणाम आहे. धन आयानची वातावरणात वाढलेली संख्या अचानक वातावरणात बदल घडवून आणते आहे. ग्लोबल वार्मिंग, ग्लोबल कुलिंग किंवा क्लायमेट चेंज नावाच्या जगभर भीती पसरविणाऱ्या 'प्रपोगंडा'शी याचा काहीएक संबंध नाही, असे मत किरणकुमार जोहरे या हवामान अभ्यासकाने व्यक्त केले आहे.

नैऋत्य मोसमी वारे परतताना परिस्थिती पाहून शेतकरी खरिपाच्या पिकाच्या काढणीला लागतो. मॉन्सून परतला ही हवामान खात्याने दिलेली वर्दी ऐकून यावेळी उत्तर व पश्चिम महाराष्ट्र, तसेच मराठवाड्यातील शेतकरी निश्चिंत झाला; पण पाऊस पडतच राहिला आणि द्राक्षे, कांदा, भाजीपाला, सोयाबीन, कपाशी, मका, भात, भुईमूग, बाजरी, ऊस आदी अनेक पिकांना याचा फटका बसला. मॉन्सूनच्या पॅटर्नमध्ये बदल होत असल्याने शेतीच्या पद्धतीत म्हणजे पीक पद्धतीत बदल करणे आवश्यक आहे. गेल्या १० वर्षात नेपाळसारख्या देशातील शेतकऱ्याने आपल्या पिकांचा कालावधी व पेरणीची वेळ लांबविली आहे. मरगळ झटकून काम केल्यास मॉन्सूनचा वेध घेणे नक्कीच शक्य आहे!

अवेळी आलेला हा पाऊस हा जागतिक तापमान वाढीचा परिणाम आहे (ग्लोबल वॉर्मिंग) असे काही लोक म्हणतात. अत्यंत कमी वेळेत प्रचंड वेगाने जोरदार वर्षा सरी कोसळून पुरासारखी परिस्थिती निर्माण होणे, एकदम दाट धुके पडणे, मोठ्या प्रमाणात दव पडणे, कितीही पाऊस झाला तरी उकाडा कमी न होणे, पाऊसमान व थंडी लांबणे ही सगळी या ग्लोबल वॉर्मिंगची लक्षणे आहेत असे निरनिराळ्या तज्ज्ञांकडून सांगितले जाते. कारणे काहीही असली तरी लांबलेल्या व सतत मोठ्या प्रमाणावर कोसळत असलेल्या या पावसामुळे राज्यात ओल्या दुष्काळाचे चित्र निर्माण झाले आहे.



या वर्षीच्या पावसाळ्याचे आणखीन एक वैषिष्ट्य म्हणजे जवळपास दोन महिने उशीराने पाऊस सुरू झाला आणि दोन पावसांमध्ये पडणारा खंड हा प्रत्येक विभागात निरनिराळा होता. तो खंड एक महिन्यापासून अडीच महिन्यापर्यंत होता. साधारणपणे ३० दिवसांचा खंड पडला तर केवळ पावसावर अवलंबून असलेली हलक्या







माळरानावरची मूग, मटकी, उडीद, ज्वारी, बाजरी सारखी पिके फार काळ तग धरू शकत नाहीत. ती सुकून किंवा जळून जातात. तसे याही वेळी घडले होते. ज्यांच्याकडे थोडे संरक्षित पाणी देण्याची व्यवस्था होती व ठिबक, तुषार, सबसरफेस, मल्चिंग यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अगदी थोड्या पाण्यावर का होईना ज्यांनी आपली पिके जगविली होती त्यांना या अतिवृष्टीच्या पावसाचा जबरदस्त तडाखा बसला आहे. काढणीला आलेली म्हणजे शेतकऱ्याच्या हातातोंडाशी आलेली भात, सोयाबीन, भुईमूग, कांदा, कापूस, वरई, नाचणी, ज्वारी, बाजरी, सर्व प्रकारचा भाजीपाला व पालेभाज्या आणि द्राक्ष, डाळिंब, अंजिर, कलिंगड, खरबूज, सिताफळ, केळी यांसारख्या फळबागा व झेंडू, मोगरा, शेवंती, गुलाब, ग्लॅडीओली यांसारख्या फुलशेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. हे नुकसान सरकारच्या हेक्टरी २५ हजार रु. दिले आणि कितीही पंचनामे केले तरी कधीही भरून न येणारे आहे. एखाद्या वर्षी शेतकऱ्याला कोणत्या का कारणाने होईना नुकसानीचा फटका बसला की तो ३ ते ५ वर्षे मागे जातो. विश्वासाने व पूर्ण ताकदीने त्याला पुन्हा उभे राहायला किमान पाच वर्षांचा कालावधी लागतो. या नुकसानीच्या काळात व पुन्हा धीर धरून उभे राहण्यासाठी सरकारने निश्चित ध्येयधोरण आखून, सढळ हाताने भरीव व भरघोस मदत करणे अपेक्षित असते. परंतु तसे घडताना दिसत नाही. केंद्र व राज्यातील भाजप सरकारला तशी सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांबद्दल फारशी आस्था व प्रेम नाही. शेतकऱ्यांपेक्षा मध्यमवर्गीय शहरी पांढरपेशा वर्गाचे हितसंबंध जपण्याला भाजपने कायमच महत्त्व व पाठिंबा देऊन त्यादृष्टीने व त्या दिशेने सर्व धोरणांची आखणी व अंमलबजावणी ते मागील पाच वर्षांत करीत आले आहेत. म्हणजे एक प्रकारे शेतकरी वर्ग सरकारने वाऱ्यावर सोडून दिला आणि मतांसाठी शहरी वर्गाचे हितसंबंध जोपासले. त्यांना स्वस्तात व कमी दरात कसा माल मिळेल आणि शेतकऱ्याला मालाची चांगली व रास्त किंमत कशी मिळणार नाही याच पद्धतीने व तोच हेतू निश्चित मनाशी बाळगून सरकार त्या पद्धतीने काम करीत आले आहे. त्यामुळे या ओल्या दुष्काळात तरी सरकार काही भरीव मदत करेल अशी आशा शेतकऱ्यांना वाटत नाही. केंद्र सरकार तर कायम महाराष्ट्राच्या विरोधातच असल्या सारखे वागत आले



आहे. मागील दुष्काळाच्या काळातही व संपूर्ण कर्जमाफीसाठी मोदी सरकारने महाराष्ट्राला काहीही फारशी भरीव मदत दिली नाही. अल्पशी मदत करून महाराष्ट्राच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम मोदी सरकारने केले आहे. महाराष्ट्राकडून मते मात्र भाजप-शिवसेना युतीचे निवडणुकीत भरभरून घेतली. सत्ता मिळविली. त्याच्या आधारावर प्रचंड संपत्ती गोळा केली. पण शेतकऱ्याच्या व मतदाराच्या पदरात मात्र या युती सरकारने काहीच टाकले नाही. त्यामुळे निराश, नाराज व संतप्त झालेल्या जनतेने २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप-शिवसेनेच्या विजयी जागांची संख्या कमी करून त्यांना राज्यकारभार नीट करा नाहीतर पुढच्या वेळेला घरीच घालवू, अशी निर्वाणीचा इशारा दिला आहे.

## पावसाने केलेले नुकसान

जुलैच्या शेवटाला व ऑगस्ट महिन्याच्या मध्यापर्यंत यंदा भाताच्या लागणी चालू होत्या. ऑगस्ट संपूर्ण महिना पावसाचा होता. सप्टेंबरमध्ये थोडी उघडीप चार-आठ दिवसांची मिळाली होती. पण कमी-अधिक प्रमाणात पाऊस सुरूच होता. कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, नाशिक यांसारख्या जिल्ह्यात ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यातच अतिवृष्टी होऊन मोठ-मोठे पूर आले होते. या पुराने ऊस, सोयाबीन, भुईमूग, भाजीपाला, भात या पिकांचे खूप मोठे नुकसान केले होते. त्यावेळच्या पूर व अतिवृष्टीतून जी पिके वाचली होती व जो भात निसवला होता किंवा ज्या सोयाबीन, भुईमुगाचे दाणे पक्व होऊन तो काढायला आला होता तो या ऑक्टोबर मधल्या पावसाने कुजून गेला व त्याला कोंब फुटले. अशीच अवस्था ज्वारी, बाजरीची देखील झाली. ज्वारी पावसाने काळी पडली. कणसावरच्या दाण्यालाच पावसाने कोंब फुटला. बाजरीचीही अवस्था यापेक्षा वेगळी नव्हती. ज्या शेतकऱ्यांनी ज्वारी, बाजरी काढून व कापून शेतात ठेवली होती त्यांची कणसे पाण्याने भिजून त्यांना कोंब फुटले आणि कडबा जागेवरच सडून गेला. हा कडबा पुढच्या वर्षभर साठवून जनावरांना चारा म्हणून शेतकरी वापरतात. तोच कडबा कुजल्यामुळे आता जनावरांना घालायला शेतकऱ्यांकडे वैरण नाही. कोथिंबीर, मेथी, शापू, पालक, चुका, मुळा, कांदापात, तांदूळचा, आंबट चुका, लाल माठ, देठ यांसारखा पालेभाज्या आणि टोमॅटो, वांगी, फ्लॉवर, कोबी, वाटाणा, ढोबळी मिरची, हिरवी मिरची, कोहळा, दूधी व लाल भोपळा, काकडी, कारली, दोडके, श्रावण घेवडा, वालवर, पावटा, तोंडली, डबल बी, काळे वाल, करटुले, भेंडी, गवार या व यांसारख्या भाजीपाला सडून नष्ट झाला आहे. शेतात पाणी साचून राहिल्यामुळे पिकांची मुळे कुजून गेली. त्यांना वाफसा स्थिती नसल्याने अन्नग्रहण करता आले नाही. पिकांवर रोगराई तर प्रचंड वाढली. कोणत्याही औषध फवारणीचा काडीचाही उपयोग झाला नाही. पावसाने सगळी औषधे धुऊन जात असल्याने कीडींचा बंदोबस्तच झाला नाही. केळीसारख्या पिकांवरही मर व सीएमव्ही सारखे रोग आले. अती पाण्याने ऊस व केळीची पाने पिवळी पडली. भाताच्या लोंब्या



पाण्यात बुडल्याने त्यांनाही कोंब फुटले. वादळ वाऱ्याने उंच वाढलेली पिके आडवी झाली. भाताने जमिनीवर लोळण घेतली. केळीच्या फणीत व दोन केळांच्या मध्ये पावसाचे पाणी घुसल्याने बुरशीजन्य रोग वाढले. औषध फवारणीचाही उपयोग होईना.

काही द्राक्ष बागायतदारांनी ऑगस्ट पासूनच द्राक्षाची छाटणी सुरू केली होती. त्यांना डिसेंबरात रमजानसाठी व निर्यातीकरिता द्राक्ष बाजारात आणायची होती. काहींनी सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये छाटणी करून नेहमीचा बहार धरला होता. द्राक्षाच्या घडात चांगले मणी लागले होते. पावसाने हे मणी कुजले. खराब झाले. कितीतरी ठिकाणी घड, मणी गळून पडले. द्राक्ष बागांचे अगणित नुकसान झाले. काही शेतकऱ्यांनी तर आता वर्षभर बाग सांभाळायलाच नको म्हणून ती उपटून टाकायला सुरुवात केली आहे. मोठा भांडवली खर्च या बागा उभ्या करण्यासाठी येतो. लागवडीनंतर तीन वर्षांनी द्राक्ष बागेचे उत्पादन सुरू होते. एवढा काळ उत्पन्न नसल्यामुळे खिशातूनच कर्ज काढून शेतकऱ्याला खर्च करावा लागतो. आता हे कर्ज कसे व कोठून फेडायचे असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे आ वासून उभा आहे.

कपाशी उत्पादकांची तर इतकी वाईट अवस्था आहे की, शेतात उंच वाढलेली, सुंदर दृष्ट लागावे असे कपाशीचे हिरवेगार पीक उभे आहे. त्याला काही ठिकाणी पिवळी छान फुले लागलेली दिसतात.पण कपाशीला बोंडे आणि कापूस नाही. जी बोंडे लागली होती ती अती पावसाने गळून व सडून गेली. जो कापूस थोडा लागला होता तो पावसाने भिजून खराब झाला. शेतकऱ्याच्या पदरात काहीच पडले नाही. मराठवाडा, विदर्भ, खानदेश या सगळ्या भागात कापूस उत्पादक शेतकऱ्यांची मोठी दयनीय अवस्था झाली आहे. कुणाच्याही घरात कापसाचे एक बोंड देखील जाऊ शकले नाही. ५५५० रुपये कपाशीचा क्विंटलचा भाव आहे. भिजलेला कापूस म्हणून ४५०० रुपये दराने खरेदी करण्यास व्यापारीही तयार आहे. परंतु शेतकऱ्याकडे कापूस नाही, फक्त शेतात हिरवेगार वांझोटे पीक उभे आहे. त्याच्याकडे किती दिवस नुसते पाहात राहायचे हाच आता प्रश्न आहे?

## अरबी समुद्रात असामान्य स्थिती

मान्सून हंगाम संपून दिवाळीपर्यंत सुरु असणारा पाऊस आणि अरबी समुद्रात पाठोपाठ दोन चक्रीवादळांच्या निर्मितीमागे पश्चिम हिंदी महासागर आणि अरबी समुद्रातील असामान्य स्थिती कारणीभूत असल्याचे निरीक्षण हवामान शास्त्रज्ञांनी नोंदवले आहे. पश्चिम हिंदी महासागर आणि अरबी समुद्राचे तापमान गेले काहीं महिने सातत्याने सरासरीच्या वर नोंदले जात आहे. हिंदी महासागरातील तापमानाची तफावत दर्शवणाऱ्या 'इंडियन ओशन डायपोल'च्या पॉझिटिव्ह स्थितीमुळे (आयओडी) यंदा मान्सूनही सरासरीच्या वर नोंदला गेल्याचे हवामानशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

ऐन दिवाळीच्या काळात अरबी समुद्रात तयार झालेल्या 'क्यार' या चक्रीवादळापाठोपाठ दक्षिण-पूर्व अरबी समुद्रात 'माहा' चक्रीवादळ आकाराला आले. या आधी मान्सून हंगामात

राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!




'वायू' आणि 'हिका' ही दोन चक्रीवादळे अरबी समुद्रातच तयार झाली होती. या उलट बंगालच्या उपसागरात यंदा 'फणी हे एकच चक्रीवादळ तयार झाले. हवामानशास्त्रीय नोंदींनुसार ही स्थिती असामान्य मानली जात आहे. उत्तर हिंदी महासागरात दर वर्षी सरासरी पाच चक्रीवादळे तयार होतात. त्यांपैकी चार चक्रीवादळे बंगालच्या उपसागरात, तर एक चक्रीवादळ अरबी समुद्रात तयार होते. यंदा ही स्थिती नेमकी उलट असल्याचे दिसून येत आहे.

याबाबत 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटिओरीलॉजी'मधील (आयआयटीएम) वरिष्ठ शास्त्रज्ञांनी असे मत व्यक्त केले की, 'यंदा मान्सून हंगामाच्या मध्यापासून हिंदी महासागराच्या पश्चिम भागाचे आणि अरबी समुद्राचे तापमान सरासरीपेक्षा जास्त नोंदले जात आहे. हिंदी महासागरात विषुववृत्ताच्या दक्षिणेकडील भागापासून ते अरबी समुद्राच्या उत्तरभागापर्यंत त्याचा प्रभाव आहे. अरबी समुद्रात यंदा स्थानिक पातळीवर बाष्पाची निर्मिती मोठ्या प्रमाणात होत आहे. मान्सून हंगामात अरबी समुद्रात सातत्याने तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रांमुळे पश्चिम किनारपट्टी आणि घाट परिसरात सरासरीपेक्षा बराच जास्त पाऊस नोंदला गेला.'

'बंगालच्या उपसागराच्या तुलनेत यंदा अरबी समुद्राचे तापमान जास्त असल्यामुळे मान्सून आणि मान्सूनोत्तर काळात महाराष्ट्रासह दक्षिण भारतात सातत्याने पाऊस होत आहे. अरबी समुद्रात चक्रीवादळाची निर्मिती होऊन ते महाचक्रीवादळाच्या तीव्रतेपर्यंत पोहोचणे ही असामान्यबाब आहे. अरबी समुद्र आणि हिंदी महासागराच्या पश्चिम भागाचे तापमान इतक्या मोठ्या कालावधीसाठी सरासरीच्या वर का नोंदले जात आहे. याचा शोध घेण्याचा प्रयत्न जगभरातील हवामानशास्त्रज्ञ करीत आहेत,' असेही वरिष्ठ शास्त्रज्ञांनी नमूद केले.



# अंदाज खरा ठरला



अरबी समुद्रात व बंगालच्या उपसागरातही कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्यामुळे राज्यात हा पाऊस पडला. सुरुवातीला वादळी वारे वाहून पावसाला सुरूवात झाली. दीड-दोन तास मोठमोठ्या वेगाने सरी आल्या आणि नंतर त्यांचा जोर थोडा ओसरला. दिवाळीत पावसाच्या हलक्या सरी पडल्या आणि दिवाळीनंतर १० नोव्हेंबरपर्यंत महाराष्ट्राच्या कुठल्या न् कुठल्या भागात अतिवृष्टी होऊन नद्यांना पूर येत राहिले. त्याबाबत हवामानशास्त्र विभागातील वरिष्ठ हवामानशास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी यांनी व्यक्त केलेला अंदाज प्रत्यक्षात उतरला.

## दोन्ही समुद्रात तीव्र कमी दाबाची क्षेत्रे

नैऋत्य मान्सून देशातून परतल्याचे भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) जाहीर केले असले, तरी सध्या महाराष्ट्रासह दक्षिण भारतात जुलै-ऑगस्ट या पावसाच्या महिन्यांसारखा सर्वदूर पाऊस होत आहे. अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात एकाच वेळी अस्तित्वात असणाऱ्या कमी दाबाच्या क्षेत्रांमुळे मान्सूनोत्तर काळातही मान्सूनसारखा पाऊस होत असल्याचे हवामानतज्ज्ञांचे म्हणणे आहे.

मान्सून देशभरातून माघारी फिरण्याची सर्वसाधारण तारीख १५ ऑक्टोबर आहे. यंदा त्यापेक्षा एक दिवस उशिरा म्हणजे १६ तारखेला नैऋत्य मान्सून माघारी फिरून दक्षिणेकडील राज्यात ईशान्य मान्सूनला सुरुवात झाल्याचे 'आयएमडी'ने जाहीर केले. मात्र, मान्सून माघारी फिरूनही यंदा पाऊस थांबलेला नाही. 'आयएमडी'ने दिलेल्या माहितीनुसार, 'पूर्व- मध्य अरबी समुद्र आणि पश्चिम- मध्य अरबी समुद्र आणि पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरातही तीव्र कमी दाबाचे क्षेत्र असून, त्याची तीव्रता डिप्रेशनपर्यंत (अती तीव्र कमी दाबाचे क्षेत्र) वाढण्याची शक्यता आहे. अरबी समुद्रातील 'डिप्रेशन' २५ तारखेपर्यंत कर्नाटक-महाराष्ट्र किनारपट्टीच्या दिशेने सरकून त्यानंतर विरुद्ध दिशेला पश्चिमेकडे सरकण्याची शक्यता होती, तर बंगालच्या उपसागरातील 'डिप्रेशन' २४-२५ तारखेला आंध्र प्रदेश किनारपट्टीच्या दिशेने सरकले. मान्सूनोत्तर काळात बंगालच्या उपसागरात तीव्र कमी दाबाची क्षेत्रे आणि चक्रीवादळे तयार होण्याचा हंगाम असतो. मात्र, अरबी समुद्रात या काळात कमी दाबाची क्षेत्रे तयार होणे ही दुर्मिळ बाब असल्याचे हवामानतज्ज्ञांचे म्हणणे आहे. अरबी समुद्रातील कमी दाबाचे क्षेत्र बराच काळ एका जागी राहून त्याची तीव्रता वाढत असल्यामुळे सध्या पश्चिम



किनारपट्टी आणि महाराष्ट्रात सर्वदूर पाऊस सुरू आहे. अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्रांचा प्रभाव पुढील चार ते पाच दिवस राहण्याची शक्यता असून, त्यानंतरच राज्यातील हवामान कोरडे होण्यास सुरुवात होईल, असे 'आयएमडी'च्या मॉडेलवरून दिसून येत आहे.

## मराठवाड्याच्या सरासरीच्या 337 टक्के अधिक पाऊस

यंदा मराठवाड्यात दुष्काळ पडतो की काय अशी स्थिती असताना ऑक्टोबर महिन्यात पावसाने मराठवाड्याला धुवून काढले. अवघ्या एकाच महिन्यामध्ये सरासरीच्या तुलनेत तब्बल 337.85 टक्के पाऊस बरसला आहे. या कालावधीमध्ये औरंगाबाद, जालना आणि परभणी जिल्ह्यामध्ये सर्वाधिक पाऊस झाल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

ऑक्टोबर महिन्यामध्ये अपेक्षित पावसाच्या तुलनेत यामध्ये औरंगाबाद, जालना, परभणी आणि नांदेड जिल्ह्यांमध्ये वार्षिक सरासरीच्या तुलनेत अधिकचा पाऊस झाला आहे. 31 ऑक्टोबरपर्यंत औरंगाबाद जिल्ह्यात वार्षिक सरासरीच्या तुलनेत 116.94, जालना जिल्ह्यात 110.61, परभणी 102.94, हिंगोली 80.86, नांदेड105.77, बीड 95.35, लातूर 90.28 आणि उस्मानाबाद जिल्ह्यात अपेक्षित सरासरीच्या तुलनेत 92.82 टक्के पाऊस झाला आहे.

## मराठवाड्यात 30 लाख हेक्टरला फटका

मराठवाड्यातील आठ हजार 514 गावांपैकी आठ हजार 450 गावांना पावसाचा फटका बसला असून, यामध्ये मका, बाजरीचे सुमारे 90 टक्के, सोयाबीनचे 80 टक्के, कापसाचे 50 ते 70 टक्के नुकसान झाले आहे. कापसाच्या दोन काढण्या वाया जाण्याचा अंदाज आहे. त्यामुळे येणाऱ्या काढण्यांमध्ये कापूस



सर्वाधिक 466.95 टक्के पाऊस जालना जिल्ह्यात तर त्यापाठोपाठ बीड जिल्ह्यात 428.94 टक्के, परभणी जिल्ह्यात 419.26 टक्के तर औरंगाबाद जिल्ह्यातही 406.67 टक्के असा मोठा पाऊस झाला. एकाच महिन्यात झालेल्या या मोठ्या पावसामुळे काढणीसाठी आलेल्या संपूर्ण पीकांचे मोठे नुकसान झाले. मराठवाड्यात 12 लाख 28 हजार हेक्टरवरील सोयाबीन, 11 लाख 44 हजार हेक्टरवरील कापूस तर 5 लाख 84 हजार पेरणी क्षेत्रावरील इतर पीकांचे मोठे नुकसान झाले आहे.

## पावसाचे अकाउंट क्लोज

जून ते ऑक्टोबर या कालावधीत मराठवाड्यात सरासरी 779 मिलिमिटर पाऊस अपेक्षित आहे. यंदा या तुलनेत 770.33 मिलिमिटर (98.89 टक्के) पाऊस झाला आहे.

**मराठवाड्यातील पिकांचे नुकसान (प्राथमिक अंदाज)** (क्षेत्र हे.)

| जिल्हा | बाधित गावे | शेतकरी संख्या | बाधित क्षेत्र |
|---|---|---|---|
| औरंगाबाद | १३५५ | ४६२४८२ | ४०८२७६ |
| जालना | ९७२ | ५१०६५८ | ४३३०८९ |
| परभणी | ८४३ | ३३८७६२ | ३२९०३२ |
| हिंगोली | ७०७ | १९४१७३ | २२३५५१ |
| नांदेड | १४८८ | ५४३५६३ | ४११४१४ |
| बीड | १४०२ | ५६७००० | ५९५५०० |
| लातूर | ९५१ | १८३६६२ | ३३७०६३ |
| उस्मानाबाद | ७३७ | २२५४६२ | २१९६७५ |
| एकूण | ८४५० | ४३०१४३६ | २९५७६०० |

पिकांचे उत्पादन घटण्याची शक्यता आहे. मराठवाड्याच्या आठही जिल्ह्यांमध्ये पिकांचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले असून, सध्या अंदाजे 65 ते 70 टक्के पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. येत्या काही दिवसांमध्ये पाऊस झाला तर, नुकसानीमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.

मराठवाड्यात ऑक्टोबर महिन्यात सरासरीच्या 337.85 टक्के पाऊस जास्त झाला. अचानक पावसाच्या जोरदार सरी पडल्यामुळे कापणीनंतरच्या पिकावर जागच्या जागी मोड येऊ लागले. यात सोयाबीन, बाजरी आणि मका या पिकांचे 70 टक्क्यांहून अधिक नुकसान झाले आहे. कापसाच्या बोंडात पाणी शिरल्यामुळे सरकीला पुन्हा कोंब आले. मराठवाड्यातील 48 लाख हेक्टरपैकी 30 लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असल्याचा प्राथमिक अंदाज असून तातडीने चार दिवसांच्या





आत सरसकट पंचनामे केले जावेत असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. केवळ पंचनामे करुन न थांबता पीक विमा कंपन्यांना झालेल्या नुकसानीची आकडेवारी जिल्हाधिकाऱ्यांनी द्यावी असे निर्देशही विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांनी दिले आहेत.

लातूर, बीड, हिंगोली, नांदेड, परभणी या जिल्ह्यांमध्ये अधिक नुकसान असून औरंगाबाद जिल्ह्यात मका आणि बाजरीचे पीक हातचे गेले आहेत. खरीप हातचा गेल्याने दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्याला नव्या संकटाला सामोरे जावे लागणार आहे. कापणीसाठी काढलेले पीक खळ्यापर्यंत गेले नाही. जागच्या जागीच पिकांना मोड आले. यात सोयाबीनचे सर्वाधिक नुकसान आहे. प्राथमिक अंदाजानुसार 30 लाख 25 हजार 762 शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असल्याची आकडेवारी आहे.

तलाठी आणि महसूल मंडळातील अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष पाहणी करुन पंचनामे करण्यास सांगितले असून शक्य असतील तेथील नुकसानीचे छायाचित्रही पाठवावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. साडेआठ हजार गावांमध्ये सर्वत्र नुकसान झाले असल्याचे समोर येत असून सोयाबीन, कापसाचे नुकसान सर्वाधिक आहे. 12 लाख 28 हजार 940 हेक्टरवरील सोयाबीन, तर 11 लाख 44 हजार 529 हेक्टरवरील कापूस पिकाचे नुकसान आहे. कापसाच्या दोन वेचण्या पूर्णतः हातच्या गेल्या असून थोडाफार





कापूस तिसऱ्या वेचणीच्या वेळी हाती लागेल, अशी स्थिती निर्माण होऊ शकते. मात्र अशा पद्धतीचा पाऊस झाल्यानंतर कापसावर लाल्या रोग येतो.

मराठवाड्यात ऑक्टोबर महिन्यात सरासरी 54.30 मिमि. पाऊस अपेक्षित होता. त्यापेक्षा 337 टक्के पाऊस अधिक झाला असल्याने नुकसान अधिक आहे. असे प्रशासन आणि मंत्रीही मान्य करत आहेत. 90 टक्के पिकांचे नुकसान आहे.

## उत्तर महाराष्ट्रात उरली सुरली पिकेही नष्ट

नाशिकसह उत्तर महाराष्ट्रात परतीच्या पावसाचे झोडपणे सुरुच आहे. लाखो हेक्टरवरील पिकांना त्याचा फटका बसला असून दिवसागणिक त्यात भर पडत असल्याने शेतकरी हबकला आहे. रात्रभर पाऊस कायम राहिल्याने नद्या, नाले दुथडी भरुन वाहात आहेत. द्राक्षासह अन्य पिकेही पाण्याखाली बुडाली आहेत. पांझण-रामगुळणा नदीला पूर आला तर मनमाड परिसरात नदीकाठालगतच्या अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने संसारोपयोगी साहित्य वाहून गेले आहे. दीड हजार नागरिकांचे स्थलांतर करावे लागले असून नांदगावमध्येही अनेक भागात पाणी शिरल्याने नागरिकांना रात्र जागून काढावी लागली.



सततच्या पावसाने एकट्या नाशिकमध्ये सव्वा तीन लाख हेक्टरहून अधिक पिकांचे नुकसान झाले होते. धुळे, जळगाव आणि नंदुरबारमध्येही यापेक्षा वेगळी स्थिती नाही. शुक्रवारी रात्री पुन्हा पावसाने जोर धरला. सलग आठ ते दहा तास तो कोसळत होता.

पावसाने मागील तीन दशकांचा विक्रम मोडीत काढला. या तडाख्यातून मका, द्राक्ष, सोयाबीन, उशिराचा खरीप कांदा, भाजीपाला असे कोणतेही पीक बचावले नाही. परतीच्या पावसाचा सटाणा, मालेगाव, नांदगाव, निफाड, येवला, चांदवड,

सिन्नर, देवळा, नाशिक आदी भागास सर्वाधिक फटका बसला.

प्राथमिक अंदाजानुसार नाशिकमध्ये 1614 गावांतील चार लाख 52 हजार 931 शेतकऱ्यांचे नुकसान झाले. ही आकडेवारी आणखी वाढणार आहे. द्राक्ष बागांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. विविध टप्प्यातील बागा डाऊणी, फुलधारणा अवस्थेत कुजणे, द्राक्षमण्यांना तडे जाणे वा घड गळून पडणे आदींना तोंड देत आहेत. पावसाने बहुतांश शेती अक्षरशः धुऊन काढली आहे.





**नाशिक जिल्ह्यातील ऑक्टोबरमधील पाऊस (आकडे मि.मी.)**

| जिल्हा | पाऊस | जिल्हा | पाऊस |
|---|---|---|---|
| नाशिक | २२२ | कळवण | २२२ |
| इगतपुरी | १५६ | बागलान | २८५ |
| दिंडोली | १८१ | देवळा | ३२२ |
| मालेगाव | १६९ | निफाड | ४०३ |
| नांदगाव | ३२१ | सिन्नर | २०४ |
| चांदवड | २०६ | येवला | २७२ |





हरीतगृहांचेही प्रचंड नुकसान झाले आहे.

पावसामुळे जळगावमधील हतनूर, गिरणा, वाघूर हे तीनही मोठे प्रकल्प 100 टक्के भरले आहेत. त्यामध्ये 36.17 टीएमसी जलसाठा झाला आहे.

## द्राक्षावर करपा, डाऊनी रोगांचा प्रादुर्भाव

परतीच्या मोसमी पावसाने राज्यात अनेक ठिकाणी द्राक्षावर करपा, डाऊनी या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या



प्रमाणात झाला असून या रोगापासून द्राक्ष पीक वाचविण्यासाठी दिवसातून दोन वेळा औषध फवारणी करावी लागत आहे. सलग पाऊस पडत असल्याने द्राक्ष मण्यांची गळही सुरु झाल्याचे नवेच संकट उभे ठाकले आहे. जिल्ह्यात तासगावबरोबरच मिरज, खानापूर, कवठेमहांकाळ, पलूस, जत तालुक्यात द्राक्षाची लागवड झाली असून परतीचा मोसमी पाऊस सुरु होण्यापूर्वीच बहुसंख्य द्राक्ष बागांच्या फळछाटण्याची कामे आटोपली आहे. 'ऑक्टोबर हिट' चा लाभ उठविण्याबरोबरच बाजारातील तेजीचा लाभ उठविण्यासाठी प्रामुख्याने सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस छाटण्यांची कामे आटोपली गेली आहेत.

छाटणी झालेल्या द्राक्ष्यांचे घड सध्या कळी म्हणजेच दोडावस्थेत आणि फुलोऱ्याच्या स्थितीत असलेल्या बागा सतत पडत असलेल्या पावसाने अडचणीत आल्या असून बुरशीजन्य रोगाबरोबरच गळीचाही सामना करावा लागत आहे. कळीच्या स्थितीमध्ये करपा आणि फुलोऱ्याच्या अवस्थेत प्रामुख्याने डाऊनी म्हणजेच पावडरी मेल्डीओ याला बळी पडत आहेत. करप्याने कोवळी फूट, कोवळे घड करपून जातात, तर डाऊनीच्या प्रार्दुभावाने फुलोऱ्यातील घड तत्काळ कुजू लागतात.

डाऊनीची लागण एखाद्या पानावर पांढऱ्या ठिपक्याने दिसून येते. बागेत एखाद्या झाडावरील पानावर हा रोग आला की तीन ते चार तासात एक एकर बागेत पसरतो आणि एका रात्रीत कोवळ्या द्राक्ष घडाच्या मुळाशी जाऊन हल्ला करीत असल्याने 24 तासात बाग हातची जाऊ शकते. यामुळे द्राक्ष बागायतदार हा रोग येणारच नाही याची दक्षता घेत असतात. या रोगापासून द्राक्षाचा बचाव करण्यासाठी स्पर्शजन्य आणि आंतरप्रवाही अशा दोन प्रकारच्या औषधांचा मारा करावा लागत आहे. रात्रीच्या धुक्यामुळे सकाळच्यावेळी दव बिंदू पानावर असताना एम-45, झेड078, कुमानएल, कॅपटॉप, ऍन्ट्रॉकल यासारख्या स्पर्शजन्य औषधांचा वापर करण्यात येत आहे. याच्या जोडीला पोटॅशियम सॉल्ट ऑफ फॉस्फेटचे मिश्रण वापरण्यात येत आहे. तर दुपारच्या वेळी कर्जंट, ऍक्रोब्रेट, मेलेडियओ, झॅप्रो सारखी आंतरप्रवाही औषधे वापरण्यात येत आहेत. सुडो पावडर, बॅसिलेस, मिलॅस्टिन सारख्या जीवाणूंचाही वापर करण्यात येत आहे.

बुरशीजन्य रोगांचा अटकाव रोखण्यासाठी दर वर्षी चार दिवसातून एकवेळ फवारणी करावी लागत होती. या वर्षी सलग पावसामुळे दररोज फवारणी करावी लागत असून एक एकर द्राक्ष बागेसाठी एकावेळी तीन ते साडेतीन लिटर औषधांची फवारणी करावी लागत आहे. द्राक्षबागांच्या गोड्याबार छाटण्या अंतिम टप्प्यात आहेत. मात्र पावसाचे पाणी साचल्याने द्राक्षबागांच्या ओलांड्यावर मूळ फुटत आहे. शिवाय निघालेल्या द्राक्षमाल जिरत असून काही घडांचा आकार गोल गोळीसारखा होऊन गळून पडत आहे. सर्वाधिक प्रमाणात पोंगा तसेच फुलोरा अवस्थेतील द्राक्षबागांचे नुकसान झाले आहे.

## कोकणात भातपिक भिजले, लोंबीला आले कोंब

यावर्षी पावसाने कोकणात प्रचंड थैमान घातले. सरासरीच्या एक ते दीड हजार मिलिमीटर पाऊस जास्त झाल्याचे आकडे आहेत. अतिवृष्टीने अनेक ठिकाणी भातपिकांचे मोठ्या

प्रमाणात नुकसान झाले. कोकणात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. एकट्या रत्नागिरी जिल्ह्यात 72 हजार हेक्टर क्षेत्रात भातपीक काढले जाते. त्यापैकी 15 हजार हेक्टर क्षेत्रातील तयार भातपीक सडले असून शेतकऱ्यांची मोठी हानी झाली आहे. त्याचबरोबर नाचणी व वरी या पिकांनाही फटका बसला असून शेतात धान्य शिल्लक राहिले नसल्याने हलाखीची स्थिती निर्माण झाली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील परिस्थिती तर यापेक्षा भयावह असून तेथील एकूण भातपिकाचे क्षेत्र 58 हजार हेक्टर असून त्यापैकी 35 हजार

**नुकसानीची आकडेवारी (प्राथमिक अंदाज)**

| विभाग | बाधित तालुके | बाधित क्षेत्रफळ (हे.) |
|---|---|---|
| कोकण | ४६ | ९७ हजार |
| नाशिक | ५२ | १६ लाख |
| पुणे | ५१ | १.३६ लाख |
| औरंगाबाद | ७२ | २२ लाख |
| अमरावती | ५६ | १२ लाख |
| नागपूर | ४८ | ४० हजार |






हेक्टर क्षेत्रातील भातपिक सडले-कुजले आहे. तळकोकणातील काही तालुक्यांमध्येही अशीच स्थिती आहे. या पार्श्वभूमीवर कोकणातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ओला दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित करावी अशी मागणी सुरु झाली आहे. मात्र 50 टक्के पेक्षा अधिक नुकसानीचा आकडा जाणार नसल्याने ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या संदर्भातील निकषामध्ये शिथिलता आणून निव्वळ शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, यासाठी तशी पावले उचलली जावी अशी आर्त हाक तळकोकणातील शेतकऱ्यांनी मारली आहे.

सप्टेंबर महिन्यात जवळपास सर्वच भातपिके काढणीसाठी तयार असतात. मात्र ऑक्टोबरपर्यंत कोकणात जोरदार पाऊस कोसळला. अतिवृष्टीने अनेक ठिकाणी भातपिकांचे काही प्रमाणात नुकसान झाले होते, तरी पहिल्या टप्प्यातील 110 दिवसाचे भातपीक व निम गिरवे 110 ते 134 दिवसांचे भातपीक अर्धेअधिक कापून त्याच्या पेंड्या शेतालगतच रचून ठेवल्या

होत्या. त्यानंतर तिसऱ्या टप्प्यातील मोठी लागवड होणारे 135 दिवसानंतरचे भातपीक चांगले आलेले असताना अचानक आलेल्या क्यार वादळ व तुफानी पावसाने शेतकऱ्यांचे तोंडचे पाणी पळवले. उभी भातपिके आडवी झाली. तर सुकायला ठेवलेले भातपिक भिजले. त्यामुळे भाताच्या लोंबीला कोंभ आला. कोंभ आलेला भात गवताच्या पेंढीवर आल्याने उबेमुळे उर्वरित भात काळा ठिक्कर पडला. तर दसऱ्यापूर्वीच्या अतिवृष्टीमुळे भातपिकावर आधी लष्करी अळीचा फैलाव झाला, त्यापाठोपाठ अवकाळी पाऊस सलग आठवडाभर प्रचंड प्रमाणात पडल्याने शेतमळ्यांना नदीचे स्वरुप येऊन भातपीक तरंगू लागले व पाण्यातच राहिल्याने ते सडले. पिकात दाणा शिल्लक राहिला नाही. फक्त काळा कोंडा (फोपड) शिल्लक राहील अशी अवस्था झाली. परिणामी यंदा कोकणात भातपिकाचं उत्पादनच 50 ते 70 टक्क्यांनी कमी होऊन मार्केटवर त्याचा मोठा परिणाम होणार आहे.

या वर्षी अवकाळी वादळी पाऊस 500 ते 1000 मि.ली. वाढल्याने तो नाशा पाऊस झाल्याचे रत्नागिरी जवळच्या करबुडेगावातील शेतकरी संजय आग्रे यांनी सांगितले. त्यांच्या पाच चुलत भावांची प्रत्येकी पाच एकर अशी शेती आहे. सुरुवातीला अतिवृष्टीमुळे पडलेल्या लष्करी अळीमुळे झालेल्या नुकसानी पाठोपाठ अवकाळी पावसाने आणखी विध्वंस केला. लोंबीला दाणा नाही. पेंढा काळा व कुजलेला, जनावरांना सुद्धा खाता येणार नाही. शेतात केरसुणीने भात जमा करायची वेळ आल्याची व्यथा त्यांनी बोलून दाखवली. जे काळेठिक्कर भातपीक मिळेल त्याला कोंभ आला असला तरी ते घरात काही दिवस वापरता येईल, मात्र हा उत्पादित भात बाजारात जाणार नसल्याने मोठी आर्थिक हानी झाल्याची व्यथा बहुतांश शेतकरी व्यक्त करत आहेत. पाच एकरात दरवर्षी किमान 5 खंडी भातपीक काढणाऱ्या शेतकऱ्यांना यंदा 15 मण भात मिळणंही कठीण झालंय.

कोकणातील दोन्ही जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतात नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी महसूल यंत्रणा जुंपण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन शेतमालकाच्या उपस्थितीत फोटो काढून पंचनाम्याची यादी करण्यात येत आहे. हे पंचनामे स्थानिक तलाठी, ग्रामसेवक व कृषिसेवक गाव वाटून घेत युद्ध पातळीवर करत आहेत. सातबाऱ्याप्रमाणे समक्ष होणारा नुकसानीचा हा पंचनामा शेतकऱ्यांना सध्या दिलासा देत असला तरी आर्थिक मदत पुरेशी मिळेल काय याकडे त्यांचे लक्ष लागले आहे. किंबहुना तो बिथरलेला व घाबरलेला सुद्धा आहे. कारण कोकणातील शेती ही काही प्रमाणात एकरी तर अनेक ठिकाणी गुंठेवारी अशी पारंपारिक पद्धतीने करण्यात येते. तसेच कोकणात



# आता फेरविचार अनिवार्य

**जलसंपदा सचिव राजेंद्र पवार यांचे मत**


भातपीक काढणारा एक व त्याचा जमीनमालक दुसराच असतो. तेव्हा कसणारा शेतकरी या आर्थिक नुकसान भरपाई मिळण्यास पात्र होईल का, हा मोठा प्रश्न उभा राहणार आहे. कारण शासनाची कोणतीही आर्थिक मदत शेतीच्या सातबाऱ्यावर नावे असलेल्या मालकांना थेट बँकेद्वारे मिळते.

## हजारो हेक्टर भातशेतीचे नुकसान

लांबलेला पाऊस आणि चक्रीवादळाच्या प्रभावामुळे कोकणच्या रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांमध्ये मिळून हजारो हेक्टर भातशेतीचे नुकसान झाले असून तिन्ही जिल्ह्यांमध्ये कृषी खात्याकडून पंचनाम्यांचे काम सुरु झाले आहे. प्रत्येक जिल्ह्यात सुमारे पंचवीस ते तीस टक्के नुकसान झाले असावे, असा प्राथमिक अंदाज आहे. मात्र सर्व पंचनामे पूर्ण होऊन तांत्रिक अडचणी आणि राज्य सरकारच्या पातळीवरील निर्णयकी अवस्थेमुळे बाधित शेतकऱ्यांना सर्व प्रकारची सरकारी प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्षात भरपाई कधी मिळेल, याबाबत कमालीची अनिश्चितता आहे.

**अलिबाग** : परतीच्या पावसामुळे रायगड जिल्ह्यात भातशेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. जिल्ह्यातील 27 टक्के भातपिक नष्ट झाले आहे. जिल्ह्यात सरासरी 1 लाख 23 हजार हेक्टर क्षेत्रावर भाताची लागवड करण्यात येते. यंदा 95 हजार हेक्टरवर ही लागवड झाली होती. ऑगस्टच्या अखेरच्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीत त्यापैकी सुमारे 16 हजार 395 हेक्टर क्षेत्रावरील भातशेतीचे नुकसान झाले होते. या नुकसानीचे पंचनामे करण्यात आले आहेत. ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस झालेल्या अतिवृष्टीनंतर वाचलेले पीक चांगले होते. परंतु ऑक्टोबर महिन्यात झालेल्या परतीच्या पावसात तेसुद्धा हातचे गेले. परतीच्या पावसामुळे जिल्ह्यात अंदाजे 10 हजार हेक्टर क्षेत्रावर कापलेल्या पिकाचे नुकसान झाले आहे. या दोन्ही नैसर्गिक फटक्यांमुळे मिळून रायगड जिल्ह्यातील सुमारे 27 टक्के भातशेतीचे नुकसान झाले आहे. भात पिक नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम कृषी विभागाने सुरु केले आहे.

**रत्नागिरी** : क्यार वादळाच्या प्रभावामुळे पडलेल्या मुसळधार पावसाने रत्नागिरी जिल्ह्यातील गरवी, निमगिरवी भातशेतीचे नुकसान झाले आहे. ग्रामसेवक, तलाठी आणि कृषी सहाय्यकांमार्फत पंचनामे सुरु असून प्रत्यक्ष शेतीचे क्षेत्र आणि अपुरे संख्याबळ यामुळे शासकीय आदेशानुकास अपेक्षित पंचनामे पूर्ण होणे अशक्य आहे. मात्र गेल्या दोन दिवसांत जिल्ह्यातील एकूण 3 हजार 600 हेक्टरवरील बाधित शेतीचे पंचनामे करण्यात प्रशासन यशस्वी ठरले आहे. कृषी विभागाकडून मिळालेल्या



कृष्णा आणि भीमा खोऱ्यातील बहुतांश धरणे अतिवृष्टीमुळे ऑगस्ट महिन्यातच पूर्ण भरलेली होती. अपवाद होता तो कुकडी नदी खोऱ्यातील काही प्रकल्पांचा. आजही (6 नोव्हें. 2019) माणिकडोह धरण 15 टक्के रिकामे आहे. 15 टीएमसी क्षमतेचे हे धरण सहजासहजी भरत नाही. त्यावरुन दरवर्षी या धरणाची जागा चुकली का? अशी चर्चा होते. डिंबे धरण मात्र पूर्ण भरुन त्यातून 14 टीएमसी आणि वडज, येडगावमधून 1 टीएमसी असे 15 टीएमसी अतिरीक्त पाणी कुकडी प्रकल्पातून वाहून गेले आहे. उजनी सोडून कृष्णा-भीमेच्या खोऱ्यात 27 मोठी धरणे आहेत. 25 जुलै ते 15 ऑगस्ट या काळात सांगली, सातारा व कोल्हापूर या जिल्ह्याती जी अतिवृष्टी झाली त्यातून जवळपास 350 टीएमसीहून अधिक पाणी महाराष्ट्राच्या सीमेवरुन वाहून कर्नाटकात गेले. कोयना धरणातूनही सुमारे 50 टीएमसी पाणी वाहून गेले. चेरापूंजीपेक्षा जास्त पाऊस यावेळेला आंबोली (10057 मि.मी.) व महाबळेश्वरला (8500 मि.मी) झाला. नाशिक व त्या परिसरात अतिवृष्टी झाल्यामुळे जायकवाडी धरण पूर्ण भरुन त्यातून पाणी सोडावे लागले. मराठवाड्यात परतीचा पाऊस ऑक्टोबरमध्ये खूपच झाला. अतिवृष्टी झाली. धरणे पूर्ण भरल्याने त्यातून पाणी सोडावे लागले. नद्या, नाले, ओढे यांना पूर आल्यामुळे ही पिकांचे खूप नुकसान झाले. बऱ्याच वर्षांनंतर गिरणा धरण भरले. हतनूरमधून तर 3-4 वेळा पाणी सोडावे लागले. विदर्भाच्या अमरावती विभागातील धरणे मात्र अजूनही पूर्ण भरलेली नाहीत. धरणांच्या पाणलोट क्षेत्रात जेवढा पाऊस पडला त्यापेक्षा जास्त पाऊस धरणांच्या खालच्या भागातही पडला आहे. खालच्या पावसाची सरासरी 300 मि.मी. ची असताना तिथे झालेला पाऊस 600 मि.मी. आहे. सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्यामुळे अनेक ठिकाणी पूर आले, असे सांगून राज्याच्या जलसंपदा विभागाचे सचिव राजेंद्र पवार म्हणाले की, बदललेले पाऊसमान व त्या पावसाची पडण्याची तीव्रता लक्षात घेता आता पीक पद्धतीपासून धरणे भरुन ठेवण्याच्या वेळापत्रकापर्यंत सर्वच गोष्टींचा गांभीर्याने फेरविचार करावा लागणार आहे. त्या कामाला जलसंपदा विभागाने प्रारंभ केला आहे. लोकांशीही याबाबत चर्चा सुरु आहे.

माहितीनुसार जिल्ह्यात 79 हजार हेक्टरवर भातशेती लागवड झाली त्यातील हळवी बियाणे (सुमारे 90 दिवस) 15 हजार हेक्टर निमगिरवी (सुमारे 120 दिवस) आणि उर्वरित गरवी बियाण्यांचे (सुमारे 150 दिवस) क्षेत्र 25 हजार हेक्टर आहे. ऑक्टोबरच्या अखेरीस पडलेल्या पावसाने गरवी आणि निमगरवी या दोन्ही प्रकारच्या पिकांची वाताहात केली आहे. सर्वाधिक फटका नदी किंवा खाडी किनारी भागात बसला, तसेच पाणी साचून राहणाऱ्या शेतांचे जास्त नुकसान झाले आहे. या पावसामुळे बाधित सर्वाधिक क्षेत्र संगमेश्वर, राजापूर आणि चिपळून या तालुक्यांमध्ये आहे. तसेच मंडणगड आणि दापोलीतही शेतीचे बऱ्यापैकी नुकसान झाले आहे. दरम्यान पावसाच्या भितीने शेतकऱ्यांनी कापून सुरक्षित ठिकाणी हलवलेल्या भाताचा नियमानुसार पंचनाम्यामध्ये समावेश करण्यात आलेला नाही. ही या नुकसानभरपाई प्रक्रियेतील मोठी त्रुटी राहणार असून त्याबाबत शासनाला विशेष बाब म्हणून धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे. अन्यथा अनेक शेतकरी नुकसान होऊनही लाभापासून वंचित राहणार आहेत.

**सिंधुदुर्ग :** अरबी समुद्रात निर्माण झालेल्या क्यार वादळामुळे कोकणातील शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. वादळाच्या प्रभावामुळे झालेल्या मुसळधार पावसाचा भातपिकाला मोठा तडाखा बसला आहे. सिंधुदुर्गमध्ये हजारो एकरांवरील भातपीक नष्ट झाले आहे. कोकणात यंदा तब्बल 133 टक्के पाऊस पडला. सिंधुदुर्गाचा विचार करता जिल्ह्यात सुमारे 54 हजार हेक्टर क्षेत्र सध्या भात लागवडीखाली आहे. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात जिल्ह्यात झालेल्या पूरस्थितीमुळे एक हजार 933 शेतकऱ्यांना याचा फटका बसला होता. 7 हजार 398 हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले होते. यातच क्यारच्या प्रभावामुळे उरलीसुरली भातशेतीही उद्ध्वस्त जाली. परतीच्या पावसाला वादळाची साथ मिळाल्याने कोकणात आठ ते दहा दिवस भातशेती पाण्याखाली राहिली. परिणामी सर्व पीक कुजले. अनेक ठिकाणी जमिनीवर पडलेल्या भाताला कोंब आले दाणे नाहीच, पण गवत मिळणेसुद्धा कठीण बनले आहे. क्यारच्या प्रभावामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 667 गावांतील 62 हजार 125 शेतकऱ्यांचे 29 हजार 687 हेक्टर क्षेत्रावरील सुमारे 20 कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. याचा प्राथमिक अहवाल सरकारकडे पाठविण्यात आला आहे. रत्नागिरीतही नुकसानीची तीव्रता मोठी आहे. जिल्ह्यात जवळपास 30 टक्के भातशेती उद्ध्वस्त झाली आहे. एकट्या रत्नागिरी तालुक्यात 206 पैकी 190 गावांमधील साडेसहा हजार हेक्टर क्षेत्रावरील भातपीक नष्ट झाले. कोकणात बहुसंख्य शेतकरी वर्षभराची बेगमी म्हणून

### ऑक्टोबरमध्ये १२५ टक्के अधिक पाऊस

**साधारणतः मान्सून भारतातून परतल्यानंतर ऑक्टोबर महिन्यात राज्यात सरासरी ६९.८ मि.मी. पाऊस अपेक्षित असतो. मात्र यंदा मान्सून जाणे लांबले, १६ ऑक्टोबरला जाताच त्याची जागा मान्सूनोत्तर पावसाने घेतली. वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसाने ऑक्टोबर अखेर सरासरीपेक्षा १२५ टक्के अधिक हजेरी लावली. राज्यात १ ते २९ ऑक्टोबर दरम्यान १५७.१ मि.मी. पावसाची नोंद झाली. या महिन्याभराच्या कालावधीत राज्यातील एकही जिल्हा पावसाच्या तडाख्यातून सुटला नाही.**

### नुकसानग्रस्त पिके

**खरीप पिके : कापूस, मका, सोयाबीन, भात, तूर, बाजरी, नागली, कांदा, भुईमूग, खरीप ज्वारी आदी.**

**फळ पिके : द्राक्ष, डाळिंब, अंजीर, पेरू, संत्रा, लिंबू, केळी, मोसंबी, आंबा आदी.**

**भाजीपाला पिके : टोमॅटो, भोपळा, सर्व पालेभाज्या आदी.**

**फुलपिके : झेंडू, शेवंती, गुलाब, मोगरा, जाई-जुई, चमेली इ.**



भातपीक घेतात. याचे गवत गुराढोरांना मिळते. या वादळामुळे वर्षाची बेगमी हातची गेलीच, पण सुक्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. बळिराजाचा कैवार येऊन आता सर्वच पक्षांचे नेते ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करीत आहेत.

## विदर्भातील धान पीक संकटात

अवकाळी पावसामुळे पूर्व विदर्भातील धान पीक संकटात सापडले आहे. सरकारने तातडीने नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा देणे अपेक्षित असताना भंडारा जिल्ह्यातील बहुतांशभागात पंचनामे करण्यात आले नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. साकोली तालुक्यातील सानगडी परिसरात पुन्हा पाऊस झाल्याने संकट गहिरे निर्माण झाले आहे. अधिकारी मात्र पंचनामे सुरू असल्याचा दावा करीत आहेत. अवकाळी पावसामुळे भंडारा जिल्ह्यातील ८ हजार ८० हेक्टर क्षेत्रातील धानाचे पीक बाधित झाले असून ६ हजार ९९ हेक्टर क्षेत्राचे ३३ टक्क्यांपेक्षाही अधिक नुकसान झाले आहे. या वर्षी झालेल्या समाधानकारक पावसामुळे शेतकऱ्यांना दमदार उत्पन्न होऊन त्यांची दिवाळी उत्साहात जाण्याची चिन्हे असताना अवकाळी पावसाने धान पिकाचे मोठे नुकसान केले आहे. शेतात कापून ठेवलेल्या धानाच्या कडपा भिजल्या. त्यात आता दिवाळीमुळे मजूर मिळणार नसल्याने त्यांना कोंब फुटण्याचा धोका निर्माण झाला आहे. हलक्या धानाची ही स्थिती असताना शेतात उभा भारी धान कोसळला आहे. त्यावर कीडीचे आक्रमण होऊन उत्पन्नाची आशा आत्ताच निम्मी झाली आहे.


पावसामुळे शेतातील ओले साळवान (कडपा) उचलल्याने पीक विम्याचा लाभ देता येत नसल्याचा अफलातून फतवा विमा कंपन्यांनी काढल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. नुकसानग्रस्त पिकाचा दावा ४८ तासांत करणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतकरी सर्व कामे सोडून कंपनीच्या प्रतिनिधींच्या मागे धावत आहेत.

**गोंदिया** : अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका धान पिकाला बसला आहे. कृषी विभागाने केलेल्या प्राथमिक अहवालात तीन हजार हेक्टरमधील धान पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. या आकड्यात पुन्हा वाढ होण्याची शक्यता कृषी विभागाने वर्तविली आहे. नुकसानीचा अहवाल शासन आणि विमा कंपनीकडे पाठविण्यात येणार आहे. त्यानंतरच नुकसान भरपाई दिली जाणार असल्याची माहिती आहे. यंदा खरीप हंगामात एकूण १ लाख ९६ हजार हेक्टरवर धान पिकाची लागवड करण्यात आली. यंदा धानाला अनुकूल पाऊस झाल्याने पीक बहरले. विक्रमी उत्पादन होण्याचा अंदाज व्यक्त केला जात होता. जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी दिवाळीपूर्वीच धानाची कापणी केली होती. मात्र याच दरम्यान अवकाळी पाऊस झाल्याने त्याचा फटका कापणी केलेल्या धनाला बसला. दहा हजार हेक्टरवर पीक प्रभावित झाल्याचे दिसून आले आहे. तीन हजार हेक्टरमधील धान पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अर्जुनी मोरगाव आणि सडक अर्जुनी या दोन तालुक्यांना मोठा फटका बसला आहे.

## ‘एल निनो’पेक्षा ‘आयओडी’ प्रभावी

**‘एल निनो’चा भारतीय मान्सूनवर बहुतेक वेळा प्रतिकूल प्रभाव पडतो, असे आकडेवारी सांगते. यंदा मात्र, ‘इंडियन ओशन डायपोल’ (आयओडी) हा स्थानिक घटक भारतीय मान्सूनवर जास्त प्रभाव टाकणारा ठरला, असे हवामानशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. हिंदी महासागराच्या पश्चिम भागाचे (अरबी समुद्रासह) तापमान पूर्व भागाच्या (बंगालच्या उपसागरासह) तापमानापेक्षा जास्त असेल, तर ती स्थिती पॉझिटिव्ह आयओडी मानली जाते. आणि स्थिती या उलट असेल, तर त्याला निगेटिव्ह ‘आयओडी’ म्हणतात. पॉझिटिव्ह ‘आयओडी’ भारतीय मान्सूनसाठी अनुकूल मानला जातो. या वर्षी मान्सूनच्या मध्यात प्रशांत महासागरातील ‘एल निनो’ची स्थिती संपुष्टात येतानाच हिंदी महासागरात पॉझिटिव्ह ‘आयओडी’ची स्थिती तयार झाली. त्यामुळे हंगाम संपेपर्यंत देशभरात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला. ‘ आयओडी’ सध्या पॉझिटिव्ह स्थितीच्या सर्वोच्च पातळीवर असून, फेब्रुवारी २०२० पर्यंत तो न्यूट्रल स्थितीमध्ये येऊ शकेल, असे हवामानशास्त्रीय मॉडेलमधून दिसून येत आहे.**

Indian Ocean Dipole




राष्ट्रवादी स्वाभिमानी आवाज! राष्ट्रवादी विचार !!



# शेतकऱ्यांनो मैदान सोडू नका

## शरद पवार यांचे आवाहन



**विरोधात बसण्याचा जनादेश जनतेने आम्हाला दिला आहे. त्यामुळे आम्ही त्याचे पालन करणार आहोत असे विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर लगेचच राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी जाहीर केले आणि काँग्रेस–राष्ट्रवादी महाआघाडी सत्तेत सहभागी होण्याच्या चर्चेला पूर्णविराम दिला. एवढेच नव्हे तर त्यांनी लगेचच म्हणजे दिवाळी संपल्याबरोबर पावसाच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे जे प्रचंड नुकसान झाले आहे त्याची पाहणी करुन या संकटात शेतकऱ्याला धीर व दिलासा देण्यासाठी पवार साहेब घराबाहेर पडले. शेतकऱ्याच्या बांधावर, शेतात गेले. पिकांच्या नुकसानीची पाहणी केली आणि शेतकऱ्यांना सरकारने तातडीने आर्थिक मदत दिली पहिजे अशी मागणी करुन या प्रश्नासाठी स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटून जनतेचे दैन्यदुःख त्यांच्यापुढे मांडण्याची तयारीही दर्शविली.**



शेतीचे धोरण असो, की अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना धीर देणे असो, प्रत्येक वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे शेतकऱ्यांच्या बांधावर पोचले आहेत. अवकाळी पावसाच्या दणक्यानंतर शेतीची झालेली वाताहत पाहत पवार यांनी शेतकऱ्यांना, 'मैदान सोडू नका', अशा शब्दांत धीर दिला.

टाकेघोटी (ता. इगतपुरी) इथून पवार यांनी शेतकऱ्यांच्या नुकसानाची पाहणी करत त्यांची गाऱ्हाणी ऐकण्यात सुरुवातकेली. पुढे कळवण, बागलाणमधील नुकसानाची पाहणी करत पिंगळवाडे (ता. बागलाण) येथे पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. ते म्हणाले, 'जिल्हाधिकारी आणि कृषी अधिकाऱ्यांना जिल्ह्यातील पंचनाम्यांची माहिती देण्याची विनंती केली. तसेच केंद्र आणि राज्य सरकारने सर्व पिकांच्या झालेल्या नुकसानाची सरसकट कर्जमाफी करावी. शेतकऱ्यांना सवलतीत कर्जपुरवठा करावा. कर्जावर व्याज घेऊ नये. शेतकऱ्यांकडील वसुली बंद करावी. सरकार अथवा राज्यपालांशी बोलून कोणत्याही अटी-शर्तीविना शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करण्याची मागणी केली जाईल.

पीकविमा कंपन्यांचे काम चिंताजनक आहे. शेतकऱ्यांना मदत कशी मिळणार नाही, यासाठी पीकविमा कंपन्या जाचक अटी-शर्ती लावताहेत. याबाबत दिल्लीत अर्थ विभागाशी तीन किंवा चार नोव्हेंबरला चर्चा करून तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल. जनतेला आधार देण्याचे काम सरकारचे असल्याचे वरिष्ठ अधिकारी, सचिवांना शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पाठवायला हवे.'



अवकाळी पावसाने हातातोंडाशी आलेल्या पिकांचे मातेरे झाल्याने घायकुतीला आलेल्या बळीराजाच्या वेदनांवर राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी फुंकर घालण्याचा प्रयत्न केला. इगतपुरी, सटाणा, निफाड, कळवण तालुक्यांचा दौर करीत बळीराजाला भावनिक धीर देण्याचे काम त्यांनी केले. या आस्मानी संकटाने शेतकरी नेस्तनाबूत झाल्याच्या विदारक परिस्थितीचे वर्णन करतानाच, बळीराजाला आर्थिक मदत तसेच सरसकट कर्जमाफीसाठी केंद्र सरकारला साकडे घालणार असल्याचे पवार यांनी पत्रकारांना सांगितले. शेतीतील जाणत्या राजापुढे आपबीती पवारांपुढे कथन करताना अनेक शेतकऱ्यांना अश्रू अनावर झाल्याचे जागोजागी दिसून आले. शेतकऱ्यांचे दशावतार पाहून पवारही गहिवरल्याचे दिसून आले.

## शेतकऱ्यांना खचून जाऊ नये

सटाणा : अवकाळी पावसाने शेतकरी बांधवाचे न भरून येणारे नुकसान झाले असले तरीही शेतकरी बांधवांनी खचून न जाता हिमतीने व आत्मविश्वासाने परिस्थितीला सामोरे जावे. कुठलाही अविवेकी विचार मनात आणू नये. असा वडिलकीचा सल्ला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी शेतकऱ्यांना दिला. त्याचप्रमाणे राज्य आणि केंद्र सरकारने या अवकाळी नुकसानीची गंभीर दखल घेऊन तातडीने सरसकट पंचनामे करून कर्जमाफी द्यावी आणि पीक विमा योजनेचा जलद गतीने लाभ शेतकऱ्यांना द्यावा, अशी जोरदार मागणी पवार यांनी बागलाण तालुक्यातील पिंगळवाडे येथे पत्रकार परिषदेत केली.

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्रात अवकाळी

पावसाने मोठ्या प्रमाणात शेतकरी बांधवाचे शेती पिकांचे नुकसान केले आहे. राज्यातील ३२५ तालुक्यांमध्ये ५४ लाख २४ हजार हेक्टर शेती पिके अवकाळी पावसाने बाधीत झाली आहेत. शेतातील मका, बाजरी, भात, सोयाबीन, कापूस, द्राक्ष, डाळींब पूर्णतः उद्‌ध्वस्त झाली आहे. राज्य शासनाने शेतकऱ्यांना उभे करण्यासाठी पुर्नउभारणी कर्ज देऊन या कर्जावर व्याज आकारणी करू नये. या नुकसानीची तातडीने पंचनामे करण्याचे गरजेचे आहे. सरसकट कर्जमाफी देऊन शेतकऱ्यांना आधार देणे ही मोठी जमेची बाजू ठरणार आहे. पत्रकार परिषद सुरू असताना द्राक्ष उत्पादक केदा भामरे व वनोली येथील किशोर खैरणार यांनी ढसाढसा रडून आपल्या नुकसानीची व्यथा सांगितली.

## कळवणच्या शेतकऱ्यांना धीर

कळवण : शरद पवार यांनी शुक्रवारी कळवण तालुक्यात झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला. नांदुरीजवळील गोबापूर येथील शेतकरी गंगाधर खांडवी यांच्या शेतातील सोयाबीन व बाजरीची पाहणी करीत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या भावना जाणून घेत त्यांना धीर दिला. राज्यातील युती सरकार शेतकऱ्यांच्या दृष्टीने बेजबाबदार असून शेतकऱ्यांना मदतीसाठी या






सरकारने पुढे यायला हवे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. अनेक शेतकऱ्यांनी शेतीपिकांच्या नुकसानीबाबत तक्रार करीत समस्यांचा पाऊस पाडला. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांचा आत्मा असलेली एनडीसीसी बँक बुडाल्याने आम्ही उद्‌ध्वस्त झालो अशा शब्दांत शेतकऱ्यांनी व्यथा मांडली.

## शेतकऱ्यांना उभे करण्यासाठी हातभार लावला नाही तर सरकार विरोधात ठोस भूमिका घेऊ

नाशिक : शेतकऱ्यांना उभे करण्यासाठी सरकारने हातभार लावला पाहिजे. सरकारने तशी भूमिका घेतली नाहीतर आम्ही याविरोधात ठोस भूमिका घेऊ असा स्पष्ट इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी सरकारला दिला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी नाशिकमध्ये शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधावर जात त्यांच्या पिकाची पाहणी केली. शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानाची सखोल माहिती घेऊ व स्थानिक लोकप्रतिनिधींना घेऊन सरकार दरबारी दाद मागू असे सांगतानाच सरकार संवेदनशीलपणे आमचे म्हणणे ऐकून मदत करेल अशी अपेक्षाही शरद पवार यांनी व्यक्त केली. शासनाच्या इथल्या स्थानिक अधिकाऱ्यांशी यावेळी शरद पवारांनी चर्चा केली. त्यावेळी सरकारने नुकसानभरपाईसाठी कोणता ठोस निर्णय घेतला नाही अशी माहिती दिली. शिवाय नुकसानभरपाईसाठी सरकारकडून जे निकष आता लावले जात आहेत ते दोन ते तीन वर्षांपूर्वीचे आहेत. मात्र आजची परिस्थिती वेगळी आहे असेही शरद पवार यांनी यावेळी सांगितले.



नाशिक जिल्ह्यात पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून तांदूळ, द्राक्ष, सोयाबीन, मका सर्वच पिकांचा समावेश आहे. शेतकऱ्यांनी पिकांवर जो खर्च केला तो वाया गेला आणि त्यांच्या हाती उत्पन्नही लागले नाही असे सांगतानाच अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या गोबापूर- कळवण तालुका येथील शेतकऱ्यांच्या व्यथा शरद पवार यांनी जाणून घेतल्या.

# चव्हाटा

घंटाकर्ण, नवी दिल्ली

## अपना हाथ जगन्नाथ??

एखाद्या केंद्रीय मंत्र्यांच्या घरचे निमंत्रण मिळणे ही काही लहानसहान बाब नव्हे!


तर अशाच एका महत्वाचे खाते सांभाळणाऱ्या केंद्रीय मंत्र्याने त्याच्या निवासस्थानी खास दिल्ली स्टाईल 'दिवाली मिलन' कार्यक्रम आयोजित केला होता.

तसे हे मंत्री परंपरा पाळणारे आणि मुख्य म्हणजे भारतीय इतिहास व पुराणे यांचा विलक्षण अभिमान बाळगणारे आहेत.

असे असले तरी त्यांच्या या दिवाली मिलन कार्यक्रमात







तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ ठेवण्यात आले होते. अगदी चायनीज नूडल्स देखील पाहुण्यांसाठी तयार ठेवण्यात आल्या होत्या. याखेरीज गुलाबजाम आणि दाल तडका, वगैरे वगैरे बाकी नेहमीचे पदार्थ होते.

मंडळी जमली. गप्पा सुरु झाल्या. आणि काही वेळाने लोकांना त्यांच्या पोटाने हाका द्यायला सुरुवात केली.

पोटभर गप्पा मारुन पोटे रिकामी झाल्यावर मंडळींनी खाद्यपदार्थांकडे मोर्चा वळवला. परंतु काही मिनिटातच खाद्यपदार्थांच्या भांड्यांमध्ये खडखडाट होऊ लागला.

त्या भांड्यांमध्ये नव्याने पदार्थ भरलेच जात नव्हते.

मग काय हळूहळू परिस्थिती हाताबाहेर जाऊ लागली.

काही लोकांनी तर चक्क नूडल्स आणि दाल फ्राय असे विसंगत पदार्थ प्लेटमध्ये घेऊन खाण्यास सुरुवात केली.





पण या अडचणीत आणखी भर पडली.

चमचे गायब!

चमचे म्हणजे खाण्याचे बरं का!

आता लोकांना प्रश्न पडला की नूडल्स आणि दाल फ्राय हाताने कसे खायचे?

या मंत्री महोदयांच्या मंत्रालयातील एका उच्चपदःस्थ अधिकाऱ्याने काय खावे?

त्याने चहाबरोबर चक्क एक गुलाबजाम घेतला. बिच्चारा! त्यात त्याची आणखी एक फजिती! तो गुलाबजाम त्याच्या

राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

चहाच्या कपात पडला. चमचे नव्हतेच.

त्या बिचाऱ्याने मग कपात बोटे घालून तो गुलाबजाम काढून आख्खा तोंडात कोंबला.

तेवढ्यात कुणतरी जोक मारला, 'दिल्ली में और वो भी एक मंत्री के घर मे चमचे नही ये तो कमाल है!'

पण हा विनोद ऐकण्याच्या मनःस्थितीत कुणी नव्हते. सर्वांच्या चेहऱ्यावर वैताग स्पष्ट दिसत होता.

मंत्रीमहोदयांना याची कोणतीच फिकिर नसावी कारण ते आलेल्या पाहुण्यांशी गप्पा मारण्यात दंग होते.

थोडक्यात याचे तात्पर्य काय?

मंत्र्यांच्या घरी गेल्यावर चमचे नसतील तर बोटांचा - हाताचा प्रभावी वापर करायची तयारी ठेवा!

## जन गण मन ...........!

सध्याच्या देशभक्ति, राष्ट्रवादाने भरलेल्या व भारलेल्या राजवटीत राष्ट्रगीताला अनन्यसाधारण महत्व येणे स्वाभाविकच आहे.

राष्ट्रगीताचे स्वर कुठून ऐकायला येताक्षणी भक्तमंडळींचा राष्ट्रवाद व देशभक्ति उफाळून येते व ते तत्काळ दक्ष अवस्थेत उभे राहतात.



हा प्रकार अशा रीतीने केला जातो की जी मंडळी उभी रहात नाहीत ती जणूकाही देशद्रोहीच असावीत.

राष्ट्रगीताचा आदर सर्वांनाच आहे. परंतु एखादी व्यक्ती उभी राहिली नाही याचा अर्थ ती व्यक्ती देशद्रोही आहे असा नव्हे. त्यामुळे यासंदर्भात सक्ती किंवा बंधनाला नेहमीच विरोध केला जातो.

जेव्हा परदेशी देशप्रमुख भारत भेटीवर येतात तेव्हा त्यांना 'गार्ड ऑफ ऑनर' दिला जातो.

त्यावेळी दोन्ही देशांची राष्ट्रगीते वाजविण्यात येतात.

नुकताच जर्मनीच्या प्रमुख चॅन्सेलर अँजेला मर्केल या भारतात येऊन गेल्या.

मर्केल यांना कंपवातासारखा आजार आहे. त्यामुळे त्या चालू शकतात पण एका जागी उभे राहण्यास त्यांना अडचण येते.

त्यामुळे राष्ट्रगीताच्या ऐवजी त्या नेहमी खुर्चीत बसून राहतात.

खुर्चीत बसणेही राजशिष्टाचारसंमतच मानले जाते.

परंतु अनेक वेळेस राजशिष्टाचारातील बारकावे माहिती नसल्याने पत्रकार किंवा माध्यमे एखादा परदेशी राष्ट्रप्रमुख राष्ट्रगीताला उभा न राहिल्यास त्याविरुध्द प्रतिकूल टिप्पण्या करु शकतात.

हा असला प्रकार टाळण्यासाठी भारतीय परराष्ट्र मंत्रालयाला घाम गाळावा लागला.

मर्केल यांच्या दौऱ्याची माहिती देण्यासाठी घेतलेल्या पत्रकार परिषदेनंतर परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी उपस्थित पत्रकारांना जवळ बोलावून काहीशा दबक्या आवाजात माहिती देताना मर्केल यांना उभे राहण्यात असलेल्या अडचणीची माहिती दिली. आणि विशेषतः इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी गार्ड ऑफ ऑनरचे वार्तांकन करताना त्या बसलेल्या असल्याचे दाखविणे टाळावे अशी विनंती केली व वृत्तपत्र प्रतिनिधींना देखील याबाबत प्रतिकूल टिप्पणी करु नये असे सांगितले.

कृपया या गोष्टीला विपरीत प्रसिध्दी देऊ नका असे या प्रवक्त्यांनी वारंवार पत्रकारांना बजावले.

एखाद्या गोष्टीचा विनाकारण बाऊ करणे कसे अंगाशी येते याचे हे ठळक उदाहरण!

राष्ट्रगीताचा आदर जरूर असला पाहिजे परंतु त्याची सक्ती किंवा बंधन घालणे उचित नसल्याचे मत न्यायालयांनी देखील व्यक्त केले आहे.

एकदा संसदेतच टीव्हीवर राष्ट्रगीत वाजताना पाहून भाजपचे दोन-तीन खासदार अचानक 'अटेन्शन' मध्ये उभे राहिले.

बाकीच्या मंडळींना कळेना की हे असे का करीत आहेत.

पण हा देखावा झाला. हे अवडंबर झाले.

हे प्रकार थांबले पाहिजेत.

## कॉनस्टिट्यूशन क्लबची कहाणी

राजधानीत संसद सदस्यांसाठी 'कॉन्स्टिट्यूशन क्लब' आहे.

सुरुवातीला या क्लबचे स्वरुप फारच मर्यादित म्हणजे जलतरण तलाव, कॉन्फरन्स हॉल्स वगैरे वगैरे!

एक कँटीन होते तेही कसेबसेच चालत असे.

परंतु गेल्या काही वर्षात ही संस्था खऱ्या अर्थाने 'क्लब' म्हणून विकसित करण्यात आली आहे.



तेथे अत्याधुनिक अशा व्यायामाच्या सोयी व सुविधा (जिम), जलतरण तलाव, सलून स्पा वगैरे सुखसोयी संसद सदस्यांसाठी करण्यात आल्या आहेत.

याखेरीज राज्यसभा सभापति व उपसभापति आणि लोकसभा अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या नावाचे चार हॉल्स आहेत.

कॉन्फरन्स रुम आहेत.

आधुनिक असा रेस्तोरां पण आहे.

बाहेर कृत्रिम तलाव, कारंजी आहेत. तलावात बदके पण आहेत.



एवढे सर्व सुख असूनही व्यवस्थापनाचे सुख मात्र दुखताना आढळते.

त्यांचे म्हणणे असे की या वास्तूचा ज्या उच्चपदःस्थांशी संबंध आहे ते तिच्याकडे पदासीन असताना पूर्ण दुर्लक्ष करतात.

उदाहरणार्थ राष्ट्रपतिपदासाठी उभ्या असलेल्या व्यक्ती या वास्तूत येऊन पत्रकार परिषद घेतात. एपीजे अब्दुल कलाम, प्रणव मुखर्जी इ.

पण राष्ट्रपतिपदी निवड झाल्यानंतर त्यांनी कधीही या वास्तूकडे ढुंकूनही लक्ष दिले नाही.



तोच प्रकार पीठासीन अधिकाऱ्यांचा असतो असे दुःख या वास्तूतील मंडळींनी व्यक्त केले.

आणखी एक मजेदार योगायोग!

वर्तमान राष्ट्रपतींनी एकदा या क्लबच्या पदाधिकारी पदासाठी निवडणूक लढवली होती. तेव्हा ते संसदसदस्य होते. परंतु त्यांना यश मिळाले नाही व ते पराभूत झाले होते. पराभूत झाल्यानंतर त्यांनी त्या निवडणुकीच्या विरोधात न्यायालयात देखील दाद मागितली होती. त्या प्रकरणातही त्यांना हार मानावी लागली होती.

सारांशाने काय?

या वास्तूचा उपयोग सर्वांना हवा आहे. पण तिची देखभाल, तिच्याकडे योग्य लक्ष देण्याची कुणाची तयारी नसते किंवा कुणी त्यात फारसा रसही दाखवत नाही. ही माहिती देणाऱ्या पदाधिकाऱ्याला म्हटले, 'या आठवणी लिहिण्यासारख्या आहेत.' त्यावर कान पकडून त्याने काढता पाय घेतला!




## हस्तिनापुराकडेच लक्ष?

भाजपमध्ये दुःखी आत्म्यांची कमी नाही. विशेषतः या पक्षाची सारी सूत्रे केवळ दोन व्यक्तींच्या हाती एकवटल्यानंतर अन्य कुणाला फारसे महत्व राहिलेले नाही. बाकीची मंडळी आहेत ती केवळ कुंपणावरची आहेत.



भाजपचे उत्तर प्रदेशातले एक दलित नेते आहेत. ते एकेकाळी राज्यसभेत होते.

संघटनेतही त्यांनी निष्ठेने काम केलेले आहे. विशेष म्हणजे त्यांची पार्श्वभूमी रा.स्व.संघाची आहे. पुरेशी ज्येष्ठता व अनुभवही आहे. असे असूनही त्यांचा राजकीय वनवास संपताना दिसत नाही. त्यामुळे बिचारे दुःखी कष्टी अवस्थेत हिंडत असतात.

नुकतेच ते भेटले असता इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यानंतर काय सध्या काय चालू आहे? असा प्रश्न केल्यावर ते

खिन्न स्वरात उत्तरले, 'क्या, होना क्या है? हमरा नजरे ते हस्तिनापूर की तरफ लगी हु ई है!'

उत्तर हिंदुस्तानात 'नजरे हस्तिनापूर की तरफ लगना' याला विशिष्ट अर्थ प्राप्त आहे.

ज्याप्रमाणे मराठीत 'पानिपत झाले' असा शब्दप्रयोग विशिष्ट परिस्थितीला वापरला जातो तसाच 'हस्तिनापूरकडे नजर लावून बसणे' म्हणजे 'नेतृत्वाकडे आशाळभूत नजरेने पहात आहोत' असा त्याचा आशय असतो. त्यामुळे सध्या भाजपमध्ये अशा अनेकजणांनी 'हस्तिनापूरकडे डोळे लावलेले' आहेत.

नेतृत्वाची कृपादृष्टी होईल तोपर्यंत वाट पाहणे एवढेच त्यांच्या हाती उरले आहे!

परंतु आधीच्या राज्यकर्त्यांबद्दल मनात तिरस्कार बाळगणाऱ्या राजवटीने या रचनेची मोडतोड करण्याचे ठरवलेले दिसते. त्याची तयारी सुरु झाली आहे.

येत्या दोन महिन्यात त्याबाबतचे नकाशे आणि आराखडे तयार होणार आहेत. आणि हो, नकाशा तयार करण्यासाठीचे कंत्राट देखील गुजरातच्या एका कंपनीलाच देण्यात आले आहे.

पूर्वी मुघल सल्तनतीमध्ये राजधान्या हलविण्याचे लहरी प्रकार केले जात असत. आता ते फारसे शक्य नसल्याने आहे ती राजधानी मोडून तोडून त्याजागी नवीन उभारणी करणे हा प्रकार चालू आहे. संसदेच्या सध्याच्या वास्तूभोवताली रेल्वे मंत्रालय(रेल भवन), त्याच्या पुढे कृषी भवन व त्याच्या पुढे शास्त्री भवन अशा विविध मंत्रालयांची कार्यालये असलेल्या इमारती आहेत.


नव्या योजनेनुसार या इमारती जमीनदोस्त करुन नव्याने व नव्या स्वरुपात त्या उभारण्यात येणार आहेत.

2022 मध्ये भारतीय स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण होत असल्याने त्यापूर्वी नवी संसदेची वास्तू आणि तिच्या बाजुने विविध मंत्रालये उभारण्यासाठी वर्तमान राज्यकर्त्यांनी कंबर कसलेली आहे.

## नव्या दिल्लीची आणखी नवी दिल्ली??

नवी दिल्ली किंवा ज्या ल्युट्येन्स झोन म्हणतात त्याची फेररचना व नव्याने बांधणी करण्याचा चंग वर्तमान राज्यकर्त्यांनी बांधला आहे.

संसदेची इमारत देखील नव्याने उभारण्याचा संकल्प त्यांनी सोडला आहे. राष्ट्रपति भवन केंद्रस्थानी आणि त्याच्या दोन्ही बाजूने पंतप्रधान कार्यालयासह अर्थ, संरक्षण,परराष्ट्र व गृह मंत्रालये, संसदगृह अशी सध्याची रचना आहे.



पूर्वीच्या राज्यकर्त्यांची नामोनिशाणीही ठेवायची नाही या विकृतीने पछाडलेल्या मंडळींना हा घाट घातलेला आहे. यामध्ये पंतप्रधानांसाठी त्यांच्या कार्यालयाजवळच म्हणजे राष्ट्रपति भवनाला लागून असलेल्या 'साऊथ ब्लॉक' जवळचा पंतप्रधान निवास उभारण्याचा प्रस्तावही या नव्या आराखड्यात करण्यात आलेला आहे. थोडक्यात काय आगामी काळात नवी दिल्लीत 'विधळवाट' या नाटकाचा प्रयोग रंगणार आहे. तोपर्यंत मंत्रालये कशी काम करणार आहेत हे देवच...... नव्हे नव्हे देवांचे देव ब्रह्मांडनायकच जाणो!

## पोलिस विरुध्द वकील

दिल्लीत पोलिस विरुध्द वकील असा संघर्ष नवा नाही. फार पूर्वी वकीलांचा संप चालू असताना निदर्शने करणाऱ्या वकीलांवर तेव्हाच्या पोलिस उपायुक्त किरण बेदी यांनी जोरदार लाठीमार करुन वकीलांना बेदम चोपून काढले होते. त्या प्रकरणाचा ठपका ठेवून त्यांची बदली करण्यात आली होती.

वकीलांनी त्याबद्दल किरण बेदी यांना कधीच माफ केले नाही. परंतु दिल्लीतले वकीलही काही कमी नाहीत.

कन्हैयाकुमारच्या प्रकरणात याच वकीलांनी पत्रकारांना न्यायालयाच्या आवारात मारहाण केलेली होती. परंतु वकीलांविरुध्द कधीही कारवाई झाली नव्हती.

आता देखील दिल्लीच्या तीस हजारी न्यायालयात पार्किंगवरुन झालेल्या वादात पोलिस आणि वकील यांच्यात चक्क हिंसक चकमकी झाल्या. पोलिसांनी वकीलाना बदडले. त्यात तीन पोलिस निलंबित झाले. वकीलांनी दोन ते तीन दिवस संप पुकारला. यानंतर वकीलांची पाळी होती.

वकीलांनी एका पोलिस इन्स्पेक्टरला बदडले व त्याचा व्हिडिओ सर्वत्र प्रसारित झाला.

संतप्त पोलिसांना पोलिस मुख्यालयासमोर निदर्शने केली. पोलिस आयुक्त त्यांना शांत करण्यास आले असता त्यांची हुर्यो उडविण्यात आली. दिल्लीचे पोलिस थेट केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अधिकारात येतात.

अमित शहा गृहमंत्री आहेत.

परंतु वकील व पोलिस यांच्यात बाजू कुणाची घ्यायची असा प्रश्न आहे. वकील हे भाजपच्या बाजुने आहेत.

पोलिस हे हुकमाचे ताबेदार आहेत.

परंतु भाजप सरकारने वकीलांविरुध्द कारवाई करण्याचे टाळल्यास ते महागात जाणार आहे. कारण पोलिसांची नाराजी या सरकारला परवडणारी नाही.

विशेषतः जे सरकार पोलिसी बळावर चालविले जात आहे तेथे पोलिसांना दुखावून चालणार नाही. आता नवे 'आधुनिक सरदार पटेल' उर्फ अमित शहा काय पावले उचलतात ते पहावे लागेल.





1977 मध्ये दिल्लीत पोलिस आंदोलन झाले होते.

अ.र.अंतुले यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात महाराष्ट्रात पोलिस आंदोलन झाले होते. पोलिस आंदोलनाचे प्रकार विरळे आहेत. त्यामुळेच राजधानीत पोलिसांचे झालेले हे आंदोलन दुर्लक्ष करण्यासारखे नाही. कायद्याचा अर्थ लावणारे विरुध्द कायद्याची अंमलबजावणी करणारे यांच्यातल्या संघर्षात मोदी सरकारची कसोटी लागणार आहे.

# Nanded City, Pune
*The Maximum City*

Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

# प्रत्येक घराला एक मन असतं.
# प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

## आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

## CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

## जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेक्स (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

A project by MAGARPATTA CITY
*The pride of Pune*

Call: 020-67275300 / 1 / 2

CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com

An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

tempestadvertising.com




# या संशयास्पद हालचालींना पाठबळ कुणाचे?

**लोकनाथ**

एखाद्या कथा-कादंबरी किंवा पाश्चात्य साय-फाय सिनेमाला शोभणारी पण खरी घडलेली ही कहाणी आहे. 'एनएसओ' ही एक इस्रायली सॉफ्टवेअर कंपनी आहे. ती प्रामुख्याने सायबरवेपन्स तयार करणारी कंपनी आहे. आता या कंपनीची मालकी ब्रिटनमधील एका मालकाकडे आहे. या कंपनीने विकसित केलेले 'पेगॅसस' हे हेरगिरीसाठी वापरले जाणारे सॉफ्टवेअर किंवा 'स्पायवेअर' जगभरात माहिती असलेले आहे. अनेक देशांमध्ये टेहळणीसाठी, मागोव्यासाठी त्याचा वापर केला जात असतो. या कंपनीच्या दाव्यानुसार अनेक देशात त्यांचे हे स्पायवेअर वापरले जाते. परंतु त्याचा वापर केवळ दहशतवाद, दहशतवाद विरोधी मोहिमा, आंतरराष्ट्रीय तस्कर अशा समाजकंटक व राष्ट्रविरोधी घटकांविरुध्दच वापरण्यात येते. या त्यांच्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून त्यांनी मेक्सिकोतील एका संभाव्य दहशतवादी हल्ल्याची योजना वेळीच उघडकीस आणली आणि मोठा अनर्थ त्यामुळे टळला असल्याचा दावाही केली आहे. या स्पायवेअरचा वापर करुन लोकांच्या मोबाईलमध्ये प्रवेश करण्यात येतो आणि मग त्या मोबाईलद्वारे जे काही संसूचन(कम्युनिकेशन) किंवा दळणवळण होते ते सर्व संबंधित यंत्रणांना उपलब्ध होते. 'व्हॉट्स ॲप' या जगभरातील लोकप्रिय समाज-माध्यम प्लॅटफॉर्मला सर्वप्रथम त्यांच्या यंत्रणेत या स्पायवेअरचा शिरकाव झाल्याची कुणकुण लागली. त्यांनी त्याचा शोध घेतल्यानंतर त्यांना या स्पायवेअरचा




त्यांच्या सभासदांच्या खात्यात प्रवेश झाल्याचे लक्षात आले. सुरुवातीच्या माहितीनुसार सुमारे 1400 व्हॉट्सअॅप खातेधारक या स्पायवेअरचे बळी झाल्याचे त्यांनी शोधून काढले व त्यातील काही खातेधारक हे भारतीय असल्याचे निष्पन्न झाले. या संख्येत आणखी काही पटीने वाढ होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. समोर येत असलेल्या माहितीनुसार यामध्ये भारतीय पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, काही उद्योगपति आणि अर्थातच काही राजकीय नेत्यांचा समावेश असल्याचे कळते. अद्याप याबाबत अधिकृत माहिती हाती आलेली नाही. परंतु इंडियन एक्सप्रेस व अन्य काही वृत्तपत्रांनी याबाबत काही माहिती प्रसिध्द केली आहे. कॉंग्रेसने प्रियंका गांधी यांचा मोबाईलही या स्पायवेअरने हॅक केला असल्याचा दावा केला. प्रियंका गांधी यांना संबंधित मेसेज आले होते परंतु त्यांनी ते न पाहताच अनोळखी असल्याने डिलिट केले अशी माहिती सांगण्यात येते. यावर गदारोळ होणे स्वाभाविक होते परंतु माहिती तंत्रज्ञान मंत्री रविशंकर प्रसाद यांनी तातडीने त्याचा इन्कारही केला आणि सरकारचा यामध्ये काही हात नसल्याचे सांगितले. परंतु कॉंग्रेसने प्रियंका गांधी यांचा मोबाईल हॅक झाल्याचा आरोप करताच रविषंकर प्रसाद हे त्यांच्या मूळ स्वभावावर आले. 'तू-मी, तू-मी'च्या खेळात निष्णात असलेल्या भाजपचेच ते नेते असल्याने त्यांनी तत्काळ कॉंग्रेसला प्रत्युत्तर देताना, 'तुमचे सरकार असताना प्रणव मुखर्जी, व्ही.के.सिंग यांचे फोन टॅप होणे किंवा त्यांच्यावर पाळत ठेवण्याचे



प्रकार घडले होते त्याचे उत्तर द्या' असा सवाल केला. एनएसओ या कंपनीच्या वेबसाईटनुसार या कंपनीची उत्पादने म्हणजेच सायबरवेपन्स किंवा स्पायवेअर्स ही केवळ सरकारी संस्थांनाच उपलब्ध केली जातात. ती अधिकृतपणे खरेदी केली जातात असा या कंपनीचा दावा आहे. याचा अर्थ कोणतीही खासगी कंपनी किंवा व्यक्ती ही स्पायवेअर्स खरेदी करु शकत नाहीत. मग हा प्रकार केला कुणी ? हा प्रकार झाला कसा ?

हा सवाल-जवाबाचा खेळ चालू राहील. या सर्व प्रकारात सरकारच्या भूमिकेवर काही प्रश्नचिन्ह निर्माण होतात. व्हॉट्स-ॲप कंपनीने अशा प्रकारचे हॅकिंग होत असल्याची माहिती मे-2019 मध्येच भारत सरकारला कळविलेली होती. आतापर्यंतच्या माहितीनुसार भारत सरकारने त्याची दखल घेतली नव्हती. त्यानंतर सप्टेंबर-2019 मध्येही व्हॉट्स-ॲप कंपनीने पुन्हा भारत सरकारच्या निदर्शनाला ही बाब आणण्याचा प्रयत्न केला. तरीही भारत सरकार ढिम्म राहिले. जेव्हा इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्राने हा गौप्यस्फोट केला व मोबाईल हॅकिंगच्या या प्रकरणात भारतातील काही पत्रकार, राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते व स्वयंसेवी संघटनांचा समावेश असल्याच्या बातम्या प्रसिध्द केल्यावर महान भारत सरकार जागे झाले. सर्वप्रथम रविशंकर प्रसाद यांनी या बातमीचे खंडन करताना सरकारचा त्याच्याशी काही संबंध नसल्याचे सांगितले. व्हॉट्स ॲप कडून तपशील मागितल्याची माहिती त्यांनी दिली व चौकशी केली जाईल असे सांगितले. यानंतर केंद्रीय गृह मंत्रालयातर्फे एक खुलासा करण्यात आला आणि त्यामध्येही संबंधित स्पायवेअरचा उपयोग केला जात नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. केंद्रीय गृह मंत्रालयाने हेही स्पष्ट केले की समाजकंटक, देशविरोधी कारवायांबद्दल संशय असलेल्या घटकांचे फोन टॅप करताना त्याला आवश्यक असलेल्या नियमांचे पालन केले जात आहे. गृह मंत्रालयाचा खुलासा आला हे चांगले झाले. परंतु देशात केवळ गृह मंत्रालय किंवा गृह मंत्रालया अंतर्गत असलेल्या संस्थाच फोन टॅपिंग करतात असे नव्हे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस सीताराम येचुरी यांनी याचा उल्लेख करुन म्हटले आहे की गृह मंत्रालयाचा खुलासा ठीक आहे परंतु, 'रॉ'(रीसर्च अँड ॲनॅलिसिस विंग), नॅशनल टेक्निकल रीसर्च ऑर्गनायझेशन - 'एनटीआरओ' ही संस्था राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांच्या अधिकारक्षेत्रात असून राष्ट्रीय सुरक्षा परिषद ही थेट पंतप्रधान कार्यालयाच्या कक्षेत येते. याच संस्थेची आणखी सह-संस्था आहे व तिचे नाव 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ क्रिप्टोलॉजी रीसर्च अँड डेव्हलपमेंट' असे आहे. तिच्या नावावरुनच तिच्या कामाच्या स्वरुपाची कल्पना येते. याखेरीज सीबीआय ही तपाससंस्था पंतप्रधानांच्या अधिकारातील आहे. एवढेच नव्हे तर 'रॉ' ही संस्था देखील केंद्रीय मंत्रिमंडळ सचिवालयाच्या (कॅबिनेट सेक्रेटॅरिएट) कक्षेत समाविष्ट आहे. या तपशीलावरुन हे लक्षात येते की केवळ गृह मंत्रालयाने केलेल्या खुलाशाने या वादावर पडदा पडतो असे मानता येणार नाही. कारण गृह मंत्रालयाबाहेरच्या या अन्य विविध संस्थांनी खुलासे केलेले नाहीत. त्यामुळेच सीताराम येचुरी यांच्या म्हणण्यात असलेले तथ्य लक्षात येते. थोडक्यात यामध्ये 'पीएमओ' म्हणजेच 'पंतप्रधान कार्यालय' यांच्याकडूनही खुलाशाची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांच्या कार्यालयाकडूनही स्पष्टीकरण अपेक्षित आहे. जोपर्यंत हे खुलासे होत नाहीत तोपर्यंत संशयाची सुई या राजवटीतील या संस्थांच्या दिशेनेच आपला रोख दाखवत राहील.

सरकारने या प्रकरणी कानावर हात ठेवण्याची भूमिका घेतलेली असली तरी स्पष्ट खुलासे न झाल्यास संशय वाढत जाणार आहे. साधा प्रश्न हा आहे की केंद्रीय गृह मंत्रालय किंवा माहिती तंत्रज्ञानमंत्री जर या प्रकरणात हात झटकत आहेत तर मग हे केले

कुणी ? हा प्रकार कुणा 'नॉन स्टेट अॅक्टर'ने म्हणजे 'सरकारशी संबंधित नसलेल्या घटकां'नी केला असावा असे प्रचारित केले जाऊ लागले आहे. पण भारतात असे कोणते घटक आहेत ? ज्या कंपनीचे हे स्पायवेअर आहे त्या कंपनीविरुध्द कॅलिफोर्नियाच्या कोर्टात खटला चालू आहे. तेथेही अशीच चर्चा केली जात आहे. त्याचप्रमाणे हा जो हॅकिंगच्या प्रकार आहे तो भारतात लोकसभा निवडणुकांची प्रक्रिया जारी असताना केला गेल्याचे निष्पन्न झाले आहे.

म्हणजेच यातून जो स्वाभाविक प्रश्न उत्पन्न होतो की विरोधी पक्षांवर नजर ठेवण्यासाठी किंवा त्यांच्या गोटातील माहिती मिळावी म्हणून हा प्रकार केला गेला काय ? यातील काही तारखांवर नजर टाकल्यास याबाबत काही संकेत मिळू शकतात. मे-2019 मध्ये प्रथम भारत सरकारला यासंदर्भात सावध करण्यात आले होते. परंतु त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती. त्यानंतर सप्टेंबरमध्ये फेसबुकतर्फे लेखी स्वरुपात सरकारला यासंदर्भात माहिती देण्यात आली होती. तरीही मोदी सरकारने काहीही हालचाल केली नाही. हा सर्व काळ निवडणुकांचा आणि त्यानंतरच्या महत्वपूर्ण घडामोडींचा आहे. 20 ऑगस्ट 2019 रोजी रविशंकर प्रसाद हे माहिती-तंत्रज्ञान विभागाचे मंत्री या नात्याने व्हॉट्स-ॲपचे सीईओ क्रिस डॅनियल्स यांना भेटलेले होते. यानंतर 12 सप्टेंबर 2019 रोजी ते फेसबुक कंपनीचे उपाध्यक्ष निक क्लॅग यांनाही भेटलेले आहेत. परंतु या दोन्ही वेळेस त्यांच्या चर्चेत हा हॅकिंगचा मुद्दा समाविष्ट नव्हता हे रहस्यमय व संशयास्पद आहे. 30 ऑक्टोबर 2019 रोजी व्हॉट्स-ॲप तर्फे इस्रायली कंपनी एनएसओ विरुध्द अमेरिके खटला भरण्याची बातमी झळकल्यावर रविशंकर प्रसाद यांनी ट्वीटरद्वारे या घटनेची पहिल्यांदा दखल घेतल्याचे लक्षात येते व त्यातही ते केवळ माहिती गोळा करीत असल्याचेच म्हटलेले आहेत.

अमेरिकेत अनेक वर्षांपूर्वी वॉटरगेट प्रकरण झाले होते. त्यावेळी देखील अध्यक्षीय निवडणुकीच्या वेळी विरोधी पक्षांच्या कार्यालयांचे फोन टॅप करण्याचे प्रकार झाल्याचा गौप्यस्फोट शोध-पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांनी केला होता. या प्रकरणाचा ठपका तत्कालीन अमेरिकन राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांच्यावर ठेवला गेला आणि त्यांना पदत्याग करावा लागला होता. भारतात तसे घडेल आणि विशेषतः वर्तमान राजवटीच्या काळात घडेल अशी सुतराम शक्यता नाही. परंतु या प्रकरणाचे गांभीर्य अजुन विरोधी पक्षांना देखील पुरेसे जाणवले आहे काय याबाबत शंका आहे. काँग्रेसने प्रियंका गांधी यांचा मोबाईल हॅक करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप केला आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीही त्यांचा फोन टॅप केला जात असल्याची शंका व्यक्त केली आहे. त्यामुळे या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन विरोधी पक्षांनी एकत्रितपणे याविरुध्द आवाज उठविणे अपेक्षित आहे. नुकत्याच झालेल्या समविचारी विरोधी पक्षांच्या बैठकीत या मुद्यावरही चर्चा झाली आणि आर्थिक मुद्यांप्रमाणेच या विषयावरही एकत्रितपणे मोहिम करण्याबाबत संमती व्यक्त करण्यात आली. सध्या गृह मंत्रालयाशी निगडित संसदीय स्थायी समिती आणि माहिती तंत्रज्ञानविषयक स्थायी समिती या दोन्ही समित्यांचे अध्यक्षपद काँग्रेसचे नेते अनुक्रमे आनंद शर्मा आणि शशि थरूर यांच्याकडे आहे. हा विषय स्पष्टपणे संसदीय स्थायी समितीच्या अधिकारातही येतो. त्यामुळे या समित्यांतर्फेही या विषयाची छाननी करण्याचे ठरविण्यात आले आहे.

वर्तमान राजवटीचे इस्रायल-प्रेम हे विशेष स्वरुपाचे आहे. परंतु खुद्द इस्रायलमध्ये देखील या स्पायवेअरच्या कंपनीबाबत प्रतिकूल मत आहे. किंबहुना त्यांच्या संरक्षण मंत्रालयाने देखील या कंपनीविरुध्द प्रतिकूल मत नोंदवून त्यांची उत्पादने वापरण्यास विरोध केल्याची माहिती आहे. हे सर्व खरे असले तरी भारतात अशा कोणत्या संस्थेने याचा वापर केला हा मुद्दा प्रश्नचिन्हांकित आहे. सरकार जर याबाबत कानावर हात ठेवत असेल तर ती बाब गंभीर आहे कारण त्या परिस्थितीत हे स्पायवेअर म्हणजेच एक प्रकारचे सायबर हत्यार कुणा अनधिकृत व्यक्तीच्या हाती



लागले आहे असा त्याचा अर्थ होईल. त्यातून होणाऱ्या अनर्थाची कल्पनाच केलेली बरी. त्यामुळेच सरकारकडून याबाबत तपशीलवार खुलासा होण्याच्या आवश्यकतेबरोबरच भविष्यात असा प्रकार घडणार नाही अशी हमी देखील देण्याची नितांत गरज आहे. अन्यथा या संशयास्पद प्रकरणाच्या सुईचा रोख सरकारकडे कायम राहील!



# अवलिया तुमच्या बांधावर

## शेवटचे पान



पाऊस कधीचा पडतो
झाडांची हलती पाने,
हलकेच जाग मज आली दुःखाच्या मंदसुराने
आता पावसाची कविता जरी
कानावर पडली तरी
काळजात कापर भरत
एरवीसारखा हा पाऊस
**रिमझिम** नसतोच बरसत
नको नको रे पावसा
असं आर्त आर्जव
ऐकून न ऐकल्यासारखं करणं
आता त्याच्या सवयीचं झालयं
एरवी देवीच्या पहिल्या माळे आधी
तो आवरतं घ्यायचा
पण यंदा त्यान भयंकर आक्रितच मांडलय
दसरा दिवाळी हुसकावून लावली
उभी पिक आडवी केली
बळीराजाला संपवायचीच
भाषा सुरू झाली त्याची
उसंत घ्यायची विसरुनच गेलायं आता तो
धुवांधार बरसत त्यानं
मायमातीची चाळण करुन टाकली
आक्रोश वाढतोय, हाहाकार माजलाय
धाय मोकलून डोळ्यातलं पाणी आटलयं
अरे कुणी येईल का धीर द्यायला

बळीराजाचा हात हातात घ्यायला
**जीव नका देऊ** मी आहे ना सोबतीला
अवघं आसमंत कवेत घेणारा
तो अवलिया तुमच्या बांधावर आलाय
तुमची वेदना त्याच्या काळजाला भिडलीय
तोंडभरुन खोटी आश्वासने आणि
काडीने मलमपट्टी करणाऱ्यांच्यापेक्षा
हा लढवय्या तुम्हाला घेऊन सामना
करणार आहे संकटाशी
लोकहो ह्या तुफानाला कुणी
जाणता राजा म्हटलं, कुणी रयतेचा कैवारी म्हटलं,
तरणीताठी शेतकऱ्यांची लेकरंसुद्धा
आता त्याच्या सोबतीला आलियात
वयाची, वेदनेची तमा न बाळगता
तुम्हाला नव्या जोमानं तयार करण्याचा
त्यांनी चंगच बांधलाय
**हे वादळ** नुकसान नाही करणार
हे वादळ देईल दिलासा
आणि पुन्हा उभारील हे राष्ट्र
अलिकडे अनेक वादळांना नाव असत
पण तुम्हाला आम्हाला हव्या असणाऱ्या
ह्या वादळाच नाव आहे

**शरद पवार!**

राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!